शनिवार । ३१ ऑगस्ट १९७४
एक रुपया

# माणूस

## दिशाभूल....

- भ्रष्टाचार स्वातंत्र्यपूर्व काळातही होता.
- कौटिल्याच्या अर्थशास्त्रात भ्रष्टाचारावर दोन प्रकरणे आहेत.
- भ्रष्टाचार लोकशाहीत असतो तसा हुकुमशाहीतही असतो.
- भ्रष्टाचार इंग्लंड-अमेरिकेसारख्या संपन्न देशांतही आहे.
- भांडवलशाही अर्थव्यवस्था आहे तोवर भ्रष्टाचाराचे निर्मूलन होणे अशक्य आहे.....

बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांनी केसरी वाड्यात गणेशोत्सवानिमित्त ' भ्रष्टाचार–एक समस्या ' या विषयावर गेल्या आठवड्यात केलेल्या भाषणातील ही काही विधाने आहेत.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा आणि भ्रष्टाचाराचा गाडगीळांनी जोडलेला संबंध तूर्त आपण गृहित धरू. प्रश्न असा आहे, की भांडवलशाही अर्थव्यवस्थेतही जे भ्रष्टाचार बसू शकत नाहीत त्यांची चलती आपल्याकडे का आहे ?

उदाहरणार्थ स्मगलिंग. टाटा किंवा मफतलाल यांच्या भांडवलशाही नीतिकल्पनांतसुद्धा स्मगलिंगला स्थान नाही. हा कॅन्सर भांडवलशाही अर्थव्यवस्थाही कुरतडत असतो. हा कॅन्सर गेल्या काही वर्षात एकदम कसा वाढला ? कोणी वाढू दिला ? स्मगलिंगचा पैसा खचितच टाटांकडे जात नाही. तो जात असतो राज्यकर्त्या पक्षाकडे. निवडणुका जिंकण्यासाठी या पैशाचा वापर केला जातो. त्यामुळे स्मगलर्सची नावे, त्यांचे व्यवहार यांची माहिती असूनही त्यांचेविरुद्ध कसलीही उपाययोजना होत नाही. नुकतीच लोकसभेत अर्थखात्याचे राज्यमंत्री गणेश यांनी तीन बड्या स्मगलर्सची नावे जाहीर केली. प्रश्न असा, की त्यांना साधी अटकही का होऊ नये ? समजा अटक झाली, तरी तुरुंगात या स्मगलर्सची राजेशाही बडदास्त शेवटी कोण ठेवते ? मस्तानला कोण सांभाळत होते ? भांडवलशाही अर्थव्यवस्था की शासनातलेच काही उच्चपदस्थ ?

शिक्षणक्षेत्रात भ्रष्टाचार माजला आहे. पैसे चारून पदव्या मिळवल्या जातात. गुण वाढवले जातात. सत्ताधाऱ्यांना हवी ती माणसे उच्च पदांवर बसविली जातात. या भ्रष्टाचाराचा आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा संबंध काय ?

आपले मंत्री, राज्यकर्ते चैनीत राहतात. त्यांच्या मिळकती वाढतात. त्या कशा ?

देशात काळाबाजार फोफावला. करचुकवेगिरी वाढली. ही भांडवलशाहीची अपत्ये की भ्रष्ट राजकीय नेतृत्वाचा हा परिपाक !

पं. नेहरूंनी एका जरी काळ्या बाजारवाल्याला फाशी दिले असते तरी ही वेळ आज येती ना.

अजूनही इंदिरा गांधी हे पुण्यकार्य करू शकतात.

देशातली कुठलीही शक्ती त्यांना अडवू शकणार नाही.

त्यांच्याजवळ भरपूर माहिती आहे. पुरेसे पुरावेही आहेत.

कुणासाठी, कशासाठी त्या थांबल्या आहेत ?

त्यांना थांबणे भाग पाडणाऱ्या शक्ती त्यांच्या जवळपासच घुटमळत आहेत.

या जवळपासच्या शक्तींचा वेध घेण्याऐवजी गाडगीळांसारखे विचारवंत भांडवलशाही... कौटिल्य, संपन्न देश इत्यादी तूर्त गैरलागू असणारे मुद्दे उपस्थित करून लोकांची हेतुपुरस्सरच दिशाभूल तर करीत नाहीत ?


मी माझी मालमत्ता केव्हाही
जाहीर करू शकतो. माझी
सारी मालमत्ता जनतेचीच
आहे... अन् ह्यॅ ऽऽ ह्यॅ
जनता माझी आहे
ह्यॅ ऽऽऽऽ


मूर्खा ३३ टक्क्याला पहिला वर्ग
मिळणार नाही.... रेल्वेचा पहिल्या वर्गाचा पास
३३ टक्क्यानी महागलाय!
श्याम

मूळात मी इंपोर्टेड स्ट्रेचलॉनची पँट घालून यायलाच नको होते.





# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ३१ ऑगस्ट | अंक : चौदावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


# जयप्रकाश, क्रांतिसूर्य की देशद्रोही गद्दार ?

डॉ. अरुण लिमये

गेले तीन चार महिने बिहार व जयप्रकाश हे वर्तमानपत्रातील जागा अडवून बसले आहेत. कडवे पुरस्कर्ते व कट्टर विरोधक याच्यात प्रचाराची घुमश्चक्री चालू आहे. बिहारबाहेरची सामान्य जनता गोंधळलेल्या अवस्थेत आहे. आपल्याकडेही बिहारएवढाच भ्रष्टाचार आहे. तेव्हा गुजराथ, बिहारच्या धर्तीवर इकडेही काही करावे असे तरुणाना वाटते. स्वतः भ्रष्टाचारी मडळीचे धाबे दणाणले आहे व कावेबाजपणे आम्हीच आता भ्रष्टाचार निर्मूलन चळवळ हाती घेतो अशा डरकाळ्या ते फोडीत आहेत. या पार्श्वभूमीवर बिहारमध्ये नेमके काय घडले, आदोलनाच्या मागण्या कोणत्या, जयप्रकाशाची नेमकी भूमिका काय, विनोबाचा त्याना आशीर्वाद आहे की विरोध, समाजवादी व जनसंघीयांबरोबर कसे, हे आंदोलन उजवे का डावे, क्रांतिकारक का प्रतिक्रातिकारक ? असे अनेक प्रश्न आहेत. अखिल भारतीय युवक समेलनात सहभागी होण्यासाठी मी अलाहाबादला गेलो होतो. तेथे बिहार चळवळीत प्रत्यक्ष असलेल्या अनेक तरुण कार्यकर्त्यांशी बोलणी झाली. जयप्रकाशजीशी स्वतत्रपणे चर्चा करण्याची सधी अलाहाबादला व मुंबई येथे मिळाली. त्या आधारे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून या प्रश्नासबधीची माझी मते मी येथे माडली आहेत.

गुजराथचे आदोलन एका अर्थाने यशस्वी झाले, एका अर्थाने फसले. एकदा निवडणुकीत मत दिले की जनतेने पाच वर्षे सर्व मुकाटपणे सहन करावे या सिद्धाताला तडा गेला. जनतेच्या रौद्र दर्शनाने चिमणभाई गडगडले व विधानसभाही भग पावली. हे चळवळीचे यश आहे. परंतु महागाई प्रत्यही वाढत असताना चळवळ थांबली. ही चळवळीची मर्यादा आहे. योग्य दिशा देणाऱ्या नेतृत्वाच्या अभावामुळे हे अपयश आले. बिहार आदोलन हे गुजराथच्या पुढचे पाऊल आहे. तेही उत्स्फूर्त आहे, परतु त्याची खास अशी दोन वैशिष्टये आहेत. गुजराथ आदोलनाचे नेतृत्व एक तर सामुदायिक होते वा नवनिर्मित होते. उलट बिहारचे नेतृत्व जाणत्या राजकारणी पुरुषाकडे—जयप्रकाशजीकडे आहे भ्रष्टाचार, महागाई व बेकारी या तीन प्रश्नांच्या जोडीला कुशिक्षणाची समस्या माडणे हे बिहारचे दुसरे वैशिष्टय आहे. दोन्ही चळवळी सर्वसाधारणतः शांतीमयच राहिल्या. जयप्रकाशजीनी नेतृत्व स्वीकारण्यापूर्वी चळवळ अहिंसात्मक राहील, ही अटच घातली होती व सर्वांनी ती मान्यही केली आहे गुजराथची चळवळ ही मुख्यत्वे मध्यमवर्गीय शहरी विद्यार्थी चळवळ होती. बिहार चळवळीची पाळेमुळे त्याहून किती तरी खोल गेली आहेत. जनसघर्ष समित्या स्थापन झाल्या आहेत. पावसाळ्यामुळे स्वाभाविकतः आदोलनाचा जोर ओसरला असे भासले तरी चळवळीची व्याप्ती वाढत आहे हे निश्चित. आंदोलनाची सुरुवात भ्रष्टाचारविरोधी म्हणून झाली. विधानसभेला राज्यपालाचे भाषणाचेवेळी ऐतिहासिक घेराव झाला. शासनाने दडपशाही तत्र वापरले. लाठीमार, गोळीबार हे ओघानेच आले. अनेक विद्यार्थी नेते गजाआड ढकलले गेले. तर कित्येक हुतात्मे झाले. कांग्रेस व कम्युनिस्ट पार्टी यानी गुडाना हाताशी धरून, आदोलकाना पाठिबा देणाऱ्या ' सर्च लाईट ' या वृत्तपत्र कचेरीची होळी केली. आदोलकाना ' हिसक ' ठरवून बदनाम करण्याचा हेतू मात्र साध्य झाला नाही. उलट शासनाच्या दडपशाहीचा निषेध म्हणून ' गफूर हटाव ' मागणी पुढे आली व सर्व विधानसभेवरच जनतेचा विश्वास उरला नसल्याने सर्व विधानसभा विसर्जित करावी अशी मागणी केली गेली.

देशात सर्वदूर चारित्र्याचा ऱ्हास व भ्रष्टाचार यामुळे निर्माण झालेली ही भयानक कोंडी स्वस्थ पाहात बसणे अनेकाना अशक्य झाले. त्यातले जयप्रकाशजी हे एक. सर्वंकष क्रातीशिवाय कुठलेही प्रश्न सुटणार नाहीत अशी माडणी त्यानी केली. अशी क्रांती करावयाची तर विद्यार्थी तरुण वर्गाने एक वर्ष शाळा-कॉलेजला न जाता या कार्याला वाहून घ्यावे अशी घोषणाही त्यानी केली व नेमकी येथूनच सर्व विरोधी प्रचारालाही धार चढू लागली. विधानसभाविसर्जनाने काय साधणार, लोकशाही नष्ट करून अराजक हवे आहे काय, अशी भाषा सुरू झाली. जवळजवळ प्रत्येक पक्षात विधानसभा सदस्य राजिनामा प्रश्नावर दुफळी माजली. जयप्रकाशजी आपल्या आवडीचा पक्षविहीन लोकशाहीचा सिद्धात पुढे दामटतात की काय याची भीती पक्षोपपक्षाच्या धुरिणाना पडली. तरीसुद्धा निरनिराळ्या पक्षाच्या केवळ सत्ताकाक्षी धोरणाला विटलेल्या जनतेने, सत्याग्रहाच्या आवाहनाला साथ दिली. बिहारच्या आंदोलनाने निराळ्या टप्प्यात प्रवेश केला. सघर्षाबरोबर जनजागृतीचे काम सुरू झाले. जयप्रकाशजीच्या विरोधकांच्या प्रामाणिकपणाबद्दल शका व्यक्त न



करताही, त्यांचे वर्गीकरण करणे शक्य आहे. काँग्रेसमधील भ्रष्टाचाराचे सम्राट असणाऱ्या उच्चपदस्थांचा विचार करावयासच नको. जहाल इंदिराभक्तांनी 'इंदिरा ब्रिगेड' उघडली व जयप्रकाशजींच्या मोर्चावर सशस्त्र हल्ला चढविला. ७१ साली गाजलेल्या तरुण तुर्कांनी जेपींवर वैचारिक तोफा डागल्या. दस्तुर खुद्द इंदिराजींनी काँग्रेसवाल्यांना बिहार आंदोलनाविरुद्ध प्राणपणाने झगडण्याचे फर्मान काढले. आता गल्लीबोळातून काँग्रेसी पुढाऱ्यांची एकसाथ कोल्हेकुई सुरू झाल्यास नवल नाही! भारतीय (?) कम्युनिस्ट पक्ष हा बोलून चालून सांसदीय लोकशाहीच्या विरोधी व कामगारवर्गीय हुकूमशाहीचा प्रणेता आहे. त्याने लोकशाहीच्या मृत्यूची आवई उठवून, काँग्रेसच्या गळ्यात गळा घालून, जोरजोरात रडारड आरंभिली. याला नक्राश्रूशिवाय दुसरे काय म्हणावे? काँग्रेसचे अध्यक्ष शंकरदयाळजी शर्मा यांनी म्हटले की, पुराव्याअभावी मंत्री पैसे खातात असे म्हणणे हा देशद्रोह आहे. पुढे असे म्हटले की, ७१ साली ५७ भ्रष्टमंत्र्यांना आम्ही तिकिटे नाकारली. अशी परस्पर विरोधी विधाने करणारांची कसरत नेत्रदीपक असते हे खरे. गुजराथमध्ये केलेलाच, परकीय पैशांचा आरोप, बिहारच्या संदर्भातही त्यांनी पुनः पुन्हा केला आहे. जयप्रकाशांच्या वैयक्तिक चारित्र्याबद्दल, भारतात, काँग्रेसपक्षामधील कित्येकांसकट, अनेकांना आदर आहे. त्यामुळेच त्यांच्या चारित्र्यहननाचा बालीश प्रयत्न वाया गेला. उलट त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. म्हणून शेवटी विरोधकांनी आपले अमोघास्त्र बाहेर काढले आहे. या चळवळीत स्वतंत्र, संयुक्त-काँग्रेस व जनसंघासारखे प्रतिगामी पक्ष आहेत! भांडवलदार व जमीनदारांचे सहकार्य आहे! तेव्हा ही प्रतिक्रांतिकारी चळवळ आहे! अशा विचारसरणीतूनच महात्मा गांधींचा वध झाला, याची आठवण इंदिरा गांधींनी मुद्दाम करून दिली आहे. ७१ साली घोषणेत बदल झाला तरी प्रत्यक्षात भांडवलदार व सधन बागायतदारांची काँग्रेस संघटनेवरील पकड किती जबरदस्त आहे, याचा प्रत्यय आजही येत आहे. नारे समाजवादाचे असले तरी परंपरावादी जनसंघीय मतांची मंडळी काँग्रेसमध्ये बहुसंख्येने आहेत. तेव्हा जेपींना प्रतिगाम्यांची संगत कशी चालते हा प्रश्न विचारण्याचा नैतिक अधिकार काँग्रेसला खासच नाही. संसदेचे अधिवेशन जवळ आले असताना वारंवार केलेली वटहुकुमाची खैरात, विरोधकांची धरपकड, त्यांच्यावर लादलेल्या जिल्हाबंद्या, अंतर्गत सुरक्षितता कायदा व भारत संरक्षण कायद्याचा राजकीय कार्यकर्त्यांविरुद्ध केलेला वापर, पोलीस, एस. आर. पी. व लष्कर यांचा जनआंदोलने

चिरडण्यासाठी केलेला बेमुर्वतखोर उपयोग ही सारी प्रत्यक्षात हुकूमशाहीची लक्षणे आहेत. लोकशाही हक्क सरक्षणाचा वसा घेऊन, उच्चरवाने आक्रोश करण्याचा नैतिक अधिकार, या हुकूमशाही शासनाला खचितच नाही. तथापी केवळ असे बोलून विरोधकाचा तात्त्विक मुद्दा डावलणे योग्य नाही हे मला मान्य आहे.

उजव्या शक्तीच्या सहभागाविषयी व त्यांना आळा घालणाऱ्या शक्तीविषयी जयप्रकाशांबरोबर सविस्तर चर्चा झाली. सार्वजनिक व्यासपीठावरून जी भूमिका जयप्रकाशजी इतक्या सुस्पष्टपणे माडीत नाहीत ती त्याची भूमिका त्याच्याच शब्दात पुढीलप्रमाणे आहे: विधानसभा विसर्जनाची मागणी ही पोलिसी दडपशाहीच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांनी केली आहे. तो चळवळीचा शेवट नव्हे. तेथून चळवळीची सुरुवात आहे. एक वर्ष कॉलेज बद ठेवा याचा अर्थ कॉलेज सोडून घरी स्वस्थ बसावे असा नव्हे. क्रांतीसाठी बद्धपरिकर होऊन कार्य करणे हा आहे. असे युवक निघाले तर क्रांतीच्या दिशेने टाकलेले ते एक छोटेसे पाऊल ठरेल.' इतर राज्यात विधानसभा विसर्जनाची घोषणा देऊ नये, असा सल्लाही जयप्रकाशानी वेळोवेळी दिला आहे. पक्षविहीन लोकशाहीचा सिद्धात या चळवळीत पुढे दामटण्याचाही त्यांचा विचार नाही. जातीविहीन, वर्गविहीन, समाजरचना निर्माण झाल्याशिवाय, पक्षविहीन लोकशाही येणे शक्य नाही असे त्यांचे म्हणणे आहे व अशा परिस्थितीत पक्षाची आवश्यकता असेल काय या प्रश्नावर 'ये तो भगवान जाने' असेही ते म्हणतात.

विद्यार्थी परिषदेसमोरील मेळाव्यात भूमिहीन व दलिताचे प्रश्नाबाबत जनसघ व स्वतंत्र माझ्याबरोबर येणार नाहीत. समाजवादी येतील हेही त्यांनी खुलेपणाने सागून टाकले. त्याची प्रतिक्रिया म्हणून जनसंघ समांतर अशा जनसघर्ष समित्या स्थापन करील अशी धमकी बिहारमधून आली. 'खुशाल करू द्या. आम्ही मुकाबला करू' असे बाणेदार उत्तर जेपीनी दिले आहे. जयप्रकाशाच्यामते व्यक्तिश. त्याचे नेतृत्व उजव्या शक्तींनी मान्य करणे हाच एक प्रकारे शह आहे विद्यार्थ्यांचा अग्रगणी नेता 'लालुप्रसाद यादव' हा बिहार मधील पिछडया जमातीचा आहे. अस्पृश्य व मागासलेल्या समाजातील मडळी चळवळीत नाहीत हा आरोप सत्याला सोडून आहे. आदिवासी लढ्यात उतरतील अशी आशा जेपीना, आदिवासी नेत्याबरोबर झालेल्या चर्चेनतर वाटते. मार्क्सवादी नेते ज्योती बसू याच्याशीही त्यांची बोलणी झाली आहेत. सीपीएम व जनसघ याच्यातून अग्नी जात नाही. तसेच जयप्रकाशजीचेही जनसघावरोबर वैचारिक मतभेद जरूर आहेत. परतु जनसघाचे भारतीयत्व जेपीना आवडते, पण भारतीयत्व म्हणजेच हिंदुत्व, हे समीकरण त्याना साफ नामजूर आहे. जनसघाचे सामाजिक व आर्थिक धोरण बदलते आहे ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. आणि म्हणूनच जयप्रकाशजीना वाटते की परस्पर वैचारिक विरोध बाजूला ठेवून काँग्रेसविरोधी सर्वदलीय भूमिकेतून नव्हे, तर निर्दलीय भूमिकेतून आदोलन करावे.' हिंसा अहिंसेच्या सदर्भात ४२ साली महात्माजीनी घेतलेल्या भूमिकेशी जेपीची आजची भूमिका खूपच मिळती जुळती आहे. जनतेच्या पाठिंब्याशिवाय केलेल्या, मूठभर कडव्यागटाच्या हिंसेचे काय होते, याचा मार्क्सवाद्यांना बगालमध्ये चांगलाच अनुभव आला आहे. लोकशाही प्रेमाचा पुळका येऊन, जोरदार भाषणे करणारे युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रियरजनदास मुन्शी यानी सव्याज परतफेड करून हिंसेचा नक्षलवादी उठाव कसा चिरडला ते स्वत: दास मुन्शी विसरले तरी हिंसेवर श्रद्धा ठेवणारे व अहिंसा हे मूल्य मानणारे हे दोघेही विसरले नाहीत. आणि म्हणूनच शाततामय मार्गाने जनजागृती करून उभा केलेला लढा हेच लोकशाही रक्षणाचे एकमेव आशास्थान आहे. बिहारच्या लढ्याचे महत्त्व म्हणूनच मोठे आहे. हा शाततामय लढा फसला तर लोकशाहीच सपेल अशी रास्त भीती आहे. म्हणूनच सर्व लोकशाही प्रेमी जनतेचे हे कर्तव्य ठरते की बिहारच्या भ्रष्टाचार विरोधी आदोलनास त्यांनी सक्रिय पाठिंबा द्यावा.

त्यासाठी महाराष्ट्रात नेमके काय करता येईल हाही महत्त्वाचा मुद्दा आहे. सर्वांनी प्रत्यक्ष बिहारमध्ये जाण्याची आवश्यकता नाही. आणि ते सयुक्तिकही नाही चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण करण्याकरिता पुरोगामी विचाराच्या तरुणानी बिहारमध्ये जाणे हा भाग वेगळा. तोपर्यंत बिहार चळवळीच्या सदर्भात जनजागरणाचे काम करणे हेही तेवढेच महत्त्वाचे आहे सभा, मेळावे, परिषदा यापासून धरणे, उपोषणे इत्यादी लाक्षणिक कार्यक्रमापैकी कोठलेही स्वरूप असू शकते. भ्रष्टाचार, बेकारी, महागाई व कुशिक्षण हे चारही प्रश्न बिहारपुरतेच मर्यादित नाहीत तर ते देशव्यापी आहेत. म्हणूनच महाराष्ट्रातही, भ्रष्टाचारविरोधी प्रखर लढा उभा करणे हाही एक पर्याय असू शकतो. गुजराथ, बिहार येथील मागण्या व पद्धती याची भ्रष्ट नक्कल करण्याची मुळीच गरज नाही. विधानसभा बरखास्तीची मागणी, अमुक अगर तमुक मत्री अगर 'मत्रिमडळ हटाव' अशी मागणी न करताही, हे करणे शक्य व्हावे.

महाराष्ट्रातील दलितजाती व शेतमजुराचे प्रश्नाला अग्रक्रम देऊन, येथील भ्रष्टाचारविरोधी आंदोलन उभे राहिले तर त्याला खरा कणा प्राप्त होईल. प्रतिगामी शक्तीचे बोलघेवडे पितळही त्यामुळे उघडे पडेल. साठेबाज व काळाबाजारवाले, याच्याविरुद्ध प्रखर जनआदोलन उभे करावे. केवळ शासकीय भ्रष्टाचार उघड करून न थाबता राजकीय भ्रष्टाचारावरही प्रहार करावा. लोकनियुक्त प्रतिनिधीना आपले उत्पन्न जनतेसमोर जाहीर करण्यास भाग पाडावे, अशा स्वरुपाचा समान कार्यक्रम हाती घेणे, समविचारी तरुणाना सहजच शक्य आहे.

विनोबाजीवर सरकारी सत, भोदुगिरी इत्यादी आरोप होत आहेत. सूक्ष्मातील प्रकाड विचारवत अशाही उपाधी त्यांना मिळाल्या आहेत. हे काही असले तरी, विनोबाचा जयप्रकाशांना विरोध आहे, असे भासविण्याचा प्रयत्न सर्व सेवासघाच्या वर्धा शिबिरानतर फसला आहे. जनतेत विधायक कार्यामुळे काहीसे स्थान असणारा सर्वोदयी कार्यकर्त्यांचा सचही महाराष्ट्रात हे नेतृत्व घेऊ शकेल. कोठल्याच एका पक्षावर लोकाची निष्ठा राहिली नसल्याने, अशा स्वरुपाचा निर्दलीय सर्वोदयी नेतृत्वाचा प्रत्यक्ष चळवळीस लाभच होईल हे निश्चित. भ्रष्टाचाराचे शीघ्र वाढलेले तण सर्व दूर आहेच. प्रत्यक्ष ठिणगी कोण टाकतो व कुठल्या प्रश्नावर ती पडते ही अदाज बांधण्याची गोष्ट आहे. राजकीय भविष्यवेत्यानी असे आडाखे जरूर बांधावेत. परंतु ते कधीकधी फसतात हेही विसरू नये. एक गोष्ट नक्की, की असतोषाचे कोठार धुमसत आहे. उत्स्फूर्त लढ्याला योग्य दिशा लागली तरच ते क्रातिकारक पाऊल ठरते. अन्यथा समाज अराजकाच्या गर्तेत जातो. ऐनवेळी जनआदोलनाच्या वाघावर आपण स्वार होऊ, असे माडे खाणाऱ्या माणसानाच तो वाघ गट्टम् करतो, हाही अनुभव आहे. उलट प्रतिगामी, उजवे म्हणून लोक चळवळीपासून फटकून दूर राहिल्यास, उजव्या शक्ती हमखास वाढतात हेही विसरता येत नाही. जनआदोलनात लोकाबरोबर राहून, प्रसगी नेतृत्व स्वीकारून, चळवळ क्रातिकारी व योग्य दिशेने नेणे हे राजकीय कसब आहे. डाव्या पुरोगामी शक्तीची हीच नेमकी कसोटी आ

□ □

# बड्यांच्या राजकारणासाठी सायप्रसचा बळी

वा. दा. रानडे

सायप्रसमधील अमेरिकन वकील राजर डेव्हिस याचा निकोशियात गोळचा घालून खून करण्यात आला. ग्रीकामध्ये अमेरिकेच्या सायप्रससबंधी धोरणाबद्दल सतापाची केवढी तीव्र लाट उसळली आहे हे याचे निदर्शक होते. आपले लष्करी उद्देश साधण्यासाठी सायप्रसचा सारा पेचप्रसंग अमेरिकेनेच घडवून आणला असे ग्रीकांना वाटत आहे. भूमध्य प्रदेशाच्या मोक्याच्या स्थानामुळे सायप्रसला महत्त्व आलेले आहे.

'एव्हिएशन वीक' या अमेरिकन पत्राने अमेरिकेला सायप्रसचे लष्करी दृष्टचा एवढे महत्त्व का वाटते यावर नवा प्रकाश टाकला आहे. रशियाने लाब पल्ल्याची क्षेपणास्त्रे सोडल्यास ते ओळखण्याची रडार यत्रणा सायप्रसमध्ये उभारण्यात आलेली आहे. क्षितिजावरचा रडार ('ओव्हर दि होरायझन रडार') अशा पद्धतीची ही यत्रणा आहे. ही यत्रणा एवढी प्रगत आहे की, तुर्क-ग्रीक युद्धाच्या काळात तिचे सरक्षण करण्यासाठी तेथे आपल्या फौजा उतरविण्याचा विचार अमेरिकन सरक्षणखाते करीत होते. रडारचा काही भाग ब्रिटिशांनी बनवला असला तरी अमेरिकन तत्रज्ञानी त्यात नतर सुधारणा केलेली आहे. ब्रिटिश तज्ञच ही यत्रणा चालवितात. दूरगामी क्षेपणास्त्र सोडण्यात आल्याचा इशारा या रडारवर मिळतो.

सायप्रसमध्ये अक्रोतिरी आणि धेकेलिया येथे ब्रिटिशाचे तळ आहेत. या तळाचा उपयोग रडार यत्रणा उभारणीसाठी करण्यात आला, ही माहिती प्रथमच बाहेर येत आहे. तळाचा खर्च करणे ब्रिटिश अर्थव्यवस्थेला फार काळ झेपणे शक्य नाही. हे तळ काढून घेण्याचाही निर्णय ब्रिटन घेण्याचा सभव आहे. तेव्हा तेथे आपला तळ हवा, तो काढून घेण्याची मागणी होऊ नये यासाठी आपल्या बाजूची राजवट सायप्रसमध्ये हवी, या उद्देशाने अमेरिकेने तेथे लष्करी उठाव घडवून आणला आणि तुर्की फौजानी लष्करी हस्तक्षेप केला तरी अमेरिकेने त्यांना रोखण्यासाठी काहीही हालचाल केली नाही. स्वतत्र व तटस्थ सायप्रसपेक्षा सायप्रसची फाळणी अमेरिकेच्या फायद्याची होती. ग्रीक भाग ग्रीकानी आणि तुर्क भाग तुर्कांनी व्यापून आपापल्या देशाला जोडला तरी अमेरिकेच्या दृष्टीने त्यात काही बिघडत नव्हते. ग्रीस व तुर्कस्तान दोघेही नाटोचे (उत्तर अटलाटिक करार सघटना) सभासद असल्याने तेथे नाटोचे तळ स्थापणे आणि त्याचा फायदा आपल्याला मिळविणे अमेरिकेस सहज शक्य होणार होते.

पण तुर्की फौजाचे आक्रमण न रोखल्याबद्दल ग्रीसमध्ये आणि सायप्रसच्या ग्रीक भागात अमेरिकाविरोधीची एवढी लाट उसळेल हे अमेरिकेस अनपेक्षित होते. नाटोमधून आपल्या फौजा काढून घेण्याचा निर्णय ग्रीसने घेतला. ग्रीस नाटो सघटनेतून पूर्णपणे बाहेर पडला असा याचा अर्थ नाही. सायप्रस प्रश्नावर तडजोडीसाठी अमेरिकेवर दडपण आणणे हाच त्यामागे मुख्य उद्देश होता. पण हा उद्देश साध्य झाला नाही तर याच्या पुढची पावलेही ग्रीस टाकण्याची शक्यता आहे. ही पुढची पावले म्हणजे अमेरिकेला व नाटोला ग्रीसमधून आपले तळ काढून घेण्यास सागणे. अमेरिकेची महत्त्वाची दळणवळण केंद्रे ग्रीसमध्ये आहेत. क्रीटमध्ये क्षेपणास्त्र चाचणी केंद्र आहे. अमेरिकन हवाईदलाची तीन विमाने अथेन्सजवळ हालचाली करीत असतात. त्यापैकी एक विमान हेरगिरीच्या कामगिरीवर असते. ग्रीसमध्ये अमेरिकेचे दोन नाविक तळ आहेत. अथेन्सजवळच्या पिरेयस बदरात सहा अमेरिकन विनाशिका असून एक विमानवाहू बोट व हॉस्पिटल बोट तेथे ठेवण्याबाबत वाटाघाटी चालू होत्या. या सर्वच सवलती ग्रीसने रद्द केल्या तर अमेरिकेला आणि नाटोला तो मोठा धक्का बसेल. नाटोची दक्षिण फळी सुरक्षित राखण्याच्या दृष्टीने ग्रीसचे स्थान महत्त्वाचे आहे.

असे असले तरी ग्रीस आणि तुर्कस्तान यातून निवडच करायची झाली तर तुर्कस्तानला न दुखविणे अमेरिकेस लष्करी दृष्टचा अधिक महत्त्वाचे वाटते. तुर्कस्तानची सरहद्द रशियाला लागून आहे. दार्दानेल्स समुद्रधुनीवर त्याचे नियत्रण आहे. काळचा समुद्रातून भूमध्य समुद्रात प्रवेश करायला रशियन आरमाराला एक मार्ग आहे. ग्रीसच्या दुप्पट सेना तुर्कस्तानजवळ आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच अमेरिकेने तुर्कस्तानल रोखण्यासाठी काहीही उपाय योजले नाहीत

यातून पुढे काय ? सायप्रसचा प्रश्न कसा व कोणत्या मार्गाने सुटणार ? सायप्रस स्वतत्र व तटस्थ राहिला पाहिजे असा आग्रह रशिया धरील पण सायप्रसच्या फाळणीचे योजनेवर ग्रीस व तुर्कस्तान यानीच आपसात तडजोड केली तर रशियाला त्या बाबतीत काही करता येणार नाही. आर्च बिशप मकारिओस आता सायप्रसमध्ये पुन्हा अध्यक्ष म्हणून प्रस्थापित होण्याची आशा बरीच दुरावली आहे. अमेरिकेला तर ते नकोच होते. ब्रिटनने लडनमध्ये त्याना आसरा दिला असला तरी त्याना सायप्रसमध्ये पुन्हा सत्तारुढ करण्याबद्दल ब्रिटनचाही आता फारसा आग्रह दिसत नाही ग्रीसमध्ये लष्करी राजवट जाऊन करमनलिस पतप्रधान झाले असले आणि सायप्रसमध्ये सॅम्पसन या लष्करी नेत्याचे जागी क्लेरिडेस अध्यक्ष झाले असले तरी मकारिओस परत यावेत अशी इच्छा त्यांनीही व्यक्त केलेली नाही.

अरब-इस्राइल सघर्षाप्रमाणेच सायप्रसच्या प्रश्नावरील ग्रीस व तुर्कस्तानचा सघर्ष लौकर मिटण्याची शक्यता दिसत नाही. आपल्याला हवा असलेला प्रदेश जिंकून तुर्कस्तानने सायप्रसची फाळणी प्रत्यक्षात केलीच आहे. ग्रीस ही फाळणी मान्य करो न करो तुर्की फौजानां तेथून हुसकण्याचे सामर्थ्य आज ग्रीसमध्ये नाही. वाटाघाटीतून शक्यतो पूर्वीची स्थिती निर्माण करण्याचा ग्रीसचे. पतप्रधान करमनलिस याचा प्रयत्न राहील पण ब्रिटन-अमेरिकेच्या दडपणाने ते अखेर फाळणीस तयार होण्याची शक्यता आहे.

सायप्रससारख्या छोटचा राष्ट्रांना स्वतत्र राष्ट्र म्हणून सन्मानाने व निर्भयपणे जगता आले पाहिजे. त्यांच्या स्वातत्र्याची हमी बडचा राष्ट्रानी व यूनोने दिली पाहिजे. पण बडचा राष्ट्रांना एका छोटचा राष्ट्राच्या स्वातत्र्यापेक्षा आपले लष्करी हितसबध अधिक महत्त्वाचे वाटतात, यूनोची निष्क्रियता अनेक प्रसगाप्रमाणे या प्रसगीही पुन्हा एकदा उघड झाली आहे. त्यामुळे बडचाच्या राजकारणासाठी एका छोटचा राष्ट्राच्या स्वातत्र्याचा बळी पडला आहे. □

# सहकारी साखर गोड गोड

रमेश जोशी

नदीकाठची एक सुखद सध्याकाळ. महिना बहुधा ऑक्टोबर. साऱ्या दिवसाचे काम सपवून एका सहकारी कारखान्याच्या अतिथीगृहात गप्पाचा अड्डा इतर सहकाऱ्यां-बरोबर टाकून बसलो होतो. कारखाना अर्थातच साखरेचा. कारखान्याचे पालक महाराष्ट्राच्या मत्रिमडळात मत्र्याचे बधू कारखान्याचे अध्यक्ष बहुधा कारखान्याचे अध्यक्ष म्हणून इतरही अनेक सहकारी सस्थाचे अध्यक्ष. नदीकाठावर पुण्याच्या जिमखान्यावर शोभेल असा प्रशस्त अलीशान बगला. वारदाना खूपच मोठा. ७०–८० तर म्हशीच गोठ्यात झुलतात बगल्याच्या कट्ट्यावर बसून जिथवर दृष्टी जाते तिथवर जमीन आमचीच म्हणून सागतात. त्याच्या-कडे जर पाहिले तर महाराष्ट्रातील शेतकरी दरिद्री आहे असे काही कोणी सागू शकणार नाही.

आमची बैठक मोठी रगली होती. बैठकी-तले सर्वच सहकारी सहकारी साखर कार-खान्याची कामे कत्राटाने करणारे होते. प्रत्येकजण खूपच फरफरला होता. अनुभवाची शिदोरी प्रत्येकाकडे भरपूर होती. इतक्यात चेअरमनसाहेबाची ॲम्बॅसॅडर धूळ उडवीत अतिथीगृहात शिरली. आम्ही सर्वच जण गडबडून उभे राहिलो, नमस्कार घातला.

'बसा बसा मडळी. कामे व्यवस्थित चालू आहेत ना?' उत्तराची अपेक्षा न करताच फोन पुढे ओढला.

'जरा मुबई द्या बरे. नबर XXX लाईट-नीग कॉल द्या बरका. मी काकासाहेब बोलतोय.'

आम्ही सर्वच जरा अवघडून बसलो. एक दोघेजण उठून आत गेले. बाकीच्याची चुळबूळ बहुधा साहेबाच्या लक्षात आली असावी.

'XXX साहेब कामाला जरा गती द्या बर का, १६ तारखेला उद्घाटन आहे. साहेब यायचे आहेत, जरा दणका द्या. काही अडचण आली तर चीफसाहेबाना सागा.'

ट्रिंग–ट्रिंग–फोन वाजतो.

'कोण XXX का? मी काकासाहेब बोलतोय. हे पहा उद्या XXX वाढदिवस आहे. त्याच्यासाठी अकबरअल्लीकडून एक चागला मोठा १५० रु. पर्यंत केक घ्या आणि आपल्या गाडीतून पांचगणीला त्याच्या शाळेत पाठवून द्या. बरोबर गणपाला पाठवा. त्याला त्याची शाळा माहीत आहे. काय समजल का? सगळ बरोबर जमलं पाहिजे नाहीतर घोटाळा कराल. उद्या सध्याकाळी सहाच्या आत केक पोचला पाहिजे. बराय आणखी काही? नमस्कार.'

फोन बद होतो. साहेब येतात तसेच धूळ उडवीत निघून जातात. मागे रहातात अनेक प्रश्न. ज्याची उत्तरे माहीत नाहीत. प्रयत्न झाले तरी सुटत नाहीत.

दुसरा कारखाना, साखरेचाच. मी आपल्या कामावर खुर्ची टाकून बसलो आहे. रणरणती दुपार. सूर्याची पर्वा न करता माझे कामगार कामावर घाम गाळीत आहेत. माझ्या ताडेलाला मी एक नकाशा समजावून देत आहे.

'नमस्कार साहेब.'

मी वर पहातो. माझ्यासमोर पंढरीनाथ पाटील उभा आहे. पंढरी पाटील. वय वर्षे २८ च्या आसपास. गेली पाच वर्षे हा पढरी पाटील कारखान्यात येणाऱ्या उसाचा मोजणीदार म्हणून काम पहात होता. दोन महिन्यापूर्वी त्याची नोकरी गेलेली असते. नोकरी जाण्याची कारणे मात्र गुलदस्तात असतात. त्याला पाहून माझे कुतूहल जागे होते.

'काय पढरीनाथ काय काम काढले?' मी विचारतो. 'काय करणार साहेब? आम्हाला कुठतरी लावून घ्या. तो म्हणतो. माझे कुतूहल अधिकच जागे होते.

'काय रे. तुझी पहिली नोकरी का गेली?' मी विचारतो.

'इथ सागण्यासारखे नाही साहेब. संध्या-काळी घरी या.' थडपणे तो म्हणतो.

मी सध्याकाळी त्याच्या घरी जातो

घर बऱ्यापैकी. छोटासा Tape recorder रेडिओ – बऱ्यापैकी फर्निचर. एकावेळी सुबत्ता भोगल्याची सर्व लक्षणे घरात.

इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मी मुद्द्यावर येतो. उत्तर तितकेच मुद्देसूद आहे.

"चार महिन्यापूर्वी साहेब सचालक-पदाच्या निवडणुका झाल्या. मी काका-साहेबाच्या पाव्हण्याचा भाचा. मला एका-एकी नोटीस दिली. कामावरून कमी केले. भरपाई वगैरे पूर्ण मिळाली. पण ती किती दिवस पुरणार?"

"काय रे तुझा राजिनामा का मागितला?" मी विचारले.

"त्याचं अस आहे साहेब" तो सांगू लागला.

"मी येणाऱ्या उसाचा मोजणीदार. ऊस आला की त्याचे वजन करून त्याची पावती शेतकऱ्यांना देणे हे माझं काम. नवीन सचालकमडळीशी जमवून घेणे आपल्याला जमले नाही म्हणून मला कामावरून काढून टाकल."

"अरे, तू जमवून घेतल नाहीस म्हणजे काय?"

आता त्याच्या डोळ्यात माझ्या अज्ञाना-बद्दल सहानुभूतीचे भाव दिसू लागतात.

"साहेब, मी काकांचा माणूस. मामांचे

पॅनेल या निवडणुकीत सगळेच्या सगळे लागले. काका पार उडाले. आम्ही काकाच्या इशाऱ्यावर पावत्या फाडायचो. म्हणजे समजा, तुमचा ऊस दारावर आला. त्याच खरं वजन आहे ११० टन. तर आम्ही तुम्हाला पावती द्यायचो १०० टनाची. दहा टन ऊस आम्ही वेगळ्या दस्तीबुकात जमा करायचो. दिवसाला सीझनमध्ये दोनशे-तीनशे टन ऊस या दस्तीत जमा व्हायचा. सबंध सीझनला असा जमलेला ऊस २०–३० हजार टनाच्या घरात जायचा. हा ऊस शेवटी काका सांगतील त्या सचालकांच्या नावे जमा व्हायचा. गेल्या वर्षी आमच्या कारखान्याने उसाला १३५ रु. टन भाव दिला. म्हणजे किती रक्कम झाली त्याचा तुम्हीच हिशोब करा. आम्ही काकाची माणसे. आमच्यावर मामांचा कसा विश्वास बसावा? सीझन सपताना काका मला ५०००/– रु. द्यायचे. खर सागायचं म्हणजे आता वाईट वाटत. पण तेव्हा करायचो खरं."

मी अत्यत चकीत होतो. व्यथीत होतो. *अनेक अनुत्तरीत प्रश्नात आणखी एकाची भर पडते.*

कॅनॉलच्या काठावरचा आणखी एक सहकारी साखर कारखाना. मी आपल्या खोलीत विसावलो आहे. दारावर टकटक होते. मी दार उघडतो. दारात एक्साईज इन्स्पेक्टर ×××× उभे असतात. "या या ×××" मी म्हणतो. "हल्ली काम काय कमी वगैरे केले काय सरकारने, की कारखान्याने साखर पाठवायचे बद केले?" मी विचारतो.

"छे छे' काम कुठले कमी व्हायला. पण आता ब्लॅकशुगरची डिलिव्हरी चालू झाली. आता आम्हाला काम कमी." ते म्हणतात.

"ब्लॅक शुगर? ही काय नवीन भानगड?" मी विचारतो.

माझ ज्ञान रॉ-शुगर आणि व्हाईट शुगर इतकेच मर्यादीत असते.

"काहो, तुम्ही मशिनरी बसवता. साखरेची मोजणी यत्रे adjest करून देता. त्याच्यानतर तुम्ही वर्षाने तपासणी करता. मध्यतरीच्या काळात काय घडते हे तुम्ही पहात नाही का?" ते विचारतात.

माझा चेहरा प्रश्नार्थक होतो. मी काहीच बोलत नाही. तेच पुढे बोलू लागतात.

"अस पहा, तुम्ही जेव्हा मशीन set करता तेव्हा ते ५० किलोला set करता. कारखान्याचा मेटेनन्स स्टाफ तुम्ही येथून गेलात की तेच यंत्र ४९ किलोला सेट करतो. साखरेच पोत ४९ किलोला भरल जात. कारखाना ५० किलोवर एक्साईज भरतो. शभर टनाच्या पोत्यामागे २ टन साखर बाजूला काढून ठेवली जाते. व्यापारी ५० किलोच्या साखरेची किंमत मोजतो, लोकांकडून वसूल करतो. बाजूला काढून ठेवलेली पोती नतर उजळ माथ्याने ट्रकमधून रवाना होतात व सचालकमडळाच्या खिशात त्याचे पैसे जातात. हाच 'कारखाना रोजची १५० टन साखर तयार करतो. माझ्या डोळ्यासमोरून ट्रक जातात पण मी काय करणार? *मला हाती पायी धड घरी जायचे आहे. शेवटी तेरी भी चूप मेरी भी चूप.* we must accomodate each other."

जय सहकार, विना सहकार नही उद्धार! साऱ्या घोषणा माझ्या डोळ्यासमोर उलट सुलट तरगू लागतात.

सकाळचा आठचा सुमार. डेक्कन क्वीन नेहमीच्या दिमाखात मुबईकडे पळत आहे. माझ्या शेजारी मोठ्या मोठ्या फुलाचा बुशशर्ट व बेलबाटम घालून एक गृहस्थ बसला आहे. गळ्यात एक भारीतला कॅमेरा, हातात काही परदेशी मासिके. वरच्या रॅकवर बरेच रगीबेरगी सामान ठेवलेले. मी आपला सहज चौकशी करतो. गृहस्थ पुण्यातलाच निघतो माझ्या एका स्नेह्याचा मामाच. बरीच वर्षे बोस्टनलाच वास्तव्य. IBM च्या जगद्विख्यात कपनीत मोठी नोकरी बऱ्याच वर्षांनी पुण्याला आलेला. आम्ही गप्पा मारू लागतो.

इकडच्या तिकडच्या गप्पानतर रोख वॉटरगेटवर वळतो.

'अमेरिकेतसुद्धा लाचलुचपत फार मोठ्या प्रमाणावर आहे हे तर आता सिद्धच झाले आहे. भारतात त्यामानाने फारशी नाही. *तर मग अमेरिका मात्र वरवरच जाते आहे* आणि आम्ही मात्र रसातळाला चाललो आहोत असे का?' मी विचारतो.

'अमेरिकेत ऊस जरी गोड लागला तरी ऊसच खातात. आपणाकडे मात्र ऊस तर मुळापासून खातातच पण मुळेही मातीसकट खातात. लांचलुचपतीचा पब्लिकशी तसा सबध नसतो. किंवा लाच दिली म्हणून Sub-Standard मालही पुरवीत नाहीत. आम्हाला पैसे द्या आणि भाववाढ करून गरीबगुरीब जनतेकडून पैसे लूटा असा प्रकार नाही. अपवादासाठी एखादे उदाहरण असेलही. दुग्धव्यवसायाची लाचलुचपत उघडकीला येण्याअगोदरच अमेरिकन गवळ्याला जनतेने चांगलाच तडाखा दिला होता. ती केस तुमच्या लक्षात असेलच. पावाचे वाढलेले भाव याच जनतेने पुरे ४८ ताससुद्धा टिकू दिले नव्हते. अमेरिकेतील लाचलुचपतीने कोणालाही निगरगट्ट बनवले नाही. जे निगरगट्ट होते त्याना चांगलाच रट्टा मिळाला आहे. सग्यासोयऱ्याचे राजकारण हा तर सध्या भारतात धर्मच झाला आहे. हे जोपर्यंत चालू आहे तोपर्यंत लाचलुचपत *थाबूनही भारत वर येणार नाही.* भारताचा खरा शत्रू लाचलुचपत नाहीच आहे मुळी. सग्यासोयऱ्यांना बाहेर काढा. खऱ्या शत्रूला वेळीच ओळखा. माझे विवेचन न पटण्यासारखे आहे पण विचार करून पहा.' तेव्हापासून मी विचारच करतो आहे. जो जो अधिक विचार करतो तो तो डोक्याला मुग्या अधिक येतात. एखादा ऑक्टोपस त्याच्या सावजापासून वेगळा काढता येणे शक्य आहे पण या सग्यासोयऱ्याना कोण हात लावणार?

□ □

**शनवारवाड्यातील शमादान**

ब. मो. पुरंदरे

किमत साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे ३०

# एक वेडा पीर

## गीताई माउली माझी

सोमवार, दिनांक पाच ऑगस्ट, १९७४. वेळ दुपारची. गिलानी महाविद्यालयाचे सारे विद्यार्थी प्रशस्त हॉलमध्ये दाटीदाटीने बसलेले. एका अनोख्या वेड्या पिराचे प्रवचन ऐकण्यासाठी. असं म्हणतात हा वेडा पीर एकसारखा भटकतो आहे. पायी. हा जिल्हा संपला. आता पुढला. दोन वर्षं झाली. हे असं चालू आहे आणि आणखी दहा-बारा वर्षं तरी असंच चालणार आहे. सारा महाराष्ट्र पूर्ण होईपर्यंत.

वसंतरावजी गाडे. होय. हेच त्या पिराचे नाव. जन्म १९२७ मधला. बेचाळीसच्या लढ्यात भाग घेण्याचा पंधराव्या वर्षीच प्रयत्न केला. पण जमले नाही. शिक्षण पूर्ण करून पदवी परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर मात्र जन्मभर समाजाचीच सेवा करीत रहाण्याचे असिधारा व्रत स्वीकारण्याचे विचार पुन्हा प्रबळ होऊ लागले. या वेळपर्यंत पोस्ट खात्यात चांगली नोकरीही सुदैवाने प्राप्त झाली होती. पण नोकरीच्या जोखडात याला गुंतून रहावयाचे नव्हते. आणि म्हणूनच एक दिवस नोकरीचा सरळ राजिनामा देऊन हा मोकळा झाला. विवाह बंधनात अडकायचं नाही हे आधीच ठरले होते. आता तर नोकरीचा पाशही नाहीसा झाला. आणि म्हणूनच सर्वोदय मंडळाच्या कार्याला आता याने पुरते वाहून घेतले. आपण स्वतः मिळवीत नाही मग घरातील माणसावर तरी आपला भार का असावा ? असा प्रश्न आता समोर येऊ लागला आणि यातून आपल्या एकेका मित्राकडे आठवड्यातून एकेक वेळ जेवणाची कल्पना पुढे आली. संपर्क वाढतच राहिला. विद्यार्थी वर्गात काम करण्याची जास्त गोडी लागली. आपणातही संघटन घडवून आणण्याचे गुण आहेत हे लक्षात आले. हळूहळू लहानमोठ्या सभा नि पदयात्रा या गोष्टी नेहेमीच्याच झाल्या. नागपूर जिल्ह्याच्या सर्वोदय मंडळाचे अध्यक्षपदही आपोआपच चालत आले. कधी दोन दोन सांज उपाशी राहून, तर कधी ब्रेडचे चार तुकडे दोन ग्लास पाण्याबरोबर पोटात कोंबून, तर कधी चवक फुटाणे फाकून हा सर्वोदयी अध्यक्ष आपल्या मस्तीत आणि सेवाकार्यात गुंग होता. पाच वर्षे झाली; दहा झाली, पंधरा झाली. सेवेत कोठेही कसूर नाही. पण तरीही जनमानसाची झोप चाळवली गेल्याचे कोणतेच चिन्ह या पिराला दिसत नव्हते. आता हा पुन्हा अंतर्मुख बनला. विचार करू लागला. विचार कर-करून डोके फुटायची वेळ आली. ती धर्माधर्मातील भांडणे, तो द्वेष, तो मत्सर – असह्य होत होतं सारं. का आहे हे असं, कोणत्या धर्मातील तत्त्वे अशी आपापसात भांडणे करायला सांगत आहेत. हिंदु, मुस्लीम, ख्रिश्चन, की बौद्ध ? की साऱ्याच धर्मांना हवी आहेत ही भांडणे ? याच्यासाठी आवश्यक होता या साऱ्या धर्मांचा मनःपूर्वक अभ्यास. तो करण्याची जिद्द या पिरात पुरेपूर होती. तशी शपथ घेऊन हा पीर लगोलग मोकळाही झाला. पण–पण हिंदू धर्म संस्कृत भाषेत बंद, इस्लाम धर्म उर्दू भाषेत बंद, तर बौद्ध धर्म पाली भाषेत बंद. या पिराला तर येत होती फक्त इंग्रजी भाषा. त्याने तावडतोब गाठला एक पंडित नि एक मौलवी. सकाळी संस्कृतचा अभ्यास तर सायंकाळी उर्दू-अरेबिक भाषांचा अभ्यास सुरू झाला. आठ-दहा महिन्यातच भरपूर प्रगती झालीही. या वेळपर्यंत बायबलचाही अभ्यास पूर्ण होत आला होता. आता कुराणाचा नि हिंदूंच्या धर्म-ग्रंथांचाही अभ्यास सुरू झाला. आता पिराच्या डोळ्यात चमक दिसायला लागली. या कोणत्याच धर्मात कोणतेच तत्त्व वाईट नाही हे त्याला माहीत झाले. मानवधर्माची महती भगवद्‌गीतेत सांगितली आहे हे त्याला माहीत होते. कुराणात नि बायबलमध्येही हेच सांगितले आहे हे त्याला आता समजले. पीर विचार करायला लागला. असे आहे तर मग का होताहेत ही भांडणे, या मारामाऱ्या, या लढाया, ही मंदिरांची तोडफोड आणि हे विध्वंस. पीर गेला विनोबाकडे आपली व्यथा मांडायला. विनोबा म्हणाले, 'येणारा काळ विज्ञानाचा आहे, धर्मांचा संकुचित विचार करणारे सारे नष्ट होणार आहेत विज्ञानाच्या दैदिप्यमान प्रकाशाच्या किरणांनी. हिंसा आणि विज्ञान यांचा संयोग म्हणजेच सर्वनाशाला आमंत्रण. पण या विज्ञानाला हिंसेऐवजी जर अध्यात्माची जोड दिली जाईल तर मात्र त्यातून सर्वोदय होईल. ही अध्यात्माची शिकवण भगवद्‌गीतेत दिली आहे आणि म्हणूनच लहान-मोठ्या श्रीमंत-गरीब, हिंदू-मुस्लिम, ख्रिश्चन-बौद्ध, स्त्री-पुरुष या साऱ्यांना हे भारतीय तत्वज्ञान – ही भगवद्‌गीता पुन्हा शिकविली जाणे आवश्यक आहे.' विनोबा बोलत होते आणि त्यांचे विचार या पिराच्या काळजाला जाऊन भिडत होते. आपल्या या शिष्योत्तमाबद्दल विनोबांना खात्री होती. त्याच्या मनाची होत असलेली चलबिचल विनोबांनी जाणली होती. ते पुढे म्हणाले, 'तूच का नाही घेत हे काम अंगावर ? जन्मभर हेच काम पुरेल. वेडा पीर तसा शहाणा होता. आपल्या मर्यादांची त्याला बरोबर जाण होती. थोडा विचार केला नि त्याने लगेच उत्तर दिले, 'आपण म्हणता तर मी एक वर्षभर हे काम अंगावर घेतो. त्यापेक्षा जास्त मात्र नाही.' विनोबांनी थोडा नेट धरला. पण शिष्य ऐकत नाही हे पाहून म्हणाले, 'हरकत नाही – वर्ष तर वर्ष. झाले. भगवद्‌गीतेचा नि विनोबांच्या गीताईचा पुन्हा नव्याने अभ्यास सुरू झाला. सारे भारतीय तत्वज्ञान गीतेत ओतप्रोत भरले आहे हे पिराच्या

लक्षात आले. अस्सलाचाच फक्त या ग्रंथाने आदर केला आहे. चमत्कारांना कटाक्षाने दूर ठेवले आहे हेही *त्याच्या लक्षात आले.*साऱ्या भारतीय सत-महात्म्यांना स्फूर्ती देणारा हाच ग्रथ आहे हेही त्याच्या लक्षात आले. आणि त्यातून आकाराला आली – गीताई पदयात्रा.

दोन ऑक्टोबर १९७२ ला गांधीजयतीच्या मुहूर्तावर स्वतःच्या नागपूर जिल्ह्यापासूनच पिराने या यात्रेला सुरुवात केली. ७३ ची गाधी जयती आली नी गेली. पण पदयात्रा सुरूच राहिली. नागपूर जिल्हा झाला, भडारा झाला, वर्धा झाला, आता चद्रपूरही झाला. साडेतीन हजार किलोमिटर अतर थंडी, वारा, पाऊस, ऊन, कश्शाकश्शाची पर्वा न करता या पिराने आतापर्यंत काटले आहे. चारशे गावात घरोघरी फिरून शाळा–कॉलेजात जाऊन, सभा समेलनात जाऊन, त्याने गीताईचा दिव्य सदेश दिला आहे. आता पिराने यवतमाळ जिल्हा जवळ केला. 'फक्त एकच वर्ष मी गीताई पदयात्रेकरिता देईन. त्यापेक्षा जास्त नाही.' असे विनोबाना निग्रहपूर्वक सांगणारा नी त्याची इच्छा न जुमानणारा हा पीर आता म्हणतो आहे, 'मी साऱ्या महाराष्ट्रात फिरणार.' १२ वर्षांपर्यंत कोणी दिली या पिराला ही स्फूर्ती? गीतेने? पीर म्हणतो नाही. मग सतांनी? पीर म्हणतो नाही.' मग कोणी विनोबानी? छे, छे पीर म्हणतो नाहीच. 'ही प्रेरणा मला मिळाली या जनतेकडून.' जनतेकडून मिळालेल्या नि मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाचे किती अजब अजब किस्से आहेत या पिराजवळ. आपला विश्वासही बसत नाही. धर्म ही अफूची गोळी मानणाऱ्या पक्षाच्या किती एक लोकानी तन, मन, धन ओतून या पदयात्रेत भाग घेतला आहे, किती एक मुस्लीम बाधवांनी स्वतः होऊन गीताईच्या प्रती घरोघर वाटल्या आहेत. किती एक ख्रिश्चनानी सभा समारभातूनही या पिराचे तोड भरून कौतुक केले आहे. चद्रपूर जिल्ह्यांत पदयात्रा गेली आणि याकुबभाईला या पिराच्या गीताई प्रेमाने भारून टाकले नि आपल्या पदयात्रेत सामील करून घेतले. सागायच्या तरी किती हकिगती. नागपूरच्या सेट्रल जेलमध्ये या पिराने गीताईवर प्रवचन केले. किती एक कैद्यांच्या डोळ्यांतून अश्रूधारा सुरू झाल्या. अध्यक्षस्थानी कमिशनर गवई साहेब होते. प्रत्येक जिल्ह्यातील कैद्यांसमोर अशी प्रवचने व्हावीत असा मी प्रयत्न करीन असे त्यानी लागलीच आश्वासन दिले नि ते पाळलेही. या पिराला थोडे बाजूला घेऊन ते आणखी म्हणाले, 'हे पहा– मी सरकारी अधिकारी आहे हे विसरा. आणि या सबधात कोणतेही काम असले तर लगेच मला सागा. मी तुमचा आहे.' असा आहे हा पीर. झपाटून टाकणारा. एकदा विनोबा त्याला म्हणाले, 'हे पहा, तुला चहा सोडला पाहिजे.' ते एक शक्य नाही. मी दोन वेळ चहा घेणारच. फार तर जास्त घेणार नाही.' पीर ताडकन बोलला. दोन वर्षे झाली. भाऊ, बहिणी, नातलग कश्शाकश्शाची पर्वा न करता हा पीर एकटा सारखा भटकत आहे. 'परवा वणीला मुक्काम होता. पीर सागत होता, 'प्राचार्य शेवाळकरानी खूप मदत केली. तेथील भगिनी वर्गाची सभाही आठवण राहील अशी झाली. सभेनतर काही भगिनींनी प्रश्न विचारण्याचीही हिंमत दाखविली.' भगिनी वर्गाकडून या पिराच्या फार फार अपेक्षा आहेत. पण साऱ्या भगिनी वर्गाची काळजी घेणारा हा पीर हक्काच्या भगिनीवर मात्र अन्याय करतो आहे, आणि करीत रहाणार आहे. हा वेडा भाऊ कुठे भटकत आहे याची माहिती काढीत परवा त्याची बहीण त्याला वणीला भेटून गेली. चद्रपूर जिल्ह्यात दौरा चालू होता. बायबल, कुराण, गीताई यातील दाखले देत देत पदयात्रा पुढे सरकत होती. [या भागात बौद्ध धर्मीय बरेच आहेत. त्यांच्यासाठी दाखले हवे होते बौद्ध धर्मातील. पण त्या धर्माची तर पिराला फारशी माहिती नव्हती. आणि ती मिळवायची तरी कशी. त्याच्यासाठी हवा होता आधी पाली भाषेचा अभ्यास. झाले पाली भाषेची पुस्तके लगेच मागविली गेली. रोज काही वेळ काढून पीर पाली शब्द गिरवू लागला. दोनच महिन्यात त्याने लहान लहान वाक्ये वाचण्यापर्यंत नि त्यांचा अर्थ सागण्यापर्यंत मजल मारली आहे. आतापर्यंत ज्या ज्या जिल्ह्यात हा पीर गेला त्या त्या जिल्ह्यात त्याने आपला ठसा उमटविला आहे आणि प्रत्येक जिल्ह्यानेही त्याला एखादा तरी कार्यकर्ता पुरविला आहे. शामरावजी उघडे, मारोतराव तरोणे, याकुबभाई ही सारी मडळी अशीच वेडी आहेत. आज भटकत आहेत आणि पुढेही भटकत रहाणार आहेत. भल्या सकाळीच गावात प्रवेश करून शक्य होतील तितक्या सभा घेणार आहेत. ग्रामपचायतीत जाणार आहेत, पच–सरपंचांना भेटणार आहेत, शाळा, महाविद्यालये यांच्या विद्यार्थ्यांसमोर आपले मन उघडे करणार आहेत, शक्य झाले तर प्रत्येक ठिकाणी महिलांची वेगळी सभा घेणार आहेत आणि शिवाय रात्रीच्या जाहीर सभाही होणार आहेत. हे होऊन वेळ उरलाच तर घरोघरी गीताईचा प्रचार करणार आहेत, आणि हे सारे झाल्यानंतर सारा गाव पहाटेच्या साखर झोपेत असताना आपली पडशी उचलून पुढच्या गावाला चालू लागणार आहेत, नि तोडाने म्हणणार आहेत,

'गीताई माउली माझी,
तिचा मी बाळ नेणता'

**–प्रा. पां. शं. माईणकर**


# श्रीग्रामायन

**प्रसिद्ध झाले** **लेखक** **राजहंस प्रकाशन**

**मूल्य पंधरा रुपये** **श्री. ग. माजगावकर** **पुणे ३०**

# सोलकढी

## □ 'कलासक्त' शशी मेहता

आधीच्या जन्मात ज्यांनी विशेष पुण्य केले आहे त्यांना राहण्यासाठी परमेश्वराने भूतलावरच्या काही क्षेत्राची निवड केली असावी महामुबईतले उपनगर दादर हे असे एक क्षेत्र आहे. दादरकराना, मुबईत राहण्याची सगळी सुखे अलगद लाभतात; मुबईत राहण्याची सगळी दु खे, दादर टाळून, अवतीभवती कोसळतात. दादरला शिवाजी पार्क-चौपाटी आहे; दोन्ही रेलमार्गाचे स्थानक आहे; बसचे मुबलक मार्ग आहेत; भाजी-मासळीचे लहानमोठे बाजार आहेत; पाहिजे ती वस्तू देणारी दुकाने आहेत, लागेल ती करमणुक करणारी करमणुककेंद्रे आहेत; सास्कृतिक भूक भागवण्यासाठी अनेक सार्वजनिक व खासगी सस्था आहेत.

अशा खासगी सास्कृतिक सस्थापैकी एक म्हणजे 'कलासक्त'. अलीकडे एका कार्यक्रमाच्या निमित्ताने, या सस्थेचा परिचय 'महाराष्ट्र टाईम्स'ने लोकाना करून दिला होता. 'कलासक्त'ला घटना नाही; भांडवल नाही; वर्गणी नाही, निवडणुक नाही, कार्यकारी मडळ नाही; अहवाल नाही; वार्षिक सर्वसाधारण सभा नाही; ठराव नाही. 'कलासक्त'ला एक शशी मेहता आहेत. यात सारे आले.

शशी मेहता व्यवसायाने वास्तुशास्त्रज्ञ आहेत. पेट्रोलच्या किंमती वाढल्यावरसुद्धा ज्याअर्थी त्यानी मोटार फुकून टाकायची भाषा काढली नाही त्याअर्थी त्यांचा व्यवसाय बरा चालत असावा. पोटापाण्यापेट्रोल पुरती प्राप्ती त्यांना होत असावी. व्यवसाय नेटका करून उरलेला सारा वेळ ते 'कलासक्त' असतात. सगळे काही (नीट)नेटके करायची आदतच त्याच्या हातामनाला जडलेली आहे. इंचभर इकडे तिकडे सरकलेल्या घरच्या वस्तू जशा ते तत्परतेने जागच्याजागी ठेवतात तशा तोल बिघडलेल्या सस्था—सघटनांना बरोब्बर तोलावर आणतात. काही अडलेबिघडले की मडळी मेहतांकडे धाव घेतात.

त्यामुळे मेहतांच्या शिवाजी पार्कच्या घरी नित्य माणसांची थारोळी पडलेली असतात. तेथे जायला वेळकाळ लागत नाही हे सगळयांनी नीट ध्यानात धरले आहे. बरे या दुखऱ्या दिवसातसुद्धा, मेहतांकडे, चहाच्या जागी जेवणाचा आग्रह होतो. जेवणासाठी आपल्याला तेथे शिताफी वा मुत्सुद्दीपणा दाखवायची जरूरी पडत नाही. पाच मिनिटाकरता जावे आणि चारपाच तास बसावे असा प्रकार इतक्या वेळा घडतो की आता मी तिथे चारपाच तास बसण्याकरताच जातो. तेथे गप्पा चालतात; गाणी झिमझिमतात, चर्चा झडतात; उपस्थितांची आणि अनुपस्थितांची टवाळीटिमकी होते; वादवादगे उसळतात; नकला चालतात; कथाकथन रगते; नवनव्या योजनांच्या रगीत पुड्या सोडल्या जातता; लहानमोठे कार्यक्रम निश्चित होतात—या सगळयाचे मोठे कल्पक सूत्रचालन शशी मेहता करत असतात. म्हणजे प्रत्येकाला खुलवून, चाललेला विषय रमणीय करायची एक अवघड हातोटी त्याना साधून गेली आहे.

तसा अगी नाना कळा असलेलाच माणूस आहे हा. साहित्य-सगीत-नृत्यनाटच-शिल्प-चित्रादी कलाबद्दल त्याला ओला जिव्हाळा. प्रवासाची अनावर ओढ. निसर्गप्रेम याला फार काळ घरात ठेवू शकत नाही. पण या सगळयापेक्षाही त्याची माया आहे माणसावरती. माणसे समजून घेण्याचा नसता छद याला लागला आहे त्यामुळे शशी मेहता कायम माणसाच्या गराड्यात असतात. त्यांच्यावर आपला काही खास हक्क आहे; त्याचे आणि आपले काही खास पीठमीठ आहे; तेच एकटे आपल्याला कसे आरपार ओळखतात; असे प्रत्येकाला कसे काय वाटते, याचा मला हेवायुक्त अचबा वाटतो. अहो, चागले शिगाडे आणि बेरकी साहित्यिक (पुनरुक्तीबद्दल क्षमस्व), तुमच्यामुळे मी माणसात आलो, तुम्ही माझ्यातला कलावत जगवलात, असे ओक्साभोक्षी कबुली जबाब शशी मेहताजवळ विश्वासाने व मन.पूर्वक देऊन मोकळे होतात. आणखीनसुद्धा काय काय मोठ्या उमाळयाने त्याना सागतात. काही काळात, पाण्यात नावा सोडाव्या तशा या गोष्टी, शशी मेहता दोन-पाचहजार कानात सहज सोडून देतात.

गोष्टी सांगणे हे शशी मेहतांचे व्यसन आहे. ऐकलेल्या आणि वाचलेल्या गोष्टी नव्हेत; घडलेल्या. गोष्टी घडताना तेथे नेमके हजर असण्याची एक सिद्धी त्यांना प्राप्त झाली आहे. घडलेल्या गोष्टीचे निवेदन बारीकसारीक तपशीलानिशी आणि साभिनय पद्धतीने ते असे काही रगवून सोडतात की आपण ती गोष्ट वीस-पचवीस वेळा विनाकटाळा सहज ऐकू शकतो. काही जाणकार मित्रमडळी शशी मेहतांना, 'रगभूमीवर न आलेला नटसम्राट, असे म्हणतात.

या सगळया परिस्थितीमुळे, शशी मेहता ही माझ्या लेखी एक व्यक्ती नसून प्रवृत्ती आहे कारण असे शशी मेहता मी विलेपारल्याला, डोंबिवलीला, पुण्याला, नागपूर-औरगाबादेला, सावतवाडीला, दिल्ली-मद्रास-कलकत्त्याला पाहिले आहेत. क्योटो, कैरो, कौलालपूर, कोलबो, पेकिंग, ताश्कद, नॉर्मंडी, लिस्बन, आदिसअबाबा, रिओदिजानिरो, हेलसिंकी, म्यूनिच, इत्यादी पृथ्वीवरच्या आणि शुक्रचद्रादी आकाशातल्या ठिकाणी, योग येईल तेव्हा, शशी मेहता आपल्याला भेटतील अशी माझी खात्री आहे.

म्हणूनच, २२ ऑगस्ट १९७४ रोजी, शशी मेहेताच्या मित्रमडळीने त्यांची जी जन्मचाळीशी भल्यामोठ्या प्रमाणावर साजरी केली ती कोणा शिवाजी पार्क, मार्ग क्रमाक तीन, दादर-मुबई ४०००२८ येथे राहणाऱ्या, १२४६ क्रमाकाची अँबेसेडर मोटर वापरणाऱ्या, आठ नबरच्या चपला घालणाऱ्या, २२ ऑगस्ट १९३४ साली जन्मलेल्या शशी मेहता नावाच्या ! एका व्यक्तीची नव्हती; त्या कलासक्त प्रवृत्तीची होती.

□

## □ भारतीय लोकशाही वयात आली–

महाराष्ट्र विधिमंडळात थोड्या दिवसांपूर्वी बऱ्यापैकी गंमत उडाली होती. अजूनसुद्धा ती तेवते आहे. देशभर पसरलेल्या अशा वेगवेगळया पातळयांवरील मंडळातून लोकशाहीच्या खेळाचे प्रयोग धामधूमधडाक्याने चालू आहेत. या खेळांना प्रेक्षकवर्ग मर्यादित असतो; किंबहुना हे नाटक तसे नवेच असल्यामुळे प्रेक्षकच आलटून पालटून नट व प्रेक्षक होतात. या खेळांची जी समालोचने छाप्यात येतात त्यांच्यावरच तुम्हा आम्हाला समाधान मानावे लागते. समालोचनांवरून एक गोष्ट मनावर ठसते : ती अशी की भारतीय लोकशाही आता वयात आली आहे.

हल्ली हे वयात येण्याचे प्रकरण, समीक्षकांमुळे, फार सार्वत्रिक झाले आहे : मराठी नाटक वयात येते; एखादा कवी– एखादी कवयित्री वयात येतात; कोणतातरी कुटिरोद्योग वयात येतो; आयात निर्यात धोरण वयात येते; कुटुंबनियोजनाची मोहिम वयात येते; प्राथमिक-माध्यमिक औच्चमिक शिक्षण वयात येते; आभाळ किंवा क्षितिज वयात येते; सेन्सॉरशिप वयात येते.

एखादे माणूस वयात येताना त्याच्यात कितीतरी शारीरिक व मानसिक बदल घडत असतात : त्याचा आवाज फुटतो; तारुण्यपीटिका ठसठसतात; एकीकडे आत्मप्रदर्शन तर दुसरीकडे आत्मगोपन करावेसे वाटते; शरीरामनात कसलेसे अनामिक काहूर माजते; कोणालातरी एकाचवेळी कुरवाळावेसे व ओरबाडावेसे वाटू लागते. भारतीय लोकशाहीच्या तनुमनात असेच काहीसे बदल होताहेत हे विधिमंडळातल्या तिच्या विलोल विभ्रमांवरून सहज लक्षात येऊ शकते.

महाराष्ट्र विधिमंडळात, सत्ताधारी पक्षाने रॉकेल व शिधावाटप आणि रोजगार यांच्याबद्दल ठाम आश्वासने द्यावीत (आणि ती खरी करून दाखवावीत) यासाठी विरोधी पक्ष खनपटीला बसले. आश्वासने मिळेपर्यंत कामकाज रोखण्याचे धोरण त्यांनी जाहीर केले आणि अंमलात आणले. सरकारबरोबर विरोधी पक्षाच्या दीर्घकाल वाटाघाटी झाल्या. वाटाघाटी निर्वेध चालाव्या म्हणून सभापतींनी एक दिवसभर विधिमंडळ बंद केले. परंतु विरोधी पक्षाला हवी होती तशी आश्वासने सत्ताधारी पक्षाने दिली नाहीत. म्हणून विधिमंडळात पुन्हा अडवणूक सुरू झाली. तेव्हा २४ विरोधी सदस्यांचे सभासदत्व, अधिवेशन संपेपर्यंत, निलंबित करण्यात आले. मग त्यांनी सत्ताधारी पक्षाच्या मंत्र्यांना आणि आमदारांना सभागृहात जायला अटकाव करायचा प्रयत्न केला. त्यामुळे जे व्हायचे यथास्थित झाले; म्हणजे सगळे होऊन खरे काहीच झाले नाही. हे देखील काही पंडितांच्या मते, वयात येण्याचेच लक्षण होय.

माझ्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वामुळे आणि चतुरस्त्र व्यासंगामुळे जिज्ञासू मंडळी काही ना काही अवघड प्रश्न मला विचारून आपले शंकानिरसन करण्याचा प्रयत्न नेहमीच करत असतात. त्याची मला, अगदी दादुमियां-एवढी नसली तरी, बऱ्यापैकी सवय झाली आहे.


महाराष्ट्र विधिमंडळात काही दिवसांपूर्वी जे घडले त्याने माझा मित्र चिप्पलकट्टी भलताच अस्वस्थ होऊन गेला. माझ्याकडे येऊन, थर्थरत्या आवाजात त्याने विचारले, "अनंतराव, हे सगळे काय आहे ? कशामुळे होते आहे ?"

लोकशाही वयात आल्याची ही लक्षणे आहेत, हे मी त्याला समजावून सांगितले. मी सांगितल्यामुळे त्याला ते पटले. तरी त्याला आणखी नेमके स्पष्टीकरण हवे होते. तेही मी लगेच दिले. मी म्हटले, "हे सगळे जे होते आहे त्याचे एक सूत्रमय कारण मी सांगतो :

विरोधी पक्ष वैफल्यग्रस्त आहेत.
सत्ताधारी पक्ष साफल्यग्रस्त आहे !"

–अनंतराव





# केळ्याच्या मळ्यातील स्वामी महाराज

लेखक : केनेथ अँडरसन

अनुवाद : का. धों. देशपांडे

## उत्तरार्ध

दुपारी जागा झालो. डब्यातले सार्डीन मासे व उटकमंडहून आणलेल्या चपात्या खाऊन घेतल्या. चहासाठी आधण ठेऊन पुढे काय करावे याचा विचार करीत बसलो.

साधूच्या त्या चमत्कारीक गोष्टीवर मी क्षणभरही विश्वास ठेवीत नसलो तरी एकंदर प्रसंगाची मालिका ज्या तऱ्हेने घडत गेली होती त्याने मी चांगलाच बुचकळ्यात पडलो होतो. साधू म्हणतो की वाघाच्या रूपात असताना त्याने मला व बुराला पाहिले व काळवीट मिळाला नसता तर आम्हापैकी तो एकाला खाणारही होता. बरे, काळवीट तर नक्कीच मारले गेले होते. मी स्वतः त्याच्या मरण्याच्या वेळचा आक्रोश ऐकला होता. पण हे सर्व या सैतानाला कसे माहीत झाले ? तो वाघ तर नक्कीच झाला नव्हता. कोठल्याच मानवाला ते शक्य नाही. या बाबतीत तीन स्पष्टीकरणे शक्य होती एक दुसऱ्या कोणीतरी त्याला हे सांगितले असले पाहिजे. दुसरे तो रानात स्वतःच पाळतीवर असला पाहिजे. व त्याने हे सर्व पाहिले, ऐकले असले पाहिजे. तिसरे...छे ! पण त्याचा विचारच नको. तो वाघच त्याचा बातमीदार असला पाहिजे.

जवळपास नरभक्षक वाघ, रानटी हत्ती वावरत असताना कोणाचेही रात्री बाहेर पडण्याचे धाडस होणार नाही. व म्हणून दुसऱ्या कोणीही साधूला सांगितले असणे शक्यच नाही. बुराच्या बाबतीत म्हणावे तर रात्रभर तो माझ्यापाशीच होता.

शेवटी एकच शक्यता उरली. साधू रात्रभर आमच्यावर लक्ष ठेवून होता. काळविटाच्या त्या किंकाळ्या त्यानेही ऐकल्या होत्या. आणि हे जर खरे असेल, साधूला आपण मानतो. त्याच्या धैर्याची कमाल आहे. बाजूला नरभक्षक फेऱ्या घालीत असताना व रात्रभर निःशस्त्र अवस्थेत आमच्यावर पाळत ठेवावयास तसलाच असामान्य माणूस हवा.

आता काय घडले असावे हे कळावयास फार वेळ लागला नाही. हा साधू निव्वळ संधीसाधू होता. मात्र तो तितकाच हुशार व धाडसी पण होता. साहजिकच ज्यावेळी त्याला इरीलांकडून कळले की आपल्याबरोबर या बेरकी वाघाचेही आगमन या प्रदेशात झाले आहे तेव्हा त्याने अतिशय धूर्तपणाने असे वातावरण व परिस्थिती निर्माण केली की तो हिंस्त्र पशू व साधू यांच्यात अतिशय निकटचे मैत्रीचे संबंध आहेत असा लोकांच्यात समज पक्का व्हावा. यामुळे या भागातील त्याची प्रतिष्ठा व महत्त्व खूप वाढणार होते. त्याची आयुष्यभर कायमची राहण्याची व खाण्यापिण्याची सोय आरामात होणार होती.

यानंतर घडलेले प्रसंग त्याला पाहिजे होते तसेच घडून आले. कंठाने त्या वाघावर गोळी झाडली. वाघ जखमी झाला असेल किंवा नसेल. त्याचवेळी साधू पण जखमी झाला किंवा ही गोळीबाराची हकीकत कळल्यावर त्याने स्वतःला जखम करून घेतली असेल. पट्टी, रक्ताचे थेंब वगैरेचे नाटक केले असेल. पण या प्रसंगामुळेच लोकांना वाटले, साधू व वाघ एकच आहेत. साधूला केव्हाही वाघाचे रूप घेता येते. या समजामुळे साधूविषयी दरारा, भीती, आदर आता त्यांच्या मनात कायमचा राहणार होता. व त्याच्या जोरावर साधूचे भौतिक प्रश्नही पण सहजगत्या सुटणार होते.

नंतर वाघ नरभक्षक बनला. साधूने याही गोष्टीचा फायदा घेतला व १०० रुपयांचा तनखा व इतर गोष्टींची तरतूद करून घेतली. समजा, वाघाने आणखी माणसे मारली की हा पण पैसा व वस्तूच्या रुपातील आपले हप्ते वाढविणार. एकंदरीत साधूला ही परिस्थिती फारच लाभदायक वाटली यात नवल नाही.

पण त्याच्या या भाड्यामध्ये माझ्या येण्याने सगळा घोटाळा झाला होता. त्याचे सगळे बेत आता फिसकटणार होते. जर वाघाला टिपण्यात मला यश आले आणि हा जिवंत राहिला तर तो आणि वाघ एकच आहेत ही इरीलांची समजूत उन्मळून

पडणार होती. त्याच्या प्रतिष्ठेला मोठा तडा जाऊन अन्न व संपत्ती दोघानाही त्याला मुकावे लागले असते. केळीच्या बागेचा मालक पहिल्या झटक्याला त्याला हाकलून देणार होता. लोक त्याला पैसेही देणार नव्हते व केळी, घट्ट शर्करामिश्रित साय पसरलेले दूध ? छे छे नावच नको. सगळे सगळे जाणार होते.

तेव्हा काहीही करून मला हुसकून लावावयासच पाहिजे व या दृष्टीने साधूच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. बरे, सकाळीच आमची चागली झकाझकी झाली होती. तेव्हा साधू माझ्याविरुद्ध काहीतरी करणार असे मला वाटू लागले.

खरोखर दैवयोगाने किंवा कसेतरी जर मला काही झाले तर या साधूचा केवढा फायदा होणार होता ! त्याचे महत्त्व व प्रतिष्ठा अगदी आभाळाला पोहोचेल. लोक म्हणतील, "काय साधूची ताकद अफाट आहे हो ! आपल्या इच्छेप्रमाणे हा वाघाचे रूप तर घेतोच पण स्वत च्या शक्तीने एका गोऱ्या शिकाऱ्याचाही नायनाट केला आहे!"

दोन अतिशय कठीण अशा शत्रूशी एकाच वेळी माझी गाठ पडली होती. एक नरभक्षक वाघ व दुसरा खऱ्याखोटयाची कसलीही चाड नसलेला, उलटया काळजाचा मानव, आणि यापैकी मानव जास्त धोकादायक होता, कारण तो विचार करू शकत होता. माझ्या हालचालीचा योग्य अर्थ लावून तो त्याविरुद्ध बदोबस्त करू शकत होता. इरीला माझ्या हालचालीची त्याला माहिती देऊन नकळत त्यालाच मदत करीत होते. त्या उलट नरभक्षकाच्या मदतीला त्याच्या नैसर्गिक प्रवृत्ती व जगलामधील त्याचे कौशल्य एवढेच होते. त्याला तर्कबुद्धी, विचारशक्ती वगैरे काहीही नव्हते.

त्यामुळे या दोघाच्याही बदोवस्तासाठी जे जे करावयाचे ते मला एकटयालाच करावे लागणार होते. माझ्याबरोबरच्या बुराला देखील विश्वासात घेण्याची सोय नव्हती. बुरा माझ्याशी एकनिष्ठ होता हे खरे आहे तरी पण या लोकांची अंधश्रद्धाळू भीती व सैल जीभ यामुळे जरा इकडचे तिकडे होताच हे लोक आपापसात सर्व काही बोलून टाकण्याची भीती होती व साधूला माझ्या योजना कळण्यास मग किती वेळ लागला असता !

बऱ्याच दिवसानतर पहिल्या प्रथम नरभक्षकाविरुद्ध आघाडी उघडावी असे मी ठरवले. वाघाला मारण्यात यश मिळाले की साधूची प्रतिष्ठा आपोआपच कोसळून पडणार होती.

चहा घेतल्यानतर बुराला घेऊन मी जवळच्या पट्टीमध्ये त्या रात्री बाधावयास लागणारी दोन रेडक विकत घेण्यासाठी गेलो.

पण साधूने या लोकाना अगोदरच चिथवले होते. तेथील गुराखी मला एक देखील रेडकू फुकट किंवा विकत देण्यास तयार नव्हते.

मी त्याची खूप समजावणी केली. पण या व्याघ्ररूपी मनुष्याला मारले तर देवाचा आमच्यावर प्रचड कोप होईल असे त्यानी आडून सुचवले.

बऱ्याच ठिकाणी फिरल्यावर एका म्हाताऱ्याने हळूच सांगितले की, रेडक हवी असतील तर १५ मैलांवर असलेल्या मासिनीगुडी या वस्तीवर आम्ही जावे. तेथे ती मिळतील. म्हाताऱ्याचे म्हणणे ऐकणे भाग होते.

सध्याकाळच्या आत मासिनीगुडीला जाऊन येणे आता अशक्य होते. आजची रात्रही काही न करता फुकट घालवावी लागणार होती.

खरे म्हटले तर वाघाच्या शिकारीलाच मी योग्य वेळेला आलो नव्हतो. चद्र पहाटे उगवत असल्यामुळे त्याच्या प्रकाशाच्या काहीही फायदा होणार नव्हता. जनावर बाधल्याशिवाय नुसते झाडावर अधारात बसूनही काही फायदा होणार नव्हता. तेव्हा मासिनीगुडीला जाऊन जनावर मिळवण हा एकच मार्ग उरला होता. व त्याचाच अर्थ पुन्हा एकदा आंब्याच्या झाडाखाली रात्र काढणे हे ओघानं आलच.

यावेळी मी आणि बुरा आम्ही लवकर त्या झाडाखाली गेलो. खूप सरपण गोळा करून ठेवले. मोठमोठे ओडके व फाद्याच्या सहाय्याने अगदी सकाळपर्यंत चागली मोठी शेकोटी ठेवण्याची व्यवस्था आम्ही केली.

सध्याकाळी सधीप्रकाशात सावल्या लावलचक व्हावयास लागल्या. तशी आम्ही शेकोटी पेटवली. कारण यावेळी देखील वाघ दबा धरून बसला असण्याची शक्यता होती. नदीच्या काठावर बाबू, जांभूळ, आवे यांची जी झाडे होती त्याच्या लांब लांब सावल्यांमुळे धूसर वातावरण पसरले होते. प्रकाश झपाटयाने अपुरा होत होता. याचा फायदा घेऊन कदाचित वाघाने आपल्यावर हल्ला केला असता. म्हणून आम्ही शेकोटी लवकरच पेटवली.

निरनिराळया पक्षांचे परिचित आवाज ऐकावयास येत नव्हते. याचे साधे कारण म्हणजे माझे लक्षच तिकडे नव्हते. रात्र पडावयाच्या आत जास्तीत जास्त सरपण गोळा कसे होते हा प्रश्न व दुसरा विचार म्हणजे साधूने मला एकही रेडकू मिळू दिल नव्हत. आजची रात्रही त्याने माझी फुकट घालवली होती. यामुळे मी फार दुखावलो होतो. माझे चित्त त्या अपमानाचीच खत खात होते.

चक्...चक्...चक्...नदीच्या पळीकडून एक रातकीडा चित्कारला आणि त्यानतर अनेक जणानी त्या आपला आवाज मिळवला आणि चारी दिशेला ते सगीत घुमू लागले.

त्याच्या या सगीताला एका रात्रबगळयाने (Nightheron) दूरवर कर्कश ओरडून अडथळा आणला. त्याच्या पाठोपाठ घरी जाण्याची घाई असलेले गुराखी, ज्या तऱ्हेने गुराना साद घालतात अगदी तशा आवाजात, गुराखी पक्षाने साद घातली. म्हणूनच त्याला गुराखी पक्षी म्हणतात.

आठ वाजावयास आले. जगलात एकदम शांतता पसरली. कसलाही आवाज नाही. रातकिडे देखील ओरडावयाचे थाबले. गूढ, खोल अशा शांततेचे वातावरण चराचरावर पसरले. बुरा व माझ्याखेरीज सर्व जगल जणू रिकामे झाल्यासारखे वाटत होते.

अपूर्व, अनपेक्षित, जिवाचे पाणी पाणी होईल अशा प्रसगाची ती शांतता म्हणजे नादी होती. आमच्या दक्षिणेला नदीच्या प्रवाहाच्या जवळपास वाघाने लागोपाठ तीन वेळा जरा लहान आवाजात आरोळी ठोकली. आँ...आँघ...आँघ... !

पुन्हा शांतता. पण फक्त मिनिटभर. नतर आमच्या पश्चिमेकडील उटकमंडहून मासिनीगुडीला जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूने, फार मोठयाने नव्हे, पण कर्कश, बदसूर तरी स्पष्ट असा हसण्याचा आवाज आला...हाँ–हाँ–हाँ–हाँ–आहा...

माझ्या शेजारील बुरा भीतीने पार

थिजला होता तर भीतीने माझ्या कपाळावर घामाचे बिंदू जमून वाहावयास लागले होते.

आणि त्यानतर तेथील शाताता एकदम मोडली. 'विजेरी' व रायफल मी झटकन हातात घेतली व उडी मारूनच त्या भेसूर आवाजाच्या दिशेने धावत सुटलो. अतिमानुष, दैवी, चेटूक वगैरे सर्व विचार कोठल्या कोठे उडून गेले! साधूने अशा तऱ्हेने हसून फार मोठी चूक केली होती. नदीच्या पलीकडे ओरडलेला वाघ रस्त्याच्या या बाजूला एवढ्या थोड्या वेळात येणे अशक्य होते.

साधू मला भेव दाखवावयाचा प्रयत्न करीत होता वाघ ओरडल्याबरोबर त्याने आपले ते घोघरे कर्कश हास्य केले. हेतू हा की, आम्हाला वाटावे, हिंस्र पशूचे मानवात रूपांतर झाले त्याने हे असे हास्य केले व मी त्याचा हा डाव उघडकीस आणण्याच्या मागे लागलो.

विजेरीचे बिंब पुढे व मागे मी असे रस्त्याला जाऊन मिळणाऱ्या एका पाऊलवाटेने धावू लागलो. रस्त्याला लागलो. उजवीकडे वळलो की केळीची बाग व नतर झोपडी, एवढेच अतर राहिले होते. त्या लबाडाच्या अगोदर आपण झोपडीपाशी जावे अशा हेतूने मी जोरात धावत होतो.

पण साधू माझ्यापेक्षा चागलाच पळणारा ठरला. मी झोपडीपाशी आलो. अधार गुडुप होता. तो आल्याचे काहीही चिन्ह दिसत नव्हते. मी दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. पण तो आतून बद होता. बाबूच्या त्या दरवाज्यावर मी हाताने थडा थडा मारीत राहिलो.

एक एक क्षण असह्य वाटत होता. थोड्या वेळाने झोपडीत दिव्याची फडफडणारी ज्योत दिसू लागली. ती जवळ जवळ येऊ लागली. मध्ये आणखी काही वेळ गेला. साधू बहुतेक दरवाजाची कडी उघडीत असावा. दरवाजा उघडला गेला. माझ्या समोर साधू उभा होता. यावेळी त्याच्या अगावर फक्त एक लगोटी व गळ्यात माळ होती.

त्याच्या चेहऱ्यावर मी विजेरीचा झोत टाकला. प्रकाश टाळण्यासाठी देखील त्याने पापणी लववली नाही. त्याच्या ओठातून छद्मी असे हास्य साडले. व तो म्हणाला, "गोरा माणूस वयाच्या मानाने चांगलाच पळतो की. पण त्या व्याघ्रराजाची जी अत्मिक शक्ती त्याला हसली, ती बदिस्त करता येईल असे त्याला वाटले की काय?

मोठ्या कष्टाने माझा राग काबूत ठेऊन मी म्हणालो,

"माझ्याहून बुढ्ढा असताना देखील तू माझ्यापेक्षा जोरात पळालास. पण एक काळजी घे. ते तुझे सोंग नरभक्षक वाघ तुला खाऊन सपविणार नाही एवढं मात्र बघ म्हणजे झाल."

आणि यावर तो काही उत्तर देण्याच्या आतच मी तेथून परतलो. बिचारा बुरा खूप घाबरला होता. एकही शब्द न बोलता एकप्रकारे धुसफुसतच आम्ही दोघे आमच्या नेहमीच्या जागेवर आलो. नरभक्षकाचा थोडादेखील बिचार माझ्या मनात यावेळी नव्हता. अत्यत लज्जास्पद रितीने साधूने दुसऱ्यादा मला 'मामा' बनवले होते.

दुसरी रात्रही आम्ही न झोपता काढली. त्या रात्री काहीही घडले नाही. तांबडं फुटल्यावर खूप थकलो असताही आज मासिनीगुडीला जाऊन तीन रेडक मिळवायचीच अशा निश्चयाने आम्ही निघालो.

रेडक मिळवावयास तेथेही त्रास झाला. बरीच घासाघीस करून दोन रेडक व एक तपकिरी रगाचा पाडा कसातरी मिळवला. तेथे वेळ न गमावता या तिन्ही जनावरांना घेऊन आम्ही आमच्या मुक्कामाच्या जागेवर आलो. तोपर्यंत दुपारचा एक वाजला. गेल्या दोन रात्री अक्षरश: आम्हाला एक क्षणभरही झोप मिळाली नव्हती. मी अतोनात थकलो होतो. आणखी पुढील रात्र जर जागावयाचे असेल तर थोडीतरी झोप घेणे आवश्यक होते. आणि नरभक्षक जवळपास असण्याची काळजी न करता, आंब्याच्या त्या झाडाखाली आम्ही आणलेली ती जनावरे बाधली व सरळ झोपी गेलो.

दुपारी बरोबर ४ वाजता मी जागा झालो. तीन तासाच्या त्या छोट्या विश्रांतीने थकण्याचे सावट कोठल्या कोठे उडून गेले होते. दिवसाचे २–२॥ तास उरले होते. तेवढ्यात काहीतरी तयारी करून त्या वाघाला आज भेटावयाचे असा मी निश्चयकेला.

आता नतर जे काम घडले ते कळण्यासाठी थोडीशी भौगोलीक माहितीची गरज आहे ती अशी–

निलगिरीची मुख्य पर्वतराजी आमच्या दक्षिणेला पूर्व-पश्चिम होती. या पर्वतराजीची एक लहानशी शाखा आमच्या पश्चिमेला दक्षिणोत्तर अशी पसरली होती. या लहान शाखेच्या पायथ्याला व समातर उटकमडहून मालिनीगुडीकडे जाणारा दक्षिणोत्तरच रस्ता आहे. या रस्त्याला विळखे घालीत मुख्य निलगिरी पर्वतराजीतून निघून पुढे म्हैसूर सरहद्दीकडे मॉयइनदीला जाऊन मिळणारा एक ओढा होता. हा ओढा व रस्ता याच्या दरम्यान चांगले किर्र रान होते. त्याची रुंदी काही ठिकाणी तर एक मैलापर्यंत होती. अर्थातच ओढ्याच्या दोन्ही बाजूला चांगलीच घनगर्द झाडी होती.

ज्या ठिकाणी या सर्व घटना घडत होत्या तो 'केळीचा मळा' हा निलगिरीच्या मुख्य पर्वतराजीच्या पायथ्याशी होता. येथून ती नदी किंवा ओढा जवळच होता. व नरभक्षकाचे ठाणे या भागातच कोठेतरी होते. कारण लागोपाठ दोन रात्री त्याची पहिली डरकाळी आम्ही या बाजूनेच ऐकली होती.

येथील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन बागेजवळच्या रस्त्यावर पहिले जनावर, या जनावराच्या पूर्वेकडे नदीच्या काठावर दुसरे अ पश्चिमेच्या बाजूला जी टेकडी दक्षिणोत्तर जात होती, तिच्या पायथ्याशी तिसरे आमिष जर बाधले तर वाघ कोठल्याही दिशेने आला तरी नक्कीच फसला असता.

यामध्ये अडचण एवढीच होती की ही तिन्ही जनावरे निरनिराळ्या ठिकाणी नेऊन बाधावयास आता वेळ नव्हता. तेव्हा राहिलेल्या वेळात कोठल्या तरी जागेची निवड करून त्या ठिकाणी घाईघाईने मचाण बांधणे एवढा एकच मार्ग माझ्यासमोर होता. बुराला मी बाकीची दोन्ही जनावरे घेऊन झोपडीतच सकाळपर्यंत बाधून ठेवावयास सागितले.

आता प्रश्न असा की जनावर बाधावयास सर्वात उत्तम जागा कोणती? गेल्या दोन रात्री वाघ नदीकडूनच आला होता. तेव्हा आज रात्री तो या रस्त्याने नक्कीच येणार नाही. तेव्हा रस्त्याच्या बाजूने किंवा कदाचित पश्चिमेकडील टेकडीतून तो येण्याची शक्यता होती. रस्त्याने तो आला तर झोपडीपाशी तो येईल. व आज सकाळीच

झोपडीपाशी आम्ही वाघाचे ठसे पाहिले होते.

तेव्हा मला असे वाटावयास लागले की आज रात्री वाघ बहुतकरून पश्चिमेच्या बाजूने टेकड्यातूनच उतरणार. अर्थात तसे नक्की काही सांगता येत नव्हते. एखादे वेळी तो साधूच्या झोपडीतूनही आला असता. हा नाहीतरी एक प्रकारचा जुगारच आहे. थोडासा तर्कनिष्ठ एवढेच. तेव्हा टेकडीच्या पायथ्याशीच जनावर बांधणे सर्वात बरे असे मला वाटावयास लागले.

फार विचार करण्यात अर्थ नव्हता. मी निर्णय तावडतोब घेतला. बुराच्या झोपडीपाशी तिन्ही जनावरे हाकीत नेली. तेथे दोन रेडके नीट बांधून ठेवली. वाघाला पाड्याचे निश्चित आकर्षण वाटेल म्हणून त्याला टेकडीच्या पायथ्याशी नेला. हे अंतर साधारणपणे मैलभर होते.

टेकडीपासून एक कोरडा नाला निघून नदीला मिळत होता त्या नाल्यात एके ठिकाणी साधारण दहा फूट खोलगट जागा होती. तेथील मऊ वाळूत वाघाचे आल्यागेल्याचे खूप ठसे आम्हास दिसले. त्यावरून वाघाची ही नेहमीची जाण्यायेण्याची जागा होती. व त्यावरून त्या रात्री तो तेथे येईल अशी मला जास्त आशा वाटावयास लागली.

या ओढयाच्या किनाऱ्यावर वरच्या बाजूला एक 'इंडियन ओक' जातीचे झाड होते. त्याला जोडीजोडीने येणारी अशी खूप मोठी पाने असतात. झाडाला काटे नसतात व झाडाची साल इतकी खडबडीत असते की त्यामुळे दोरही खूप चांगला बांधता येतो. या सगळ्या गोष्टीमुळे मचाण बांधावयास हे झाड उत्कृष्ट होते. या झाडाच्या बुध्यापासून साधारण १५ फुटावर, पण नाल्याच्या जवळ पाडा बांधावयाचे ठरले. त्यामुळे नाल्याच्या तळातून येणाऱ्या कुठल्याही वाघाला तो दिसू शकला असता.

सुदैव असे की साधारण दहा फूट उंचीवर झाडावर मचाणाला उत्कृष्ट जागा मिळाली. तेथे तीन फांद्या फुटणारा एक बेचका होता. पाने मोठी असल्यामुळे झाकण्यासाठी काही निराळी व्यवस्था करावी लागणार नव्हती. तेथल्या वेलीनीच चौकट विणून काढली व अशा तऱ्हेने आमचे मचाण तयार झाले.

हे सारे होईपर्यंत संध्याकाळचे साडेपाच वाजले. आता उशीर होऊन चालणार नव्हता. झाती काही शस्त्र न घेता बुराला मोकळे परत जावयाचे होते. दुसरे म्हणजे असे की डोंगराच्या उतारावर कोठे वाघ असेल तर, आम्ही झाडाकडे चाललो आहोत हे त्याला दिसणे शक्य होते. याचे दोन वाईट परिणाम झाले असते. तो जर पुरेसा धाडसी असेल तर सरळ मचाणावर हल्ला करण्याची शक्यता होती. तो जर भित्रा असेल तर या रात्रीच नव्हे तर पुन्हा केव्हाही या भागात आलाच नसता.

ज्या ठिकाणी मी झाडावर बसलो त्या ठिकाणापासून सोयीस्कर अशा ३० फुटावर बुराने एका खुटाला पाडा बांधला. त्याच्या मृत्यूला आपण कारणीभूत होत आहो म्हणून मनापासून त्याने त्याला साष्टांग नमस्कार घातला. तेथील मातीला आपले कपाळ घासले आणि घाईघाईने तेथून तो निघून गेला.

पश्चिमेकडील टेकाडातून सूर्य केव्हाच दिसेनासा झाला होता. सहा वाजता संध्याकाळच्या लांब लांब सावल्या पडावयास लागल्या, वाघ टेकाडाच्या बाजूने येण्याची शक्यता म्हणून, झाडाच्या बेचक्यात त्या बाजूला मी तोंड करून बसलो होतो. माझ्या मागच्या बाजूला नदीच्या पात्रातून एका हत्तीने मोठ्या आनंदाने तुतारी फुकली. तो बहुतेक आंघोळीची मजा लुटीत असावा. जंगलातील निरनिराळे पक्षी त्या हत्तीच्या प्रचंडपणाची तमा न करता एकसुराने ओरडत होते. माझ्या वरच्या बाजूला काळ्या तोंडाची व लांब शेपटाच्या वानराची एक फौजच बसली होती. मोठ्या आनंदाने ती चित्कारत होती.

हुऽऽफ...हुऽऽफ असे ती ओरडत होती. व त्याचे प्रतिध्वनी परतत होते. त्या कळपातील माद्या व पिले चीक् चीक्...असा चित्कार काढीत होती. मला त्या वांदराचा मोठा हेवा वाटला. किती निर्धास्तपणे ती जगत होती! आयुष्य जगणे ही त्याना मुळीच जबाबदारी वाटत नव्हती. त्यांच्या दृष्टीने तो एक आनंद होता. खाली जमिनीवर त्याच्यावर एखाद्या बिबळ्याची किंवा वाघोबाची बुभुक्षित नजर असेल पण त्याना त्याची परवा नसते. आपल्यातील एकावर विसबून ती सर्व वांदरे या झाडावरून त्या झाडावर मोठ्या स्वच्छंदपणे वावरत होती. पण हा एक कोण? त्यांच्यातीलच एक. तो मात्र आपले टेहळणीचे काम चोख करीत असतो. झाडाच्या सर्वात उच शेंड्यावर बसून जमिनीवरील शत्रूची अगदी बारीक अशी संशयास्पद हालचाल किंवा आवाज तो वादर अचूक टिपतो, व आपल्या बांधवांना लगेच सावध करतो.

आणि सूर्य मावळावयाच्या आतच या पहारेकऱ्याने सावधगिरीची सूचना दिली. हा हा हार्-हार् हाहार्र्र्...पलीकडील बाजूने थंडहवेबरोबर हा पुकारा पण आला.

या वादर पहारेकऱ्याने कामगिरी तर उत्तमच बजावली होती. इतस्ततः बागडणारी इतर सारी वांदरे आपापल्या जागी स्तब्ध झाली. एवढेच नव्हे तर तेथेच चरणारे एक ठिपक्या ठिपक्याचे हरीण देखील त्या आवाजाने सावध झाले. व विशिष्ट एओ एऽओ असा आवाज काढीत निवाऱ्यासाठी धावत सुटले.

त्या वादराने मलाही सावध केले. नरभक्षक येत आहे हे मलाही समजले. त्याच्या येण्याच्या दिशेचा अदाज अचूक ठरला याचा मला खूप आनद झाला.

थोडी दुरुस्ती. अंदाज अचूक ठरला असे मला वाटले. माझ्या समोर असलेल्या टेकडीतून वाघाने ओरडून आपले अस्तित्व दाखविले. आँव आँऽऽव आँव...

पण वाघोबा पुढे आलाच नाही. जवळ जवळ पंधरा मिनिटे वांदर पहारेकरी सूचनेचा आवाज काढीत राहिला. व गप्प झाला, त्याच्या मागोमाग हरीणही ओरडावयाचे थांबले.

अधार झपाट्याने पडत चालला होता. नाल्यातून आलेल्या वाघाची आकृती केव्हाही दिसेल म्हणून समोरच्या गडद अधाराकडे मी डोळे फाडफाडून बघत होतो.

थोड्याच वेळाने तशी एक आकृती दिसलीही. पण ते अस्वल होते. पिकलेली फळे गोळा करण्याच्या कामात ते बेट इतके गुंगल होत की नरभक्षकाची किंवा झाडावर बसलेल्या माझीही त्याला चाहूल नव्हती.

नतर किर्र रात्र पडली. दिवसभराची तापलेली हवा वर जाऊन त्या जागी पर्वतावरील गार हवा वाहू लागली. थंडी खूप वाजावयास लागली. काकडून गेल्यामुळे

अंग अवघडून आल्यासारखे झाले. थंडीने दात कुडकुडू नयेत म्हणून मला मोठे कष्ट करावे लागत होते.

आणि एकदम माझ्यामागे कसलीतरी हालचाल झाली असे मला वाटले. अत्यंत नाजूक मऊ अशा बोटांचा स्पर्श माझ्या मानेला झाला. जे कोणी होते ते माझ्या खांद्यांवर चढले.

मी बघण्यासाठी मान वळवली. दोन इंचाचे डोके व त्यामध्ये भेदरलेले अत्यंत करुण असे डोळे माझ्याकडे बघत होते. एककर शरीर सहा इंच उंचीच्या ठेंगू माणसाएवढे होते.

नेहमी रात्री फिरणारे व दक्षिणेत नेहमी सापडणारे लॉरीस नावाचे माकड होते ते.

जाता जाता सहज आठवले म्हणून सांगतो आदिवासी जमातीकडून या प्राण्याचा फार क्रूर छळ केला जातो. या प्राण्याच्या मोठ्या पाणीदार डोळ्याने म्हणे गुप्त रोगावर रामबाण उपाय करता येतो. त्यासाठी हे गरीब प्राणी पकडले जातात. व जिवंतपणी त्याचे डोळे काढले जातात! त्यानंतर ते मारले जातात. व पुढील औषधोपचार म्हणून खाल्ले जातात. डोळ्याचा उपयोग करावयाचा तर ते डोळे जिवंतपणीच काढले पाहिजेत असा या लोकांचा विश्वास असतो. दुर्दैव बिचाऱ्यांचे. काही काही प्राण्यांचा खरोखरच मानवाकडून फार छळ होतो!

मी मान फिरवली व लॉरीस दिसेनासा झाला.

शांत अशा त्या काळ्याकुट्ट अंधारात एक एक तास अगदी रेंगाळत ओढल्यागत चालला होता. पर्वतावरून येणाऱ्या थंडगार वाऱ्याशिवाय त्या जंगलात चैतन्याची जणुकाही, कोठलीच निशाणी उरली नव्हती. अधूनमधून नाल्याजवळील झाडावरून रातकिड्यांचे चिरपणे ऐकू येई. एकदा माझ्या अंगावरून गेलेला थंडगार वारा एका गव्याच्या नाकात शिरला व माणसाच्या चाहुलीने तो चटकन ओरडला!

आकाश अगदी निरभ्र असून त्यात लाख तारे पेटले होते. त्यांच्या प्रकाशामुळे गडद अंधार बराच कमी झाला होता. माझ्या समोर पसरलेल्या जंगल व बाजूच्या शांत देखाव्यावर एक धूसर असा प्रकाश पसरला होता.

शेवटी बराच काळ असलेली ती शांतता एकदाची नष्ट झाली. माझ्यापाठीमागे दरीच्या दिशेला निरनिराळ्या विसवादी आवाजाचा गदारोळच उडाला होता. उऽऽह्–हुऽऽह्– ओ व्हे अर– ही यर... या–ह... कितीतरी आवाज!

एका कोल्ह्याच्या कळपाचा तो आरडाओरडा होता. अन्नाच्या शोधात सारी कंपनी निघाली होती. त्यांचा नेता विशिष्ट पद्धतीने प्रथम आवाज काढी. व बाकीचे त्याप्रमाणे अनुकरण करीत.

पण नंतर एकदम या कळपाचा आवाज थांबला. Dead Silent! एकदमच चिडीचूप! काय झाले त्यांना? मी आश्चर्याने विचार करू लागलो.

पण या प्रश्नाचे उत्तर मला पांच सेकंदातच मिळाले. त्या जागी ही कोल्ह्याची टोळी उच्च स्वरात ओरडत होती तेथूनच घनगंभीर गर्जना उसळली.

आँ...घ–उ...आँघ–आँ...आँघ–

टेकडीवरून वाघ खाली आला. मी बसलो होतो तेथूनच तो गेला त्याच्या आवाजावरून तो आता रस्त्याच्या आसपास, केळ्याची बाग किंवा साधूच्या झोपडीजवळ असणार.

वेळेच्या अभावी रस्त्याच्या कडेला मला जनावर बांधता आले नाही याचे मला फार वाईट वाटले. सुरवातीस खरोखर तेथेच जनावर बांधावे असे माझ्या मनात आलेही होते. पण त्याला काही आधार नव्हता एवढे मात्र खरे.

वाघ आता साधूच्या झोपडीपासून ओरडत होता. झाडावरून सरळ उतरावे व तेथे धावत जावे असे मला वाटू लागले. वाघ माझ्यापासून मैलभर अंतरावर होता. म्हाताऱ्या बुराने जी हकीगत सांगितली त्यावर नकळत माझा अर्धवट विश्वासही बसला असेल. पण आता साधू झोपडीत आहे की नाही हे पहावे असे माझ्या मनात फार आले.

मी झाडावरून उतरून झोपडीच्या दिशेने निघालो. वाघ अजूनही ओरडत होता. तो पर्यंत त्याच्या अकस्मात हल्ल्यापासून मी सुरक्षित होतो. त्या अगोदर तासभर चंद्रही आकाशात उगवला होता. व त्याच्या प्रकाशात सध्याकाळी मी जी पाऊलवाट तुडवली होती ती आता अस्पष्ट का होईना पण दिसत होती.

मी झोपडीपाशी पोहोचलो. तेवढ्यात पूर्वेकडून रस्त्याच्या बाजूने वाघ गर्जला. झोपडी अंधारात बुडून गेली होती.

आतमध्ये साधू असेल का? मी झोपडीपाशी अगदी सावकाश गुडघ्यावरच गेलो. कुडाच्या भिंतीला कान लावला. पण आतून कसलाही आवाज आला नाही. झोपल्यावर घोरण्याचा किंवा श्वासाचाही आवाज येत नव्हता. झोपडी बहुतेक रिकामीच असावी.

यावेळी वाघाने पुन्हा एकदम मोठी डरकाळी फोडली. आता तो अगदी जवळ होता. केळीच्या बागेपलीकडून साधारणतः एक फर्लांगावरूनच तो येत असावा.

आणि मला एकदम कल्पना सुचली. तिच्या गुणदोषाची चिकित्सा करीत न बसता मी ती अमलात आणण्याचे ठरविले.

तोंडावर दोन्ही हातांचा 'स्पीकर' करीत मी फुफ्फुसामध्ये खच्चून हवा घेतली. व त्याच वाघाच्या डरकाळीचे अनुकरण केले. ही विद्या जंगलातील एका आदीवासी मित्राने मला शिकवली होती.

"आँ. आँघ...आँऽऽघ आँऽऽघ..." मी ओरडलो.

नंतर मात्र मी गप्प राहिलो. कारण दुसऱ्यादा ओरडण्याने माझी त्याला नक्की जागा समजली असती. व आवाजातील खोटेपणाही त्याला कळला असता. झोपडीच्या मागेच मी दबा धरून बसलो. माझी आवडती व विश्वासू ४०५ रायफल मी अर्धवट खांद्यावर घेतलीहोती. रायफलच्या नळीला जो ३ सेलचा टॉर्च जोडला होता त्याच्या कळीवर माझ्या डाव्या हाताचा अंगठा अलगद ठेवला होता. वाघाने पुन्हा गर्जना दिली नाही त्याने जो आवाज ऐकला होता त्या दिशेने तो सरळ चालत निघाला होता. तो माझ्याकडे येणार यात संशय नव्हता.

सर्वत्र गूढ, खोल अशी शांतता पसरली होती. एक प्रकारे ती बोचतच होती. मला कारण सांगता येत नव्हते पण काहीतरी अमंगल, असे घडणार असे मला वाटू लागले. तसे का वाटावे हे आश्चर्यच होते. झोपडीच्या कोपऱ्यात मी सुरक्षीत होतो. चंद्रप्रकाश सर्वत्र झिरपला होता. त्या प्रकाशात अगदी स्पष्ट जरी नसले तरी बरेचसे मला दिसत होते.



त्या धावत्या माणसावर डरकाळचा फोडीत वाघाने हल्ला केला व एक-दोन झेपेतच त्याला पकडले

एक दोन मिनिटं अशी गेली असतील व मग एकदम अनपेक्षीत ते घडले. ज्या दिशेने वाघ ओरडत होता नेमक्या त्याच दिशेने केळीच्या झाडातून एक मानवी आकृती बाहेर पडली. आणि माझ्याकडेच धावत येऊ लागली. तो एक माणूसच होता. सुरवातीस तो नग्न आहे असे वाटले पण जवळ आल्यावर त्याने एक लंगोटी घातल्याचे माझ्या लक्षात आले.

तो मनुष्य माझ्याकडे येत आहे असे मला वाटले पण तो झोपडीकडे धावत येत होता कारण मी ज्या ठिकाणी बसलो होतो तेथून त्या माणसाला दिसणे शक्यच नव्हते. तो धावणारा माणूस साधूच होता.

बाप रे! त्याच्या येण्याचा अर्थ माझ्या लक्षात आला आणि काही काळ माझा श्वासच थांबला. काही मिनिटापूर्वीच रस्त्याच्या बाजूने वाघाने डरकाळी फोडलेली मी ऐकली होती आणि नेमक्या त्याच ठिकाणाहून आता साधू येत होता.

म्हणजे जे एकले, ते खरे होते तर. स्वतःच्या डोळचाने कोणीही पाहिले नसेल असे विलक्षण दृष्य मी बघत होतो. दुसऱ्याच क्षणी ह्या गूढ चमत्काराला मोठा धक्का बसला. काळी जादू नष्ट झाली!

त्या धावत्या माणसाच्या मागूनच लहान लहान डरकाळचा फोडीत वाघाने हल्ला केला. एक दोन झेपेतच त्याने त्या माणसाला पकडले. त्या दुर्दैवी माणसाने जी प्राणांतिक आरोळी ठोकली ती आजही माझ्या कानात घुमते आहे. अय्यो ऽऽऽयो... योऽऽऽ... तो किंचाळला. आणि तेवढेच. बाकी काही नाही.

त्या माणसावर नरभक्षकाने उडी टाकली व गवताच्या आड दोघेही दिसेनासे झाले. अनपेक्षीतपणे या घटना घडल्याने मी जमिनीला खिळल्यासारखाच झालो होतो. पण सर्व काही माझ्या लक्षात आले. आणि जेवढे जोरात धावता येईल तेवढचा जोरात मोठचाने ओरडत मी निघालो. ओरडण्याचा हेतू एवढाच की त्यामुळे वाघ कदाचित पळून जाईल व स्वामीला वाचवता येईल.

आता फक्त ३०-४० यार्ड अंतर राहिले होते. धावत असतानाच मी टॉर्च पेटवला. फक्त १५ यार्डावर असतांना वाघाचे चमकते डोळे मला दिसले. पालथ्या पडलेल्या आपल्या भक्षावर तो दवा धरून बसला होता.

काहीही विचार न करता मी थांबलो व त्या भयंकर डोळचामध्ये नेम धरून बार टाकला. वाघाने अर्धवट उडी मारली. त्याच ठिकाणी मी पुन्हा गोळी झाडली. वाघ

कोसळला व भयकर वेदनेने तडफडू लागला.

त्यावेळी माझ्या लक्षात आले की वाघ त्या माणसाच्या अगावरच कोसळला आहे. त्याखाली तो सबंध झाकाळूनच गेला आहे. मला भयंकर भीती अशी वाटू लागली की वाघाला अगदी जवळून अशा ज्या तीन गोळ्या मी मारल्या त्या चुकून खाली असलेल्या माणसाच्या शरिरातही घुसल्या असतील.

आता काय करावे ? मी वाघाजवळ गेलो. तो अजूनही तडफडत होता. मी पायावर उकिडवा झालो व दोन यार्डावरून आणखी एक गोळी त्याच्या मुडक्याच्या मागच्या बाजूला हाणली. त्या गोष्टीने त्याचे अगोदरच चेचलेगेलेल्या डोक्याचा पार चेदामेदा झाला. आणखी एक मिनिट गेले व त्याची वळवळ थांबली. नतर मोठ्या कष्टाने त्या वाघाला मी त्या माणसाच्या अगावरून ओढून काढले.

साधू रक्तात अगदी न्हाऊन निघाला होता. माझ्या अगावर एक थडगार अशी शिरशिरी उठली. मी त्या माणसाला गोळ्या घातल्या याची मला खात्रीच होती. तो जमिनीकडे तोंड करून पालथा पडला होता. श्वासोच्छ्वास किंवा इतर कोठलीही त्याची हालचाल नव्हती. रायफलच्या बॅरलच्या क्लीपमधून मी झटकन टॉर्च काढला व त्या प्रकाशात त्याच्या शरिरावर गोळ्यांची भोके कोठे दिसतात का ते मी पाहू लागलो. तशी ती सापडणार याची मला खात्रीच होती. सर्व शरीर मी अतिशय काळजीपूर्वक पाहिले. माझे हात थर थर कापत होते. कोठेही गोळ्याच्या खुणा सापडल्या नाहीत. कदाचित शरिराच्या दुसऱ्या बाजूला असतील म्हणून मी स्वामीला उलथ केले.

त्यावेळी सावकाश जडपणाने साधूने डोळे उघडले. टॉर्चच्या प्रकाशात नरभक्षकापेक्षा देखील द्वेषाने ते चमकत होते. त्याचे ओठ हालू लागले म्हणून मी ते ऐकण्यासाठी खाली वाकलो. अस्पष्टपणे, अडखळत तो म्हणाला,

"गोऱ्या माणसा, अखेर तू जिंकलास. परतु आज रात्री आकाशातील ग्रह मला अनुकूल नव्हते. वाघाने माझा जीव घेतला. पण तू...तूदेखील अशाच तऱ्हेने मरशील आणि त्या दुसऱ्या वाघाच्या जबड्यातून मी तुझ्या मृत्यूचीच वाट पहाणार आहे."

आणि थोड्या वेळापूर्वी 'केळीच्या बागेतील तो नरभक्षक जसा मेला तसाच 'केळीच्या बागेतील' हा साधूही मेला.

जे घडले त्याचे स्पष्टीकरण सोपे आहे. त्या रात्री माझ्या हालचाली मी अतिशय सावधगिरीने केल्याने साधूला त्याचा काहीच थागपत्ता लागला नाही. रस्त्याच्या पलीकडून ज्या वेळेस नरभक्षक वाघाने ओरडावयास सुरुवात केली त्याच वेळी बैरागी झोपडीतून त्या दिशेने गेला. वाघ जोपर्यंत डरकाळ्या देत होता तोपर्यंत वाघाचाही पत्ता लागत होता व आपणही सुरक्षित आहोत असा त्याने विचार केला. खरे म्हटले तर माझा ठावठिकाणा शोधून काढून आदल्या दोन रात्री त्याने माझी जशी फजिती केली तशीच त्याही रात्री करावयाचा त्याचा विचार होता.

मध्यतरी त्याला कल्पना नसता मी माझे मचाण सोडले व त्याच्या झोपडीपाशी आलो. तेथे वाघाच्या डरकाळीची नक्कल केली. त्यावेळी साधू रस्त्याच्या आसपास कोठेतरी असावा. वाघाच्या दोन गर्जना, एक त्याच्या समोर व दुसरी त्याच्या कोठे तरी मागे ऐकल्यानतर साधूला वाटले की दोन वाघ समोरासमोर आले आहेत व त्याच्यातील कोठला नरभक्षक आहे हे न कळल्यामुळे साधू घोटाळ्यात पडला व चक्रावून गेल्यामुळे काय करावे हेच त्याला कळले नाही. शेवटी सुरक्षिततेसाठी तो आपल्या झोपडीकडे पळत सुटला व त्यामुळे खऱ्या नरभक्षकाच्या तावडीत सापडून त्याने आपला प्राण गमावला.

मी वस्तीत परत आलो. बुरा अजूनही जागा होता.

"मी वाघाला मारले." मी जाहीर केले.

"आणि साधू कोठे आहे, दोराई?" बुराने मला विचारले.

मी खांदे उडवले. "तोदेखील मेला आहे." मी घराच्या कुपणावर बसत म्हणालो.

बुराने मोठ्या समाधानाने मला विचारले, "आता तरी विश्वास बसला ना?"

"मी त्याला मारण्यापूर्वीच वाघाने त्याला ठार मारले." मी हसत म्हणालो.

विस्फारलेल्या डोळ्यानी बुरा माझ्याकडे काही क्षण टक लावून बसला

"का...काय? साधू आणि वाघ अशी दोन निरनिराळी प्रेते आहेत?"

"निश्चितच." मी उत्तरलो.

"साधू किंवा वाघ यापैकी एकाचेच प्रेत नाही याची खात्री आहे ना?"

"अगदी निश्चित. तू आणि मी जसे निरनिराळे आहोत तशी ती अगदी निरनिराळी प्रेते आहेत." मी जरा ठसक्यातच म्हणालो.

आजूबाजूच्या झोपड्यातून सर्व माणसाना बोलावून बुराने ती बातमी ओरडून सागितली व एक दोन मिनिटात दहा बारा भयभीत इरीला आमच्या भोवती जमले

"बघूनो," तो मोठ्या गर्वाने म्हणाला, "आमच्या दोराईने वाघ आणि साधू दोघानाही ठार मारले."

मी एकदम दचकलो व मध्येच म्हणालो, "मूर्खा, वाघाने साधूला मारले व मी वाघाला मारले असे मी तुला सागितले."

"चला चला, आपण बघू या." असे सर्वजण उत्साहाने म्हणाले.

थोड्या वेळात आम्ही त्या शोकातिकेपाशी पोहोचलो इरीलाना एवढा आनद झाला की त्यानी तेथेच नाचावयास सुरुवात केली. त्या रात्री त्याचे दोन भयानक शत्रू, एक त्यांना खाणारा नरभक्षक व भीतीने मरेपर्यंत त्याची गाजणूक करणाणा साधू दोघेही नष्ट झाले होते.

बुराने अजूनही अर्धवट उघडे असलेल्या साधूच्या डोळ्याकडे पाहिले. "तू......" आणि एवढेच तो म्हणू शकला.

नंतर त्याने त्याला एक कचकचीत शिवी दिली.

# समाप्त

# ...पण बडोद्यातील शासन आता चांगले झाले आहे. अर्थात याचे श्रेय DET त्रिकोणास

दादूमिया

गुजराथेत जे 'नवनिर्माण आंदोलन' झाले त्याचे मूळ कारण गुजराथेतील जनतेस भ्रष्टाचाराचा कटाळा, नव्हे मनस्वी तिटकारा आला होता. कोठून हे स्वातंत्र्य मिळाले आहे व या राक्षसांच्या तावडीत सापडलो आहोत असे जनतेस वाटू लागले व म्हणून त्या आंदोलनास जनतेचा उत्स्फूर्त पाठिंबा लाभला. लाखा डाकू १९४२ साली मावळकराच्याबरोबर कैदेत होता. कै. दादासाहेब मावळकरानी कैदेतल्या आपल्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत. लाखा दरोडेखोराची आठवण भयंकर आहे. लाखाने दादासाहेबांना सागितले होते, 'आम्ही तर केवळ चोर आहोत, पोटासाठी चोऱ्या करतो. पण आम्हाला जी एक नीती आहे, तेवढीही नीती तुमच्या या पाढऱ्या टोपीवाल्यामध्ये मला दिसत नाही! उद्या याच्या हाती राज्य आले म्हणजे हे लोक हा देशसुद्धा विकायला कमी करणार नाहीत!'

दादासाहेब मावळकराचे मनोधैर्य वाखाणण्यासारखे होते. आपल्या १९४२ च्या सहकाऱ्याविषयी जनतेचे मत काय आहे ते त्यांनी न घाबरता व्यक्त केले आहे.

नवनिर्माण आदोलन संपत आले होते त्यावेळी मी राजपालांच्या सरीन ह्या खास ॲडव्हायसरची मुलाखत घेतली होती. आमच्या भेटीत आम्ही चार मुद्याची चर्चा केली. १. जनता का कटाळली आहे याचा विचार तुम्ही का करीत नाही? २. पोलीस Law व Order साठी आहेत का बेकायदेशीर गोष्टीना पाठिंबा व Disorder साठी? ३. जनतेची हिंसा प्रतिक्रियात्मक होती, कबूल, पण पोलिसाची हिंसा? ४. तुमच्या अधिकाऱ्याचे लाल फितीचे राज्य आता सुरू झाले म्हणजे 'आगीतून फुफाट्यात' अशी जनतेची भावना झाली नाही म्हणजे मिळविली.

परवा नुकतेच मी सरीनना पत्र लिहून कळविले की गुजराथेतील इतर शहराविषयी मला ठाऊक नाही पण बडोद्यातील शासन आता इतके चांगले झाले आहे की आमचेच आम्हाला आश्चर्य वाटते, पोलीस एवढे कार्यक्षम असू शकतात? अक्षरशः बडोद्यातील गुन्हे जवळजवळ नाहीसे झाले आहेत! अर्थात याचे श्रेय DET त्रिकोणास! डी म्हणजे एस. पी. दत्ता, ई म्हणजे इन्स्पे. एरुळकर व टी म्हणजे तुटेजा.

सरतेशेवटी मी सरीनना लिहिले, 'एक प्रख्यात दादा माझा पेशट आहे. सध्या बेकार झाला आहे. तो मला परवा म्हणत होता, थाबा ना, मिनिस्ट्री येऊ दे म्हणजे या दत्तास कच्छला पाठविण्याची व्यवस्था करतो! मला वाटते, या दादाचे शब्द खूप बोलके आहेत.'

दत्ता हे पजाबी तरुण अधिकारी (पोलीस सुप.) आहेत. मेहसाणा प्रांत म्हणजे जणू गुजराथेतील सातारा! मै-शहाणा, जो तो स्वतःला शहाणा समजतो. पोलीस अधिकाऱ्यास शिक्षा म्हणून तिकडे धाडतात. पण दत्तानी तेथे असे वर्चस्व व दरारा स्थापन केला की पुसू नये. 'पण एवढे करून मिळविले काय', त्यानी मला विचारले, 'तर माझ्या सर्व्हिसबुकात वाईट शेरा! दत्तानी गुन्ह्याची संख्या खाली आणली, जिल्ह्यात सुरक्षितता व स्थैर्य आणले, तरीपण—त्यांना वेळची किंमत समजत नसल्यामुळे ह्या गुणावर पाणी पडते.'

'हा आमच्या आय. जी. पी. साहेबाचा शेरा. दुसरे काहीच लिहिता येत नाही वाईट, म्हणून हे 'तरी पण 'चे शेपूट. पोलिसाचे तसेच अधिकाऱ्याचे vested interests असतात, त्यामुळे माझ्यासारख्याच्या efficiency चा त्याना त्रास होतो, अडथळा वाटतो.'

'पण जनतेला तुमच्या कार्यक्षमतेचा विलक्षण अभिमान वाटतो.'

'आहे ना, जनतेला आमच्या चागल्या कामाची कदर आहे, म्हणून तर आम्ही सारी दुखे, साऱ्या अडचणी पचवू शकतो. जनतेला सुखकर्ता, दुःखहर्ता देव लागतोच कोणीतरी! माझ्याविषयी खऱ्याखोट्या गोष्टी कितीतरी पसरल्या आहेत. एका ठिकाणी तर माझी मिरवणूक काढून केवढा मोठा सत्कार केला.'

बडोद्यातील सिनेमाचा काळा बाजार तुम्ही बद कसा करू शकलात?'

'सिनेमाचा काळा बाजार हा गुन्ह्याच्या यादीत फार मामुली गुन्हा आहे. तो बद करणे फार सोपे आहे. लोक उघडपणे म्हणत येथेही पोलिसाना हप्ता मिळत असावा! ते अर्थात खोटे आहे. एवढ्या मामुली गोष्टीत पोलीस आता हप्ता खात नाहीत! अर्थात या कॅंपेनमध्ये स्थानिक वृत्तपत्रानी आम्हाला खूप मदत केली. त्यांना ह्या सिनेमाच्या जाहिरातीचे चागले उत्पन्न असते. आज आमच्या थिएटरवर पोलीस रेड आली, अशा बातम्या छापू नका वगैरे त्यानी दम द्यायला सुरुवात केली पण हे वृत्तपत्रवाले दबले नाहीत.'

'पण हा काळाबाजार तुम्ही बद केलात कसा?'

मागे नवनिर्माणाच्या वेळी नटराज टॉकीजचा मालक आमच्याकडे तक्रार घेऊन आला होता की हे नवनिर्माणवाले म्हणतात, तिकिटाचे भाव खाली आणा नाहीतर आम्ही तुमचे नुकसान करू. मी त्यांना काळाबाजार करीत नसलात तर आम्ही तुमचे रक्षण करू असे आश्वासन दिले होते. नंतर मी या काळ्याबाजाराचा अभ्यास केला. हा काळाबाजार का होतो? एक तर व्यवस्थापक मडळी व काळाबाजारवाले याचे साटेलोटे असते. नाहीतर ही दादा मडळी व्यवस्थापक मडळीवर धाक दाखवून, दाव आणून तिकिटे विकत घेतात. हे जर खरे असेल तर आम्हाला तुम्ही दादा लोकाची नावे

सांगा, आम्ही त्यांना पकडतों असे आम्ही सिनेमावाल्यांना सांगितले. आणि ज्यानी नावे दिली त्या दादांना आम्ही पकडले देखील. पण अशा थिएटराची सख्या थोडी होती. एरवी सर्वत्र दोघे मिळून काळाबाजार करीत असत. म्हणून आम्ही युक्ती केली. एका रविवारी रात्री अशा सर्व थेटर्सवर आम्ही आमच्या अधिकाऱ्यांना उभे केले. तिकिटे बारीवरून विकलेली होती. सिनेमावाल्यांना पण आम्ही तेथे असल्यामुळे उघडपणे काळ्या बाजाराच्या भावाने ती बाहेर विकण्याची कोणाची हिंमत होईना. अशी हिंमत ज्यानी केली त्यांना आम्ही ताबडतोब पकडले. त्यादिवशी एखाद्या थेटरमध्ये तीस खुर्च्या खाली, दुसऱ्यात सत्तर, तिसऱ्यात पंचवीस अशी मजा आम्हास पहायला मिळाली. हे नुकसान काळ्या बाजारवाल्यांना रोज परवडण्यासारखे नव्हते. साहाजिकच, सूज्ञ मडळीनी आपला धंदा सोडला. थेटरवाल्यांना आम्ही बजावले, आम्ही रेड घालण्यासाठी रोज येऊ ! काही ठिकाणी तसे जावेही लागले. प्रेक्षक विचार करतात, आपण सिनेमा पहायला आलो आहोत का पोलीस तपासणी ? वृत्तपत्रानीही रेडसूची वर्णने देऊन या काळ्या बाजारवाल्यामध्यें भीतीचे वातावरण निर्माण करून ठेवले होतेच.'

'आणि हे दारूचे अड्डे व जुगार तुम्ही कसा बंद पाडला ?'

'हे मोठे गुन्हे होत. सिनेमा रोज किती जण पाहतात ? सहा लाखाच्या वस्तीत दहा हजार लोक. म्हणजे Affected लोकाचे प्रमाण कमी आहे. त्याच्याउलट हे दारूचे अड्डे व जुगार यांच्या सघटित टोळ्या बनल्या होत्या. त्यांची आर्थिक शक्ती प्रचंड होती. तिचे रूपातर चटकन राजकीय शक्तीत होई. खरे म्हणजे बुद्धीवाद्यानी मोठा निषेधाचा आवाज उठवून ह्या टोळयांना बंद पाडावयास पाहिजे. पण आपले बुद्धीवादी ? लाचार व असहाय्य दिसतात मला ते. प्रत्येक टोळीवाल्यामागे कोणीतरी राजकीय नेता व बुद्धीवादी मला आढळले. दया आली मला बुद्धीवाद्याची.'

'पण ह्या टोळ्या समाजास भयकर कशा ? दारू किती जण पीत असतील ? जुगार किती जण खेळतात ?'

'माझे एक निरीक्षण आहे. माणूस कामात व्यग्र असेल तर तो आजारी पडत नाही. मात्र त्याला रिकामा वेळ असला की तो काही विकृतीच्या मागे लागतो. तो भावाशी भांडेल, दारू पिईल, मुलीना सतावील. रिकाम्या वेळात चांगले व उपयोगी काम करणारे लोक विरळा. हे जुगारवाले व दारूचे अड्डेवाले लोक जवळ जवळ चोवीस तास रिकामेच असतात. दोन तास हिशेब व दहा तास झोप धरली तरी बारा तास तर रिकामेच ! मटकावाल्यांचे तसेच. सकाळी दोन तास काम, सध्याकाळी तीन तास काम, हिशेब तीन तास, झोप आठ तास—तरी आठ तास संपूर्णपणे मोकळे, ताजे व मस्तीत ! थोड्या वेळात खूप पैसा चटकन मिळतो. हाताखाली बरीच माणसे तैनातीला. त्यामुळे ह्या सघटित टोळ्याचा समाजास भयानक उपद्रव न झाला तरच नवल ! दंगे असो, लुटालूट असो, पटकन पैसा व माणसे धाडण्यास याची तयारी ! एरवी कोणत्याही क्षेत्रातला माणूस आठ तास काम केल्यानतर अशा उद्योगाकडे वळणार नाही, घरचे काम बघेल, वृत्तपत्रे वा मासिके वाचील. हे रिकामे लोक फावल्या वेळात पोलिसाशी दोस्ती ठेवतात. दोस्तीत पोलिसांची भीतीच निघून जाते.

'आमच्या विश्वविद्यालयातील, विशेषत: हॉस्टेलमधल्या मुली वेश्यागिरी करतात. ही मडळी आमच्याकडे बीमारी घेऊन येतात तेव्हा कळते. हे प्रमाण वाढत चालले आहे. ते तुम्ही कसे थांबविणार ?'

'प्रश्न अवघड आहे. हे Social Failure आहे. पोलीस या क्षेत्रात हतबल ठरतात. आम्ही धाड घालू शकतो, मौज मारणाऱ्या जोडप्यांना पकडू शकतो, पण तेथे आमच्यामागे कायदा उभा नाही. सार्वजनिक स्थळ किंवा करमणुकीची जाहीर जागा येथे ह्या मुलीनी धुमाकूळ घातला तरच आम्ही त्याना पकडू शकतो, शिक्षा देऊ शकतो. एरवी त्या म्हणू शकतात, हे शरीर आमचे आहे, त्याचे आम्ही काहीही करू ! दुर्दैवाने कायदा त्यांच्या बाजूचा आहे. 'शीला विरुद्ध भारत सरकार' हा प्रसिद्ध खटला तुम्हास माहीत असेल. ही शीला थेट हायकोर्टात लढली. मात्र वृत्तपत्रांनी मनात आणले तर ह्या गुन्ह्यास आळा बसेल.'

'कसा ?'

'ह्या प्रतिष्ठित मडळीना वर्तमानपत्रात नाव छापून येण्याची फार मोठी भीती वाटते. विशेषत: असल्या लफड्यात वर्तमानपत्रानी पोलिसांना मदत करावी.'

'मला एक शंका आहे. हा आपला कार्यक्षम शासन व्यवहार किती दिवस चालेल ? मिनिस्ट्री आली की पुन्हा भ्रष्ट अधिकारी तुमच्या जागी येतील, पुन्हा दादा लोकांना अभयदान मिळेल व मत्री आणि गुड याचे सयुक्त राज्य सुरू होईल. आम्ही तर रोज देवाजवळ प्रार्थना करीत आहोत की देवा, आम्हास निवडणूक व ते मत्री नकोत. तुम्हाला काय म्हणायचे आहे ?

'यावर मी काय म्हणणार ?' □ □

---


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे

किंमत सात रुपये

राजहंस प्रकाशन पुणे ३०

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## व्यथा त्याची आणि माझी

किराणा मालाचं एक दुकान. समोरच्या व्हरांड्यात धीरेंद्र रायचौधरी आपली पत्नी आणि दोन मुलांसह रोज झोपायचा. परवा सकाळी दिसलेलं दृश्य मात्र हृदयद्रावक होतं. मुल रक्ताच्या थारोळ्यात चिरनिद्रा घेत होती. जवळच तीक्ष्ण धारेचा रक्ताने बरबटलेला चाकू आणि आईवडिलानी विषप्राशन करून दारिद्र्याच्या जबड्यातून कायमच सुटण्याचा केलेला निष्फळ प्रयत्न. मग धावपळ झाली. पोलीस आले. धीरेंद्र व त्याची पत्नी ह्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले आणि मग चौकशी झाली

धीरेंद्रबाबू एका खाजगी कंपनीत स्टेनोग्राफरची नोकरी करीत असत. प्रतिष्ठित जीवन जगत असत पाच वर्षांपूर्वी नोकरी सुटली ती पुन: मिळालीच नाही. क्वालिफिकेशन असूनही उपयोग झाला नाही. ओढाताणीच्या जीवनात कशिबशी पाच वर्षे काढली व दारिद्र्याने ग्रासलेल्या जीवनाला कटाळून ते संपवण्याचे मार्ग शोधले आणि वरील घटना घडली.

दुर्दैवाची गोष्ट अशी की मरणाची इच्छा करूनही त्यांना ते प्राप्त झाल नाही. त्याच्या प्रकृतीत उलट सुधारणा होत आहे. ह्या बातमीने मन विषण्ण झालं. एक कॉलेजचा विद्यार्थी म्हणाला, कशाला त्यांना वाचवून त्यांच्या वेदना वाढवताहेत ? त्यापेक्षा त्याना मारून टाकल असत तर सुटले तरी असते बिचारे !

तरुण विद्यार्थ्याचं हे भाष्य विचार करायला लावणारं होतं. नोकरी मिळत नसली की माणसाला जीवन संपवून टाकण्याचं धाडस करण्याशिवाय दुसरा पर्यायच नसतो का ? उच्च शिक्षण घेतलेले अनेक पदवीधर नोकरीची आशा नष्ट होताच आत्महत्येला प्रवृत्त झाल्याची कैक उदाहरणे ताजी होती. परित्यक्ता स्त्रियाना सरळ मार्गाने जीवन जगणं अशक्य झाल्याकारणाने नाइलाजास्तव वाममार्गाचा अवलब करावा लागल्याची उदाहरणे देखील कमी नाहीत. गेले काही दिवस झाडूवाला देखील केविलवाण्या मुद्रेने टुमणं लावीत आहे – मला एखादी दुसरी नोकरी पाहून द्या, एवढ्याने माझ भिभत नाही.

सर्व बाजूनी एकच आवाज उफाळून प्रतिध्वनित होत आहे – नोकरी, नोकरी, नोकरी ! फार काय, वाचायला म्हणून समोर घेतलेल्या नाटकाच्या पुस्तकातसुद्धा नेमका हाच सूर, हेच पडसाद. याचा अर्थ माणसे काम करायला तयार आहेत पण आमच्या देशात त्यांच्यासाठी कामच नाही, असाच होतो.

मन विषण्ण करणारे हे विचार क्षणभर बाजूला सारण्याच्या उद्देशाने हॉर्टिकल्चरल बागेत फिरायला जावस वाटल. तेथील स्निग्धमधुर हवेचा स्पर्श सुखावह वाटू लागला. तेवढ्यात एका चित्रकार मित्राची भेट झाली. तो म्हणाला, 'हे बघ, गेल्या काही दिवसापासून एक विचार मला सारखा सतावतो आहे.' मला वाटले यालाही आपल्याप्रमाणे उद्विग्नता वाटत असावी. आपल्या भावनांमध्ये वाटेकरी असला की माणसाला कसं बरं वाटतं, नाही ? मी म्हटल, सांग मित्रा, तुझी व्यथा मला सांग. तीच बहुधा माझीही व्यथा असावी. त्याने यावर काय म्हणावे ? म्हणाला, 'काय सागू ? फुलामध्ये रग कोठून आले ?' हा प्रश्न मला सतत त्रास देत आहे. तुला याच उत्तर सागता येईल ?'

–'मूर्खा !' माझ्या तोंडून सहजगत्या शब्द बाहेर पडले. मला त्याची कीव आली. हा कलाकार असला म्हणून काय झाले ? तो माणूस सुद्धा आहेच ना ? जगातील सौंदर्याचा शोध घेण्यात याची नजर मग्न व्हावी आणि जीवनातील कारुण्य रंगांनी दूषित झालेल्या याच्या नजरेला का दिसू नये ? मला राहवले नाही. मी म्हटले, माणसा, नुसता अधांतरी चालू नकोस. अरे, जमिनीला पाय टेकव. उघड्या नजरेने भोवतालचं जीवन बघ. आणि नतर मी त्याला ती घटना सागितली. जे विसरू पहात होते ते उफाळून बाहेर आले.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे इतके दिवस ज्या धीरेंद्र रायचौधरीबद्दल अवाक्षरही ऐकले नव्हते त्याचा वर्तमानपत्रांनी फोटोसह परिचय करून दिला होता, एखाद्या हीरोसारखा. पण त्यासाठी त्याला मुलाचे खून पाडून व स्वत: विषप्राशन करून जबरदस्त किंमत द्यावी लागली. एवढ्याने तरी संपले का ? नाही. ते दोघे पतिपत्नी बरे झाले तरी खुनी म्हणून त्यांना शिक्षा भोगावी लागेल ती वेगळीच. एवढे सारे घडले त्यापेक्षा त्याला एखादी क्षुल्लक नोकरी मिळाली असती तर ?

आम्ही एकमेकाचा निरोप घेतला चित्रकार फुलाच्या रगाचा निरर्थक शोध लावण्यात पुनश्च गढला असावा आणि मी ? धीरेंद्रबाबूसारख्या अनेक लोकाबद्दल विचार करण्यात माझे मन उगाचच व्यग्र झाले ◻

## तेजसूर्याचे एक स्फुल्लिग

कोणे काळी रविंद्रनाथ मनातून खूप अस्वस्थ झाले होते. आपल्या स्फूर्तीचा झरा आटत चालला की काय अस त्यांना वाटू लागलं. कारण लागोपाठ पधरा दिवसात कल्पनेचा एकही पक्षी भरारी मारून गेला नव्हता. त्याची लेखणी एकही कविता प्रसवली नव्हती. ह्या अस्वस्थ मन:स्थितीतून बाहेर पडण्यासाठी ते आपल्या निवासस्थानातूनच बाहेर पडले. कलकत्त्याच्या सदर स्ट्रीटमधील त्याच्याच मालकीच्या घरात येऊन राहिले. दुसऱ्या दिवशी अगदी पहाटे सूर्यदेवाच स्वागत करण्यासाठी म्हणून ते व्हरांड्यात येऊन उभे राहिले. थोड्याच वेळात प्रकाशाची आभा उधळीत सूर्यदेव प्रगट झाले. त्यानी आपली एक किरणशलका थेट रविंद्रनाथाच्या हृदयात खुपसली. मनोभूमीत तो बाण घुसताच झऱ्याला तोड फुटलं. तो स्फूर्तीचा झरा वेगवान झाला. रविंद्रनाथाच्या लेखणीतून सुदर काव्याच्या ओळी झरझर उतरल्या.

–आणि नेमक्या ह्याच वेळी एका कवीचाही जन्म झाला. रविंद्रनाथ नावाच्या तेजसूर्याचं एक स्फुल्लिग निसर्गाच्या फुकरीनं फुलू लागल. वाढू लागल. त्या स्फुल्लिगाच नाव प्रणवेन्दु दासगुप्त. अवघे ३५–३६ वर्षे

वय असलेल्या ह्या कवीने २०० वर कविता आतापर्यंत रचल्या आहेत. त्याच्या ६० कवितांचा एक सग्रह इथे माझ्यासमोर आहे. पुस्तकाला नाव दिले आहे–'सदर स्ट्रीटेर बारान्दा.' हे नाव का दिल याच स्पष्टीकरण म्हणजे वर सागितलेली रविंद्रनाथाची गोष्ट. रविंद्रनाथाची हरवलेली स्फूर्ती परत मिळण्याचा दिवस तोच प्रणवेन्दुचा जन्म दिवस. ह्या सुवर्णयोगाचा गर्भितार्थ अफाट काव्यरचना करून ते सिद्ध करून दाखवीत आहेतच. तो तेजसूर्य आता मावळला असला तरी प्रणवेन्दुसारख्या कैक स्फुल्लिगाच्या स्वरुपात त्याचे अस्तित्व जाणवतेच. आपण स्वत: असेच एक फुलत असलेले स्फुल्लिग आहोत असा प्रणवेन्दु दासगुप्ताचा दृढ-विश्वास आहे.

त्यांना स्फूर्तीदेवता प्रसन्न झाली की एका दमात एक कविता निर्माण होते. त्यासाठी खटपड, धडपड, शब्दाच्या गाठोड्या उलगडून शोधाशोध इत्यादी भानगडी कराव्याच लागत नाहीत. प्रणवेन्दुचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे पाऊस पडू लागला की ते कागदावर रेघोट्या ओढू लागतात आणि पावसाच्या सरी वेगाने कोसळू लागल्या की कवितेच्या ओळीही त्यांच्याशी स्पर्धा करीत कागदावर थैमान घालतात. त्याच्या काव्यरचनेच पावसाशी असलेल हे नातं मोठ विस्मयकारक वाटत खर. पण त्याच्या अनेक कविता अशाच क्षणाना धरून अवतरल्या आहेत हेही तितकच खरं !

लवकरच श्री. दासगुप्ताचे आणखी दोन काव्यसग्रह प्रसिद्ध होणार आहेत. त्यात प्रत्येकी अंदाजे साठ साठ कविता असतील. अंगाने जरा स्थूल, हसरा चेहरा, काचेआड दिसणाऱ्या डोळ्यातील गमतीदार भाव... तसेच विलक्षण बुद्धिमत्ता आणि अफाट वाचनाने प्राप्त झालेल ज्ञान बोलण्यातून प्रत्ययाला येत तेव्हा ह्या कवीच्या मनोविकासाच कौतुक केल्याविना राहवत नाही.

सध्या प्रणवेन्दु हे जादवपूर युनिव्हर्सिटीमध्ये तुलनामूलक साहित्य (Comparative Literature) ह्या विभागात प्राध्यापक म्हणून काम करतात. त्याच्या घरी गेल्यानतर त्यांच्या आवडीनिवडी व छद पाहून माणूस अवाक् होतो. त्यांना निरनिराळ्या कलाकाराची उत्तमोत्तम चित्रे जमविण्याचा छद आहे. नव्या रक्ताच्या, नव्या स्फूर्तीच्या अनेक कलाकारांची चित्रे साऱ्या घरभर त्यांनी टांगून ठेवली आहेत. काही वर्षांपूर्वी ते 'स्टेट्स्मन्'साठी कलासमीक्षक म्हणून काम बघत असत. प्रणवेन्दुनी आपल्या आईने काढलेले एक चित्र (शातिनिकेतन पद्धतीचे) मोठ्या अभिमानाने घरात लटकवलेले आहे-अशा ठिकाणी की येणाऱ्या जाणाऱ्या कोणाच्याही नजरेतून ते सुटू नये. त्याच्या आईने एकदोन पुस्तकेदेखील लहान मुलासाठी लिहिली होती. ती मात्र आज उपलब्ध नाहीत.

प्रणवेन्दु दासगुप्त जर्दा पानाचे शौकीन आहेत. पण त्यांच्या अमेरिकन पत्नीला पान खाल्लेल आवडत नाही म्हणून पत्नीच्या सान्निध्यात असतील तेवढा वेळ ते मुळीच पान खात नाहीत. त्याची पत्नी Maryann ह्यादेखील कवयित्री आहेत त्या इग्रजीतून काव्यरचना करतात. The Peacock Smiles हा त्याचा काव्यसग्रह अलीकडेच प्रसिद्ध झाला आहे. त्या स्वत: एका शाळेत उपमुख्याध्यापिका आहेत त्यांनाही चित्रकलेच्या सग्रहाची प्रणवेन्दुइतकीच हौस आहे.

एकूण ही जोडी मोठी मजेदार आहे. एकमेकाना अनुरूप आहेत. त्याचे स्वभाव मधुर नि अगत्यशील आहेत. काही वेळ ह्या उभयतांच्या सहवासात काढला की काहीतरी विशेष मिळवल्याचे आगळे समाधान बरोबर घेऊन माणूस तेथून परततो. कविगुरू टागोरांच्या काव्यस्फूर्तीच्या झऱ्यातील हा बिंदु इतराना भरपूर आनद देत राहो ही सदिच्छा.

'माणूस' ह्या शीर्शकाखालील प्रणवेन्दुची कविता उल्लेखनीय आहे त्यांनी ती स्वत:च वाचून दाखवली होती. ते लिहितात–

पडक घर...मस्त हवा
अन् थरथरणारा तो !
जवळ ती उभी
एका हाताच्या विळख्यात
दुसरा हात
अधांतरी;
कबूतर उडत आलं
निंबोणीच्या झाडावर बसलं
समोर अजस्र पहाड
अन् समोरच
प्रचड समुद्रावर
आळसावलेला
मिट्ट अधार.
चोरून बघावस वाटलं
तरी दृश्याचाच अभाव;
मस्त हवा...पडकं घर
अन् थरथरणारा तो !

☐

ड्रॉपर्सच्या दोन एकांकिका

# आनंदकुंड, क्रॅप्स लास्ट टेप

वि. भा. देशपांडे

पुण्यातील ड्रॉपर्स या सस्थेने इटिमेट थिएटर योजना सुरू केली आहे. नेहमीच्या थिएटरमध्ये प्रयोग न करता एखाद्या हॉलमध्ये मर्यादित प्रेक्षकासमोर तो प्रयोग करावा ही त्या मागील भूमिका. योजना नवीन नसली तरी प्रत्येक हौशी-प्रायोगिक नाटचसस्था अशा प्रकारचा उपक्रम घडवण्याच्या प्रयत्नात असतेच त्यात वावगे काहीच नाही.

ड्रॉपर्सच्या कलाकारानी पहिला कार्यक्रम म्हणून सरस्वती मदिरच्या एका हॉलमध्ये सुहास ताबे लिखित 'आनदकुड' आणि बबन प्रभु अनुवादित 'क्रॅप्स लास्ट टेप' या दोन एकाकिका सादर केल्या

'आनदकुड'मध्ये आयुष्यातील अनेक स्वप्ने उध्वस्त होऊन रस्त्याच्या कडेला भिकाऱ्याच्या स्तरावरती याव्या लागलेल्या तरुणाची व्यथा आहे. जे ममत्व रक्ताच्या नात्यात किंवा प्रियजनाकडून लाभले नाही ते एका भिकाऱ्याकडून लाभले. शेवटी भीक मागत राहणे हेच आनदकुड झाले. या एकाकिकेतील मुख्य तरुणाची भूमिका आनद लागूने केली होती. एकाकिकेतील बहुताश सवादाचा वाटा त्याच्याच भूमिकेकडे होता. आनद लागूने आपला रागसताप व्यक्त करण्यासाठी आवाजाची वरची पट्टी लावली होती. त्याचा आवाज वरच्या पट्टीत गेल्यावर नाटचाशयातील नेमका अर्थ व्यक्त करण्यास असमर्थ ठरतो. त्या आवाजाला केवळ आक्रस्ताळे स्वरूप राहते आणि त्या भूमिकेसाठी घेतलेले सारे परिश्रम निरर्थक ठरतात. इतर कलाकारानी केलेल्या भूमिका ठीक होत्या.

'क्रॅप्स लास्ट टेप' ही मुळात सॅम्युएल बेकेटची एकाकिका. त्याचा अनुवाद बबन प्रभु यांनी काही वर्षांपूर्वी केलेला आहे. ही

एकांकिका कोणाही कलाकाराला आव्हान देणारी. कारण यामध्ये प्रत्यक्ष पात्र असे एकच–म्हाताऱ्याचे. साथीला काही टेप्स. सुधीर आळेकर यानी म्हाताऱ्याची भूमिका केली होती. ही एकांकिका आळेकरानी कलापोसकांच्या एकांकिका महोत्सवात केलेली होती. त्यामुळे या एकांकिकेबद्दल लिहिताना मी असे म्हटले होते की, ही एकांकिका मोठ्या रंगमचाऐवजी छोटया हॉलमध्ये इंटिमेट पद्धतीने करण्यासारखी आहे. यावेळी परिणामाच्या दृष्टीने त्यात जाणवणारा फरक इंटिमेट पद्धतीने निश्चितच जाणवला. परंतु हा दुसरा प्रयोग पूर्णतः समाधान देऊ शकला नाही. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सुधीर आळेकरांचा एकसुरी आणि काहीसा बसका आवाज ही एकांकिका एकपात्री असल्याने एकाच प्रकारच्या आवाजात बराच वेळ शब्द ऐकणे असह्य होणारे आहे. आवाजाप्रमाणे त्याच्या मुद्राभिनयालाही मर्यादा असल्याचे जाणवत होते. विशेषतः टेप लावल्यानतर प्रतिक्रियात्मक मुद्राभिनयातील अनेक सूक्ष्म गोष्टी व्यक्त होणे आवश्यक होते, तितक्या प्रमाणात त्या व्यक्त होत नाहीत.

ड्रापर्स ही सस्था निघून आता चार वर्षे झाली. प्रेक्षकानी सस्थेतील कलाकारांचे हौसेने कौतुक करण्याचे दिवस सपले. गेल्या वर्षापासून त्यानी राज्यस्पर्धेतही आपली हजेरी लक्षवेधी ठरवली. त्यामुळे इथून पुढे या सस्थेतील कलाकाराकडून अधिक कलात्मक नाटयप्रयोगाची अपेक्षा व्यर्थ ठरू नये. या सस्थेतील लोकांकडे आवश्यक तो उत्साह आहे, परिश्रम घेण्याची ताकद आणि इच्छाही आहे. परतु सध्या आहे त्यापेक्षा अधिक सख्येने कलागुणसपन्न नट आणि दिग्दर्शक सस्थेत निर्माण होणे (किंवा बाहेरून आणणे) आवश्यक आहे असे वाटते. कारण कोणतीही कलात्मक निर्मिती नुसत्या उत्साहावर आणि श्रमावर अवलबून नसते. त्याच्या जोडीला कलात्मक दृष्टी विशेष महत्त्वाची असते. ड्रॉपर्सकडून अधिक काही चागले प्रयोग पाहायला मिळण्याची शक्यता खात्रीपूर्वक असल्यामुळेच अपेक्षा व्यक्त करीत आहे.

या निमित्ताने आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. जून ते ऑगस्ट या काळात पुण्यामध्ये काही प्रयोग पाहिले. १) कलोपासकांचा एकांकिका महोत्सव– त्यात पुण्या–मुंबईच्या नऊ एकांकिका होत्या. २) कलोपासकांच्या मासिक एकांकिकांचे प्रयोग. ३) कलोपासकाचे दिलीप खाडेकर लिखित 'ग्रॅज्युएट'. ४) थिएटर अॅकॅडमीचे सुहास ताबे लिखित 'बीज' ५) ड्रॉपर्सच्या दोन एकांकिका इत्यादी प्रयोग पाहिल्यावर या आमच्या सर्व हौशी प्रयोगशील वृत्तीच्या तरुण मित्राना सांगावेसे वाटते. नाटकातील सवाद म्हणण्याकडे (म्हणजे स्पीचकडे) फार दुर्लक्ष होते आहे. सवाद ही नाटकातील फार महत्त्वपूर्ण शक्ती आहे, हे नव्याने सांगण्याचे कारण नाही. सवादातील प्रत्येक शब्द, त्यातील अर्थभाव, त्यातील लय, विराम आणि सर्व सवादाच्या एकत्वातून जाणणारे सौंदर्य तितक्याच ताकदीने प्रकट व्हावयास पाहिजे. वरील सर्व प्रयोगांमधून नेपथ्य, प्रकाश, विरचना, पार्श्वसगीत इत्यादीकडे जेवढे लक्ष दिले गेले तेवढे सवाद उत्तम म्हणण्याकडे दिले गेले नाही. माझ्या दृष्टीने ही एक चिंतनीय बाब आहे. ◻

## कलोपासक : ऑगस्ट

# शय्या

कलोपासकानी रत्नाकर मतकरी याची 'शय्या' एकांकिका ऑगस्टमध्ये प्रयोगरूपाने सादर झाली. चित्रपट क्षेत्रातील प्रतितयश दिग्दर्शक एका एक्स्ट्रा नटीला शय्यासोबतीसाठी आणतो. तिच्याशी होणाऱ्या सवादातून दिग्दर्शकाच्या कौटुबिक-खाजगी आयुष्याची कहाणी उलगडली जाते. सारा सवाद बेडरूममध्ये (अधिक करून बेडवरच) आहे.

या एकांकिकेत सुधीर गाडगीळ आणि रोहिणी ओक या कलाकारांनी भूमिका केल्या होत्या. दिग्दर्शक होते मधू लोखडे. गाडगिळाचा आवाज भरीव-वजनदार आहे. गंभीर प्रकृतीच्या भूमिकांना अधिक अनुकूल असा आवाज आहे. पण आवाजाचा वापर भावानुकूल राहिला नाही तर त्यातील तोचतोचपणा (मोनोटोन) नाटय परिणामाचा दृष्टीने त्रासाचा होतो. प्रेक्षकाला सुरुवातीला अशा आवाजाचे असणारे आकर्षण काही वेळानंतर निघून जाते. या एकांकिकेत गाडगिळाच्या आवाजाचे तेच झाले. रोहिणी ओक याच्या आवाजाला जो किमान गोडवा किंवा मुलायमपण अपेक्षित होता तो नव्हता. त्यांची सवाद म्हणण्याची पद्धतीही समाधानकारक नव्हती. साघात आणि कृत्रिम बोलण्याची त्यांची पद्धती एकांकिकेतील आशय व्यक्त करण्यास असमर्थ ठरली. विशेषतः दिग्दर्शक आणि ती एक्स्ट्रा नटी याच्यातील भावनिक जवळिक आणि दुरावा आवश्यक त्या तपशिलानिशी प्रगट होऊ शकला नाही. त्या दिग्दर्शकाने तिचा मानसिक अलिप्ततेने घेतलेला शरीरभोग, नटीच्या बाजूने दिग्दर्शकाबद्दल वाटणारी कौतुकाची, आतरिक ओढीची भावना, दिग्दर्शकाला पूर्वायुष्याची होणारी आठवण, पत्नीच्या विरहाची बोचणारी सल, आपल्या पौरुषाबद्दलचे लोकापवाद इत्यादी सदर्भातून निर्माण होणारी भावनिक आदोलने सूक्ष्मतेने अभिनित व्हायला पाहिजे होती. एकांकिकेतील भावदर्शन ढोबळ रीतीने झाले. दोन्हीही कलाकार आपापल्या भूमिका त्या त्या वेळापुरत्या जगत आहेत असे न वाटता भूमिका करीत आहेत असे वाटत होते. हे वाटणे,हेच एकांकिकेचे अपयश आहे. या एकांकिकेचे दिग्दर्शकपरत्वे भिन्न भिन्न अन्वयार्थ लागू शकतील. मधू लोखडे यांनी जी दिशा पकडून प्रयोग दर्शन घडवले ते वरील अनेक कारणानी असमाधान देणारे ठरले. त्यांच्यासारख्या मातब्बर दिग्दर्शकाकडून इतके ढोबळ – मर्यादित स्वरूपाचे दिग्दर्शन निश्चितच अभिप्रेत नव्हते ! ◻


पूर्णिया
अनिल अवचट
सहा रुपये
राजहंस प्रकाशन
पुणे ४११ ०३०

क्रीडांगण

# खोखो व राजकारण

एमेम

खोखो आणि राजकारण या दोन शब्दांचा अन्योन्य संबंध आहे असे वाटते. राजकारणात नेहमी खेळला जाणारा व तुफान लोकप्रियता मिळवून राहिलेला खेळ म्हणजे खोखो ! प्रतिपक्षाला हुलकावण्या देत पाटचा (पाटर्या) बदलणे, बसलेल्याला 'खो' देऊन त्याची जागा (खूर्ची) पटकावणे, किंवा खुंटाचा (खोटयाचा) आधार घेऊन प्रतिस्पर्ध्याला कायमचा बाद करणे वगैरे गोष्टीतून नेहमीचा खोखो व राजकारणातील खोखो यातील साधर्म्य दिसून येते. आता अशा रितीने राजकारणात जर खोखो खेळला जातो तर खोखोत राजकारण का खेळले जाऊ नये ?

खोखोत राजकारण का खेळले जाऊ नये असा प्रश्न केला आहे; मडळी, खोखोच्या यदाच्या निवडसमितीने ! त्यांनी यदा अशा काही परफेक्ट खेळी खेळल्या की, स्वत: बाजूला राहून इतर संघटनेत व खोखोपटूत मारामाऱ्या लावून देण्याची अवघड किमया त्यांना साधता आली.

अनेक दिवस होणार होणार म्हणून गाजत असलेली व बऱ्याच वेळा पुढे ढकलली गेलेली राष्ट्रीय अजिंक्यपदाची खोखो स्पर्धा परवा पतियाळा येथे पार पडली व सालाबादप्रमाणे महाराष्ट्राच्या पुरुष संघाने त्यात विजेतेपदही मिळविले. या एकाच वाक्यात स्पर्धेचे रसग्रहण पुरेसे ठरू शकते इतका महाराष्ट्राच्या संघाचा दर्जा अत्युच्च आहे आणि तितकीच प्रतिस्पर्धी संघांच्या दर्जाने खालची पातळी गाठलेली आहे. आणि नेमका याच गोष्टीचा फायदा यदाच्या निवडसमितीने घेतला !

महाराष्ट्राचा 'ब' दर्जाचा संघही राष्ट्रीय विजेता ठरू शकेल ही शभर टक्के सत्य घटना निवडसमिती चांगलीच जाणून होती. आपण कसाही संघ जरी निवडला तरी त्याचा विजयावर काहीच परिणाम होणार नाही हा मुद्दा मनात ठेऊन त्यानी काही दमदार पावले टाकली व खोखोतील वातावरण गढूळ करून टाकले. याचे एक साधे उदाहरण देतो. राष्ट्रीय खोखो स्पर्धेच्या वृत्तांताने व समालोचनाने एरवी रकानेच्या रकाने भरून टाकणाऱ्या 'महाराष्ट्र टाईम्स' ने यंदा आपले सारे लक्ष खोखोतील पडद्यामागच्या हालचालीवर केंद्रीत केले होते. ही साधी वाटणारी गोष्ट, खोखोतील कलात्मकतेवर, खोखोतील राजकारणाने कशी मात केलीय् हे सांगण्यास पुरेशी आहे.

निवडसमितीच्या निर्लज्ज हालचाली सांगण्याआधी एक छोटीशी पार्श्वभूमी सांगतो. निवडसमितीचे काम सोपे व अचूक व्हावे म्हणून राज्य संघटनेने गेली दोन-तीन वर्षे एक चांगला पायंडा पाडला आहे. केवळ एकाच स्पर्धेवरून संघ निवडणे त्रासाचे व चूक ठरू शकते म्हणून मुंबई व धुळे येथील अखिल भारतीय स्पर्धा व राज्यअजिंक्यपदाची आंतरजिल्हा स्पर्धा या तीन स्पर्धांचा निवडसमितीने विचार करावा व त्यानुसार संघ निवडावा असे ठरले. ही पद्धत खरोखरच चांगली आहे. त्यामुळे तिन्ही स्पर्धेत पुरेसे सातत्य व क्षमता दाखविणाऱ्या खेळाडूंचीच निवड होऊ शकते.

यदाच्या या तीन स्पर्धा विचारात घेऊन वीस-पंचवीस खेळाडू निवडले. या निवडलेल्या खेळाडूंचे शिबीर पुण्याला झाले. शिबीर सुरू होण्याच्या एक-दोन दिवस आधी, शिबिरात निवड झालेल्या व गेली दोन वर्षे महाराष्ट्राचे कर्णधारपद विभूषित करणाऱ्या सतीश देसाईने आपली निवृत्ती जाहीर केली. यातून निवडसमितीला अनायासेच एक धागा मिळाला व तो त्यानी अचूकपणे अनेकांच्या गळ्याभोवती लावून त्याना घाबरे केले.

तसं म्हटल तर खोखोचे कर्णधारपद हे क्रिकेट वगैरे खेळातील कर्णधारापेक्षा अगदी निराळे पद. खोखो कर्णधाराला नसतात विशेष अधिकार आणि त्यामुळे नसतो विशेष मान त्यामुळे कर्णधारपदासाठी कुणाचा विशेष आग्रहही नसे आणि साधारण योग्य खेळाडूची या पदावर नेमणूक झाल्यावर वादंगाचे काही कारणही उरत नसे. वाद होत ते खेळाडूंच्या निवडीसंबधात ! पण यदा मात्र सर्व वाद या कर्णधारपदाभोवती फिरविला गेला.

महाराष्ट्राचा खोखो संघ म्हणजे पुण्याच्या खेळाडूंचा(च) संघ, म्हणजेच नवमहाराष्ट्र-सन्मित्र यातील खेळाडूंचा संघ हे आता खोखो क्षेत्रातील लहान पोरालाही माहीत आहे. गेली ६ वर्षे, म्हणजेच १९६७ पासून महाराष्ट्राचे कर्णधारपद नवमहाराष्ट्राच्या मधु झवर, सुनील तांबे, सतीश देसाई यानी भूषविले आहे. हे कर्णधारपद नवमहाराष्ट्राची मक्तेदारी ठरू पहात आहे आणि याला आळा घालण्याचे पवित्र कार्य आपल्यालाच करावयाचे आहे असा विचार गोपाळ फडके, आबा नाईक व राजा जेस्ते यांच्या निवडसमितीने केला. सतीश देसाईने अनायासेच आपली निवृत्ती जाहीर केली. सतीश देसाईनंतर कर्णधारपदासाठी विचार करण्यासाठी एकमेव नाव उपलब्ध होते. आणि ते म्हणजे विजय भट याचे ! सेवाज्येष्ठता, क्षमता व अनुभव यात सर्व दृष्टीने श्रेष्ठ असलेल्या व गेल्यावर्षी महाराष्ट्राचा उपकर्णधार असलेल्या विजय भटची यदा कर्णधारपदी निवड होणार ही सर्वांची खात्री होती. पण तो पडला नवमहाराष्ट्राचा खेळाडू ! आणि नवमहाराष्ट्राचा खेळाडू कर्णधारपदी नेमणे म्हणजे महत्पाप ठरणार ही उपरोक्त निवडसमितीची भावना ! तेव्हा त्यानी आधीच ठरविले की विजय भटला कर्णधार करावयाचे नाही. त्यासाठी कोणती कारणे सांगायची तेही ठरले. तिघाची तीन कारणे. एक म्हणतो, विजय भट फटकळ आहे, एक म्हणतो त्याचे चारित्र्य चांगले नाही तर तिसरा म्हणतो विजय भटचे संघातील स्थानच डळमळीत आहे ! !

विजय भटला कर्णधारपद द्यायचे नाही ठरल्यानंतर मग साहाजिकच नबर लागतो प्रमोद गोवडेचा. पण प्रमोद गोवडे कुठल्या सघाचा ?–तर नवमहाराष्ट्राचा ! मग त्याला कर्णधारपदावर कसे रहाता येणार ? म्हणून निवडसमितीने काय केले, तर गोवडेला सघातून सरळ अर्धचद्र त्यांनी दिला. गोवडेच्या खेळाचा दबदबा आज पुण्यातच नव्हे तर भारतातील सर्व खेळाडूपर्यंत पोचला आहे. निवडसमितीने निकष मानलेल्या यदाच्या तीनही स्पर्धेत गोवडेने उत्कृष्ट कामगिरी बजावली होती. मुबईची नेरूरकर सुवर्णचषक स्पर्धा नवमहाराष्ट्राने जिंकली. ती केवळ गोवडेच्या जोरावर असे त्या संघातील व प्रतिस्पर्धी संघातील खेळाडूही मानतात. धुळ्याच्या अखिल भारतीय स्पर्धेत सन्मित्रविरुद्ध खेळताना त्याने नाबाद साडेतीन मिनिटांचा खेळ केला तर नाशिक येथील राज्य अजिक्यपदाच्या स्पर्धेत त्याने पुणे जिल्ह्याकडून खेळताना नाबाद सात मिनिटे पळतीचा खेळ केला. व तेथे त्याला उत्कृष्ट पळतीबद्दल पारितोषिकही मिळाले. आणि हे पारितोषिक कुणी दिले माहीत आहे ?–तर त्याला वगळणाऱ्या निवडसमितीनेच !

गोवडेला का वगळले गेले यावद्दल एक गोष्ट अनेकजण बोलून दाखवतात. गोवडेचे व निवडसमितीचे एक सभासद श्री. गोपाळ फडके याचे सबध ठीक नव्हते. हे जर खरे असेल आणि वैयक्तिक हेव्यादाव्यातून श्रेष्ठ खेळाडूची अशा रीतीने गळचेपी होऊ लागली तर राज्य सघटनेला याची गभीर दखल घ्यावी लागेल. निवडसमितीचे दुसरे एक सभासद आबा नाईक म्हणाले की गोवडेचे मानेपर्यंत रुळणारे लाब केस होते म्हणून त्याची निवड झाली नाही. या खुलाशाला हसावे की रडावे हेच कळत नाही. गोवडेने लाब केस राखले आहेत हे खरे, पण आत्तापर्यंत कुठल्याही सामन्यात त्याला या लाब केसाचा अडथळा आला नाही. आणि समजा निवडसमितीचे असे काही नियम असतील तर खेळाडूना अशी समज यापूर्वीच का देण्यात आली नाही ? राज्य सघटनेचे चिटणीस मुकुद आंबर्डेकर हे निवडसमितीचे पदसिद्ध सभासद. त्यानी निवडसमितीला सांगितले, की गोवडेला केस कमी करायला मी स्वतः सांगेन. पण निवडसमितीने त्याचे म्हणणे ऐकलेच नाही. कारण गोवडे जर सघात आला तर कर्णधारपदाचा प्रश्न बिकट होईल ही निवडसमितीची खात्री होती !

प्रमोद गोवडेचा असा काटा काढल्यानतर त्यानी मग बारा खेळाडूची यादी केली व कर्णधार नेमण्यासाठी बैठक बोलावली.

आता कर्णधार सन्मित्रचाच नेमावयाचा हे नक्की ठरले होते. म्हणून निवडसमितीने एकमताने सन्मित्रच्या सुभाष चुटकेचे नाव सुचविले. त्यावेळी मुकुद आबर्डेकरानी त्यांना ताबडतोब सुनावले की सुभाष चुटकेच्या नावाला शासकीय समिती तीव्र विरोध करील. कारण विजय भटला कर्णधार न नेमण्याठी तुम्ही जी कारणे सागितली ती कारणे सुभाष चुटकेच्या बाबतीतही पुढे करता येतील. तेव्हा तुम्ही दुसरे नाव सुचवा. तेव्हा ताबडतोब तिघानीही एकदम सन्मित्रच्या राजू द्रवीडचे कर्णधारपदी व नवमहाराष्ट्रच्या श्रीरग इनामदारचे उपकर्णधारपदी नाव सुचविले.

हे सर्व प्रकरण जेव्हा मान्यतेसाठी सासकीय समितीकडे गेले तेव्हा शासकीय समितीने निवडसमितीच्या सर्व हालचाली ओळखल्या. राजू द्रवीडच्या कर्णधारपदाला शासकीय समितीच्या काही सभासदांनी हरकत घेतली. त्यांच्या मते राजू द्रवीड हा निःसंशय श्रेष्ठ खेळाडू आहे. पण त्याच्यात नेतृत्त्वाचे गुण कुठे आहेत ? त्याने त्याच्या सन्मित्र सघाचेच नव्हे तर आंतरमहाविद्यालयीन सामन्यात प्रतिनिधित्व करणाऱ्या महाविद्यालयाचे तरी नेतृत्त्व कुठे केले होते ? असे असता एकदम महाराष्ट्राच्या नेतृत्त्वपदाची धुरा त्याच्या गळ्यात टाकण्यात काय हशील आहे ? आता क्रिकेटमधील उदाहरण घ्यायचे तर फलदाजीत वाडेकरपेक्षा सरदेसाई श्रेष्ठ, पण नेतृत्त्वाची जबाबदारी टाकली जाते त्या क्षेत्रातील अनुभवी वाडेकर वर ! शासकीय समितीचे एक सभासद सुनील तावे यानी असे सुचवून पाहिले की जर सन्मित्रचाच खेळाडू कर्णधार करावयाचा असा आग्रह असेल तर शेखर धारवाडकरला करा पण द्रवीड नको ! पण त्यावर इतर सभासदाचे म्हणणे पडले की राजू द्रवीडचे नाव गाळल्यानंतर मग निवडसमितीने उपकर्णधार म्हणून नेमलेल्या श्रीरग इनामदारचा आधी विचार करणे योग्य. आता नेतृत्त्वाचा यापूर्वीचा अनुभव इनामदारला होता. कुमाराच्या राष्ट्रीय स्पर्धेत तो महाराष्ट्राचा उपकर्णधार होता व एकदा कर्णधारही होता. (पण त्यावेळी स्पर्धाच होऊ शकल्या नाहीत) शिवाय आतरमहाविद्यालयीन सामन्यात त्याने आपल्या महाविद्यालयाचे यशस्वी नेतृत्त्व करून महाविद्यालयाला विजयीही केले होते. तेव्हा नेतृत्त्वाच्या बाबतीत राजू द्रवीडपेक्षा इनामदारचे पारडे जड ठरले. इनामदारला कर्णधार करण्याचा ठराव जेव्हा शासकीय समितीत मतास टाकला तेव्हा चार विरुद्ध शून्य मतानी तो पास झाला व श्रीरग इनामदार महाराष्ट्राचा कर्णधार झाला !

या प्रकरणाचा वास्तविक हा शेवट, पण ही पुढील नाटघाची सुरवातच ठरली. निवड समितीच्या सभासदानी हस्ते परहस्ते बाहेर ओरड चालू ठेवली की आम्ही द्रवीडला कर्णधार केले होते तो निर्णय शासकीय समितीने फिरविला. त्यामुळे आधीच नवमहाराष्ट्र सघाबद्दल गैरसमज बाळगणारे सन्मित्र सघाचे खेळाडू चिथरले. इकड विजय भटला कर्णधार केले नाही व गोवडेला सघातून जाणून बुजून वगळले म्हणून नवमहाराष्ट्र सघाचे खेळाडू सतप्त झाले. आणि मग त्यातून एकमेकांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या. मुबईच्या 'महाराष्ट्र टाईम्स्'ने याबाबतीत व्यासपीठ म्हणून छान कामगिरी बजावली ! नवमहाराष्ट्र व सन्मित्र यांच्यातील वैराला आणखीनच कडवट स्वरूप प्राप्त झाले ते यामुळेच !

वास्तविक नवमहाराष्ट्र व सन्मित्र या सघातील खेळाडूना एकमेकांविरुद्ध वैरभाव बाळगण्याचे काही कारण नव्हते; किंबहुना त्यांच्यात वैर असे नव्हतेच. असलीच तर होती चुरस ? आणि या खिलाडू चुरशीनेच पुण्यातील खो खो फुलला, परिपूर्ण झाला ! पण दुर्दैवाने खेळाशी सबधीत नसलेल्या काही मडळीनी या चुरशीला वैराचे स्वरूप प्राप्त करून दिले. निकोप चुरशीमुळे जसा कुठल्याही खेळाचा विकास होतो तसाच विकृत वैरभावामुळे त्याचा ऱ्हासही होऊ शकतो. ही वेळ येऊ घातली आहे. दोन्ही सघातील खेळाडूनी याचा गभीरपणे विचार केला पाहिजे.

खेळाशी सबधीत नसलेले पुण्यातील चार-पाच 'राजकीय' वृत्तीचे लोक व एक दैनिक यानी नवमहाराष्ट्र-सन्मित्र यातील चुरशीचा फायदा स्वतःच्या हातात सत्ता घेण्यासाठी कसा केला व दाणे टाकून कोंबडघा झुजविण्याचे प्रकार त्यानी कसे चालू ठेवले, त्यासबंधी काही मनोरंजक किस्से पुढील लेखात ! ☐ ☐

## साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

३१–८–७४ ते ६–९–७४

### महाराष्ट्राच्या भावी मुख्यमंत्र्याबद्दल पुनर्मंथन

भारताच्या अष्टमस्थानी दि. १ ला मगळ-बुधाची युती होत असून दि. २ ला मंगळ भाग्यस्थानी जात आहे. भारताच्या लग्नी हा मगळ चौथा होत आहे व तो अतर्गत स्वास्थ्याला सुरुंग लावणारा ठरण्याची भीती आहे. लोकाचा असतोष तर वाढेलच, पण देशाच्या सीमा व अतर्गत सुरक्षा ज्या सुरक्षादलावर अवलबून आहे त्या सुरक्षा दलात असतोषाची लागण होण्याची देखील भीती आहे. नैसर्गिक सकटे वाढतील. आजच्या सार्वत्रिक टंचाईला मागे सारील एवढया मोठ्या टचाई महागाईचा कहर होईल. नव्या राष्ट्रपतीना त्यांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीलाच काही अप्रिय निर्णय घ्यावे लागतील. केंद्रीय मत्रीमडळाची पुनर्रचना, बदल व खातेबदल करणे अपरिहार्य ठरेल. पतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी याचे धक्कादायक कर्तृत्व पुन्हा एकदा नव्या तेजाने चमकणार आहे. अर्थव्यवस्था डळमळत असली तरी यशवतराव चव्हाण यांचे महत्त्व वाढणार आहे. याच वेळी महाराष्ट्राच्या मुख्यमत्रीपदाच्या चर्चेला जोराची चालना मिळणार असून राजधानी दिल्लीतही उच्चस्तरावर त्याचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे.

**मेष : ताण कमी होईल.**

कुभ राशीच्या अकराव्या चद्राने आठवडयाची आज सुरुवात होत आहे हा एक उत्तम ग्रहयोग आहे. याचा एक अनुकूल परिणाम म्हणजे तुमच्या आर्थिक परिस्थितीला अनुकूल कलाटणी मिळण्याचा हा योग आहे. कुठून कुठून तरी समाधान वाटावे असा पैसा खर्चासाठी तुमच्या हाती येईल. खूप दिवस न मिळालेली तुमची रक्कम तुम्हाला अचानक मिळेल. सासुरवाडीकडून मदत मिळेल. लॉटरी-रेसच्या मार्गाने नशीब उघडेल. कसेही असो पैशाचे मोठे व्यवहार या वेळी होणार आहेत. दि. १ सप्टेंबरच्या मगळ-बुध युतीपासून तुमच्या नोकरीधंद्यात सामाजिक व राजकीय कार्यात नवे पर्व सुरू होईल. उराशी बाळगलेली मधूर स्वप्ने साकारू लागतील. **महिलांस**. मगळवार बुधवार खर्चावर बधन ठेवा. नोकरीत पैशाची कामे जपून करा.

**वृषभ : नवी समस्या उद्‌भवेल**

नोकरीच्या क्षेत्रात एखादा नवा विक्रम करण्याची सधी घेऊन तुमच्या जीवनात हा आठवडा प्रवेश करीत आहे. तुम्ही सरकारी अगर खाजगी अशा कोणत्याही क्षेत्रात असा तुमच्या कर्तृत्वाला खास 'पद' प्राप्त होणार आहे. मात्र सुखस्थानातील मगळ-बुधाची एक तारखेला होणारी युती राहत्या जागेच्या किंवा स्थावराच्या बाबतीत एखादी डोकेदुखीची समस्या निर्माण करणार आहे. वादाचा प्रसग शक्यतो टाळाच. नोकरी करणाऱ्यांना वरिष्ठाची सहानुभूती लाभेल. बदली हवी असल्यास प्रयत्न करा. बेकाराना काम मिळण्याच्या दृष्टीने आश्वासन मिळेल. कलाक्षेत्रात मान, पैसा व प्रतिष्ठा मिळेल. व्यापारी व दलाल यांच्या बाबतीत अस्वस्थता वाढेल. शनिवार ते बुधवार यश मिळेल. **महिलांस :** नोकरीत कामाचा ताण कमी होईल. माहेरची माणसे भेटतील.

**मिथुन : व्यवसायात नवे पर्व**

बाराव्या केतूची अजिबात पर्वा करू नका. या सबध आठवडयात चंद्र उत्तम आहे. रविवारी पराक्रमात होणारी मगळ-बुधाची युती तुम्हाला बरेच काही देऊन जाणार आहे. व्यापार, कारखाना अगर मुद्रण व्यवसाय यात नव्या उपक्रमाला यश व वाव मिळणार आहे. पैशाची चणचण भासणार नाही. मगळवार ते गुरुवार नोकरीत अचानक महत्त्वाचा बदल होईल. तुम्ही वरिष्ठांच्या जास्त विश्वासात जाल. इजिनियरिंग व विज्ञान पदवीधरांना तात्पुरती नोकरी मिळेल स्वतत्र उद्योग करणाऱ्या डॉक्टर, इजिनियर, कॉन्ट्रॅक्टर्सना कामाचा बराच मोठा लाभ होईल. यावेळी लेखकाना खास प्रतिभेची देणगी लाभेल व कादबरी सारखे लेखन होईल राजकीय नेत्याना लोकाचा पाठिंबा लाभेल. **महिलांस :** मनस्वास्थ्य सुधारेल. मोठ्या प्रवासाचा योग येईल.

**कर्क : धनिकाशी सहयोग**

या आठवडयात दिनाक २ ला होणारे मगळाचे व बुधाचे पराक्रमात आगमन तुमच्या कर्तृत्वाला असामान्य असे स्वरूप प्राप्त करून देणार आहे. एखादा स्वतत्र व्यवसाय सुरू करण्याचे अनेक दिवस तुमच्या मनात घोळत असलेले स्वप्न साकार होण्यासारखी स्थिती निर्माण होईल. मदीच्या लाटेत झोकाडे खाणारा तुमचा चालू उद्योग पुन्हा उभारला जाईल. पैसा व तात्रिक सहाय्य मिळेल. दुर्मिळ अशा एखाद्या वस्तूच्या उत्पादनाचा तुम्हाला खास परवाना मिळेल. सोमवारनतर सरकारी वरिष्ठ व्यक्तीला परदेश प्रवासाठी एखाद्या शिष्टमडळातून जावे लागेल. स्वतःच्या प्लॉटची खरेदीची इच्छा पुरी होईल. **महिलांस :** सुरुवात अनुकूल चद्राने होत आहे हा आर्थिक स्थित्यंतराचा योग आहे. लॉटरीत लाभ होईल.

**सिंह : नोकरीत दर्जा वाढेल.**

एखाद्या अनामिक सुदर स्त्रीच्या मोहात अडकूनच तुमच्या या आठवडयाची सुरुवात प्रसन्न वातावरणात होणार आहे. दिनाक १ सप्टेंबरला तुमच्या चद्राजवळच होणारी मगळ-बुधाची युती ज्याप्रमाणे आर्थिक फायद्याचे वरदान ठरेल त्याचप्रमाणे नोकरीच्या क्षेत्रात तुमचा दर्जा अपेक्षेपेक्षा वाढवणार आहे. या असामान्य ग्रहयोगाच्या सिद्धीने तुम्हाला स्वत.लादेखील आश्चर्याचा

धक्का बसेल. सोमवारी अगर गुरुवारी एखादी धनाढ्य व्यक्ती तुमच्या सहवासात येईल आणि आगामी सुखद घटनांचे लागेबांधे अपेक्षा नसताना जुळले जातील. या आठवड्यात नोकरदारांना कामाचा ताण वाढणार आहे. पैसा गरजेपुरता मिळेल. पैशाचे मोठे व्यवहार मात्र करू नका. **महिलांस :** मानाची अपेक्षा न करणे शहाणपणाचे ठरेल. निंदा करू नका. व ऐकू नका.

**कन्या : सामर्थ्याचा साक्षात्कार**

गेले अनेक दिवस तुमचे मन एका कोडीत सापडले होते ती कोडी या आठवड्यात फुटेल व त्याचा अत्यंत अनुकूल असा प्रत्यय सोमवारपासून येऊ लागेल. रविवारी सिंह राशीत होणारी मगळ-बुधाची युती जरी बारावी असली तरी ती काही तुम्हाला फारशी तापदायक ठरणार नाही. सध्या तुमच्या खर्चाचे प्रमाण भलतेच वाढले आहे. त्याला आळा घालणे शक्य होणे नाही एवढाच या युतीचा परिणाम. खरे म्हणजे या आठवड्यातील महत्त्वाची घटना सोमवारी तुमच्या राशीत मगळासारख्या असामान्य धैर्यशाली ग्रहाचे व बुधासारख्या बौद्धिक ग्रहाचे वरदान तुम्हाला लाभणार आहे. नोकरी व्यवसायात अकल्पित शुभघटनाचे व वाङ्मयीन क्षेत्रात बौद्धिक चमत्काराचे प्रत्यय येऊ लागतील. **महिलांस :** अनेक बाबतीत इच्छा सफलतेचा प्रत्यय येईल. पदवीधर स्त्रियांना नोकरी मिळेल.

**तूळ : सावधगिरीची जरूरी**

आठवड्याच्या सुरुवातीलाच चद्र इतका छान आहे की, कलाक्षेत्रात तुम्हाला जर एकदम मोठे स्थान मिळाले तर आश्चर्य वाटू नये. सौंदर्य असेल तर तरुणीना सिनेमा नाट्यक्षेत्रात मोठी सधी मिळू शकेल. त्याहीपेक्षा दि. १ ला मगळ-बुधाची लाभस्थानी होणारी युती तुमच्या आर्थिक व्यवहात पैसे मिळवण्याच्या विविध उद्योगात असामान्य घटना घडवून आणणार आहे. जमीनदारीत फायदा, जमिनीच्या खरेदी-विक्रीत नफा असे काही तरी घडेल. मात्र पहिल्या दोन तीन दिवसातील सुयोग नतरच्या तीन चार दिवसात येतील असे समजू नका. कारण दि. २ रोजी मगळ कन्या राशीत येऊन बसला की तो एक सावधगिरीचा इशाराच आहे असे समजायला हवे. नोकरी व पैशाचे व्यवहार डोळ्यात तेल घालून करा. **महिलांस :** राहाणीमान सुधारेल. दागिन्याची हौस फिटेल. नोकरीत अनुकूल काळ.

**वृश्चिक : रेसमध्ये यश**

बाराव्या हर्शलाने तुमच्या पैशाचा कणा पार खिळखिळा करून टाकला आहे. पण मगळ-बुधाची दशमस्थानी घडणारी रविवारची युती व नतर लगेचच मगळ-बुधाची घडणारी एकादशस्थ भ्रमणे तुमच्या ससाराचा आर्थिक कणा, आजार बरा करणाऱ्या धन्वंतऱ्याप्रमाणे सुधारून देतील. रेस व लॉटरी सरकारमान्य आहेच. तुम्ही जर त्यात भाग घेतला तर त्यात विशेष करून रेसमध्ये तुमचे नशीब बहरून निघेल. नोकरीत असाल तर जमाखर्चाच्या तोड मिळवणीने जिकिरीस आलेले तुमचे मन हलके होईल. जुन्या मुदतीपासून वाढीव पगार मिळेल प्रमोशनचा देखील योग आहे. सायन्स, शेती व यात्रिकी पदवीधराना नोकरी वा धद्याची पर्वणी चालून येईल. **महिलांस :** उद्योग अगर नोकरीत भासत असलेली पैशाची चणचण संपूर्णत. सपेल.

**धनू : उत्साह संचारेल**

चद्र-मगळाच्या आगळ्या शुभयोगावर या आठवड्याची सुरुवात होत आहे. हीच मुळी तुमच्या जीवनातील 'काजळी रात्र' सपल्याची खूण आहे. असे तुम्ही समजायला मुळीच हरकत नाही. दीर्घकाळ आशावाद, उत्साह, प्रसन्नता व कर्तृत्व यापासून तुम्हाला वचित व्हावे लागले. मगळाने तुमचे मन व शरीर विकलांग बनवून सोडले होते. पण मित्रानो, हे सारे आता दूर गेले आहे. सोमवार दि. २ च्या दशमातील मगळ-बुधाच्या आगमनापासून तुमची सर्व क्षेत्रातील प्रगती झपाट्याने गतिमान होऊ लागेल. थाबलेला व्यवसाय पुन्हा तेजाळेल. मन, शरीर व त्याचमुळे नोकरी वगैरे क्षेत्रात उत्साह सचारेल. आरोग्याची गुरुकिल्ली तुमच्या हाती येईल. **महिलांस :** निराशेने आत्मकेंद्रित का बनता? पदर खोचा आणि झपाझप पावलानी काम करा. यश तुमचे आहे.

**मकर : अनुकूलता गवसेल**

अगतिकता व असतुष्टता, निराशा व नाउमेद ही काही माणसाच्या जीवनप्रवाहात कायमची बसून राहात नाहीत. अधार व प्रकाश याच्या सीमा अगदी एकमेकाला चिकटूनच असतात. तुमच्या जीवनातील चमकती व प्रकाशमान बाजू दि.२ च्या मगळ-बुधाच्या युतीपासूनच तेजाळू लागणार आहे. अतृप्त आशा, उध्वस्त झालेल्या आकांक्षा आणि हरवलेले तुमचे मानसिक सौख्य पुन्हा नव्या जोमाने व दिमाखाने उभारलेले तुमच्या प्रत्ययाला येईल. नोकरी, व्यवसाय, पैशाचे व्यवहार, नव्या योजना व आकांक्षा यात नव्या युगाची तुतारी वाजू लागेल. **महिलांस :** संसारातील उणीव दूर होईल. सुखाची व आरोग्याची गुरुकिल्ली हाती येईल.

**कुंभ : आशा-निराशेचा खेळ**

गेले काही दिवस तुमचे कौटुबिक व ससारातील सुख तुमच्यापासून गेले आहे. अजून तरी काही काळ यात सुधारणा होणे अशक्य आहे. कारण आठवा मंगळ व सातवा रवी तुमची कसोटीच पहात आहे. पण राशीत असलेला गुरू व मिथुन राशीत असलेला शनी तुमचे काहीही वाईट होऊ देणार नाही. येणाऱ्या सकटाशी मुकाबला करायला ते समर्थ आहेत. राजकारणातील तुमच्या स्थानाला कमीपणा आणण्याचा विरोधकानी कितीही प्रयत्न केला तरी हे दोन समर्थ ग्रह तो प्रयत्न हाणून पाडतील. व तुमच्या आकांक्षा पुन्या होऊ शकतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. **महिलांस :** कौटुबिक त्रास असला तरी आर्थिक व व्यावसायिक सुधारणा होईल.

**मीन : संयमाची गरज**

बारावा गुरू व चौथा शनी यांनी तुमचे जीवन कोडीत आणि अडचणीत पकडून ठेवले आहे. अजून काही काळ तरी याच आवर्तात तुम्हाला वावरायला हवे. ईश्वरी श्रद्धा, आपल्या अगीकृत कार्याबद्दल प्रामाणिक कष्ट आणि सयमाची वागणूक तुम्ही अगीकारली तर सकटे, अडचणी यावर तुम्ही सहज मात करू शकाल. या आठवड्यात पहिले दोन तीन दिवस तुम्हाला चद्र व मंगळ तसेच रवी अनुकूल आहेत. दि. १ ला मगळ-बुधाची युती तर तुमच्या शत्रूस्थानी होत आहे. हाच तेवढा एक चांगला योग आहे. नोकरी क्षेत्रातील तुमचे गुप्त शत्रू व स्पर्धक याना तुम्ही चागलाच धडा शिकवू शकाल. बेकारांच्या जत्रेत–गर्दीत अनेक परीने तुमचाच नबर लागेल. आर्थिक स्थिती मात्र साधारणच राहील. **महिलांस :** तुम्ही भावनावश होणे टाळा. तब्येतीची काळजी घ्या. ☐ ☐

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## किशोर हाच खरा न्यू वेव्ह निर्माता

प्रोडयुसर, डायरेक्टर, ॲक्टर, म्युझिक डायरेक्टर, सिंगर, रायटर, डिस्ट्रिब्युटर किशोर मार की... (थोडा श्वास घेऊ दे!) 'बढती का नाम दाढी' आ रही है! ये प्रोडयुसर डायरेक्टर वगैरे वगैरे जे किशोरचे चक्कर आहे ना हे एक हिंदी चित्रपटातले अफलातून चक्कर आहे. हमखास पिक्चर आपटणारे चक्कर! 'दूर का राही' नावाच्या एका पिक्चरच्या वेळची गोष्ट! किशोरचे पिक्चरचे चक्कर सुरू झाले. आता किशोरवर आम्ही वेडयासारखे प्रेम करतो. तर साहाजिकच 'पिक्चर विषयी कसे काय' म्हणून किशोरचे पब्लिसिस्ट कॉलिन पॉल यांच्याकडे चौकशी केली. ते म्हणाले, 'ते पिक्चर काय चालण्यासाठी थोडेच आहे!' म्हणजे काय ते समजा. 'दूर का राही' प्लॉप झाले. किशोरचे काय नुकसान झाले असेल ते असो. तो नुकसान झेलायला तयार आहे, मग त्याचा विचार कुणी का करायचा? पण तो पिक्चर आपल्या मनासारखं काढतो. तो पब्लिकची पर्वा करीत नाही, कुणाचीही पर्वा करीत नाही. पावसाळयात खंडाळयाला जोरात पाऊस पडत असतो, सारे सिनेमावाले आपले आपले कॅमेरे कुलुपबंद करून मुंबईकडे परतत असतात, त्यावेळी किशोर खंडाळयाला चाललेला असतो. वाटेत शक्तिसामंता विचारतो, 'अरे भाई किशोर तू कुठे चाललास!' किशोर व्हॅनमधून पावसात डोके काढतो आणि जबाब देतो, 'हॅ: हॅ: शूटिंगला चाललो. हाच शूटिंगला चांगला मोसम आहे!' शक्ति सामंता खंडाळयाच्या दरडीवरून खाली फेकल्यासारखा होतो. हां. किशोर स्टोरी कशी तयार करतो हाही एक त्याच्या शूटिंगसारखा किस्सा आहे. त्याच्या डोक्यामध्ये एक आयडिया येते. मग तो एक सफेद कोरा कागद पुढे ओढतो. त्यावर एक वाक्य लिहितो. मग पुढचे वाक्य... मग पुढचे वाक्य... बस्स! स्टोरी बनते.

'दूर का राही'ची ट्रायल पाहून एक आमचा मित्र आम्हाला म्हणाला होता, 'हे चित्र किती वेळ चालले होते. मला वाटलं हे संपणारच नाही.' एकूण आपल्या पिक्चर विषयी कुणी चांगलं बोलूच नये आणि आमच्या सारख्या त्याच्या पाठिराख्यांना तोंड मिटून घ्यावे लागावे अशी किशोर आपल्या पिक्चरमध्ये व्यवस्था करीत असावा. पण, एक गोष्ट. किशोर आपल्या प्रत्येक पिक्चरमध्ये म्युझिक डायरेक्टर म्हणून चमकणार आहे. 'दूर गगन की छावो मे'मध्ये 'कोई लौटा दे' हे दर्दभरे गीत ऐकताना कोणी हेलावला नाहीतर तो आदमी नसून 'फिल्मफेअर'चा संगीत समीक्षक असावा असे म्हटले पाहिजे. 'दूर का राही'मधली सारीच गाणी लाजवाब होती. 'घडी दो घडी' 'बेकरार दिल', 'पंथी हू मैं', 'जीवन की बहार' ही गाणी किशोरने गायलेल्या काही अप्रतीम गाण्यापैकीच आहेत. 'तर्ज, बॅक ग्राऊंड म्युझिक, आवाज आणि मूड' साऱ्या बाबतीत ह्या पिक्चरची गाणी अविस्मरणीय होती.

एकूण, दिग्दर्शकाची चित्रं म्हणूनच किशोरच्या चित्रांकडे पाह्यला पाहिजे. न चालणारी चित्रं म्हणूनही किशोरची चित्रं होती, फॉर्म्युला नसलेली चित्रं म्हणूनही किशोरची चित्रं होती, आणि सर्वात म्हणजे किशोरने या चित्रावर काही खर्च केला असावा असे वाटत नसे. थोडक्यात ही लो बजेट चित्रं होती. पण तरीसुद्धा किशोरच्या चित्रांना 'न्यू वेव्ह' चित्रात स्थान नव्हते. फिल्म फेअरवाले नवचित्रपटावरची यादी पेश करीत त्यात कधी 'दूर का राही'चे नाव नसायचे. सरकारने आता नवचित्रपट वाल्यांनाच पारितोषिके द्यायचे ठरवले आहे म्हणतात, परंतु किशोरला कोणी बक्षिस देणार नाही. याचे कारण ही

पिक्चर्स किशोरची होती. किशोरच्या नावाची काही लोकांना अॅलर्जी आहे काही संगीताविषयी स्वतःला जादा समजते अशी पोझ घेणाऱ्या अंग्रेजी संगीत समीक्षकांना, आणि त्याच्या अफलातून विनोदावर जळणाऱ्या समीक्षकांना.

किशोरने आता ‘ न्यू वेव्ह ’ सिनेमावाला एक-दोन पिक्चर्समध्ये खोट खाल्ल्यानंतर सुधारतो आणि धंदा करणारी पिक्चर्स काढण्याच्या मागे लागतो, त्याप्रमाणे धंदा करणारे पिक्चर काढायचे ठरविले ही खूणही किशोर ‘ न्यू वेव्ह ’वाला आहे हेच सिद्ध करते. किशोरचे ‘ बढती का नाम दाढी ’ हे चित्र आता प्रकाशनाच्या मार्गावर आहे. त्याची ट्रायल पाहून लोक ‘ हा चांगला फार्स आहे ’ म्हणून बोलायला लागले आहेत. किशोरच्या पिक्चरविषयी इतके चांगले बोलले जाईल अशी आपली अपेक्षाच नव्हती. असो किशोर फार्सकडे वळला ही गोष्ट फारच चांगली झाली. बऱ्याच दिवसांनी हातात कात्री घेऊन तो दुसऱ्यांच्या दाढ्या कापण्याच्या मागे लागलाय असला ग्रँड प्रसंग पहायला मिळणार आहे. किशोर म्हणजे उधळकूद. त्याची अदाकारी उधळकूद, त्याचे गाणे उधळकूद. तो परत ‘ उधळकूद ’ पिक्चर काढण्याच्या प्रयत्नात आहे, हे आम्हाला त्याची हिरॉईन शीतल हिने एका पार्टीत सांगितले. आपण त्यावेळी भलतेच खुश झालो. पण तरीसुद्धा किशोरचे डायरेक्शन म्हणजे एक शंका होतीच. पण आता त्या शंकेचेही पूर्ण निरसन झाले आहे.

अरे हो; एक किशोरचा सत्यजित रे बरोबरचा फोटो मी कुठेतरी पाह्यला. नेहमीप्रमाणे त्याची मॅड अदाकारी आणि सत्यजित रे सारख्या त्या सिरिअस माणसाचे हसणे. एकूण सत्यजितला हसवण्याइतकी ज्या माणसाकडे गिफ्ट आहे, त्या माणसाने ‘ दूर का राही ’ आणि ‘ दूर गगनकी छावों मे ’ अशी पिक्चर्स काढून उगीच लोकांना बोअर करत होतो. आता तो फार्स आणि कॉमेडीच्या पाठीमागे लागलाय. आता बघा किशोरची धमाल-कमाल.

ह्यां तर कॉमेडीविषयी. ‘ दुनिया का मेला ’ तुम्ही कोणी पाह्यलंत. चार्लीच्या भूमिकेत



बढती दाढीमागे कात्री घेऊन लागलेला किशोर

महमूद कसा मेला हे पाहाण्यासारखे आहे. असं म्हणतात की वर्तुळाकार भोकामध्ये चौकोनी खुटी बसत नाही त्याप्रमाणे त्या लुकड्या आणि लगड्या चालीच्या भूमिकेत महंमूद कसा बसणार ? महंमूद एरवीच गुटगुटीत आणि स्मार्टही वाटतो. हा महमूदने प्रयत्न जरूर केला. ' मैं दिल तोडके फेंक दूगी ' या गाण्यात आपल्याला अस्सल महमूद दिसला. जज् रेहमानला आपल्या नृत्याच्या समारंभ खेळाचे घाटण— म्हणजेच उद्घाटन करण्याचे आमंत्रण दिल्यानंतर जीवनला आपण घरी जाऊन चहा पिऊ या ' ही सूचना करताना आपल्याला महंमूद दिसला. पण, ' घनश्याम, पडदा गिराव ' म्हणून आठ वेळा चिल्लावणारा चार्ली दिसला नाही. मग हे पिक्चर—म्हणजेच पूर्वीचे तकदीरचा ' दुनिया का मेला ' बनविण्याचा मतलब काय आहे, हे आपल्याला समजलाच नाही.

## मराठी चित्रपटाचा आदर्शवाद

समाजवादी पक्षाचे एक जुने कार्यकर्ते, आय्. एन्. टी. या संस्थेतील एक नट, अप्पा फडणीस यांनी सुमारे पधरा वर्षांपूर्वी ' मुलगा ' नावाचे मराठी चित्र काढून हात पोळून घेतले होते. तरीसुद्धा त्यांचा पुन्हा मराठी चित्रपटाशी संबध आलाच. त्याचे बधू नाना फडणीस (' घाशीराम 'च्या काळचे नव्हेत ! ) यांनी झांजे नामक एका निर्मात्याबरोबर एक मराठी चित्र काढले. ' कार्तिकी ' या र. वा. दिघे याच्या कादबरीवरील चित्र. भावाचे चित्र म्हणजे अप्पांचा सबध आला आणि अप्पांचा मित्र आणि समीक्षक म्हणून माझाही संबध आलाच. वास्तविक अप्पा मला आधी भेटले असते तर त्यांना म्हणालो असतो, ' र. वा. दिघ्यांच्या कादबरीवर कसले चित्र काढताय ? काहीतरी विनोदी काढा. ' पण ते ' कार्तिकी ' काढल्यानंतर भेटले. अप्पाचे बधू नाना हे अप्पाच्यासारखेच म्हणजे आदर्शवादी. चित्र धदा कसा करील यापेक्षा तो समाजाला शिकवणूक कशी देईल याचाच त्यांच्या डोक्यात विचार. त्यामुळे ' कार्तिकी 'त अस्पृश्यतेविरुद्ध शिकवणूक आहे. मग, तीच कथा आपण पडद्यावर आणायची अशी त्यांची आणि हाज्याची भूमिका.

' कार्तिकी 'च्या प्रेस शो चे आमंत्रण देण्यासाठी अप्पा आणि नाना हे दोन फडणीस माझ्याकडे आले. साहाजिकच ' चित्र चालेल की नाही ' यावर चर्चा झाली. मी त्यांना कानमंत्र सांगितला. ' मराठी चित्र चालायला हवे असेल तर पडद्यावर काय चाललेय् हे किमान प्रेक्षकाला दिसायला हवे आणि काय बोलले जातेय् हे प्रेक्षकाला ऐकायला मिळायला हवे ! ' मजा अशी की ' कार्तिकी ' हा चित्रपट असाच होता. म्हणजे तांत्रिक दृष्ट्या सफाईदार. फडणीसांनी विचार केला की आपण शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकऱ्यांची मदत घ्यावी. बहुधा त्यांना शिवसेना प्रमुखांना गाठण्यास वेळ मिळाला नसावा आणि त्यांचा आशीर्वाद मिळवता आला नाही. तत्पूर्वीच ते भारतमाता चित्रगृहात लागले आणि ते चाललेही.

' कार्तिकी ' हे चित्र अस्पृश्यतेवर. म्हणजे आपण अस्पृश्यता मानीत नाहीच. आता अस्पृश्यता म्हणजे काय हे आपल्याला ठाऊक नाही. ज्याप्रमाणे काही गोऱ्या लोकांना काळा-गोरा भेद माहीत नाही त्याप्रमाणेच आता ' इन धी हीट ऑफ धी नाईट 'मध्ये गोऱ्या रॉड स्टीगरला काळ्या सिडने पोशिएने नाही का काळा-गोरा भेद समजाऊन दिला, तसाच तो आपल्यालाही पटवून द्यायला हवा. ' कार्तिकी 'मध्ये आपण हेच पटवून घेण्यासाठी गेलो होतो. आता र. वा. दिघे आपल्याला कादबरीतून पटवून देत नाहीत. तेव्हा पटकथाकार दिनकर पाटील हे तरी समजाऊन देतील असे वाटत होते. पण ते त्यांनी चंद्रकांत गोखले यांच्यावर सोपवले. आता चंद्रकात गोखले पिक्चरभर जी काही लेक्चर देत असतात, ती आम्हालाही ठाऊक आहेत. त्यामुळे अस्पृश्यतेचे फील कधीच झाले नाही. पण आमची गोष्ट सोडा. कारण इंदुमती पैंगणकरसारख्या खुबसुरत अदाकाराला आम्ही कधीच अस्पृश्य मानणार नाही. आणि तिच्यावर अत्याचार झाल्यामुळे आम्ही हलणार नाही. पण सरकारने तरी या चित्राचा विचार करायला नको का ? सरकार अस्पृश्यतेविषयी काही करीत नाही ही बोब आहेच. निदान ' कार्तिकी 'चा करमणूक कर माफ करून सरकारने योग्य पाऊल टाकायला हवे होते. आणि हे पाऊल सिनेमा प्रकाशित होण्यापूर्वीच टाकायला हवे होते. आता कदाचित करमाफ होईल तो पिक्चर उतरताना. म्हणजे प्रेक्षकाना वाटावे की या पिक्चरला करमाफ झाला नी तरी सुद्धा हे पिक्चर उतरतेय म्हणजे हे पिक्चर काही चांगले नसावे. एकूण आमचे फडणीस बंधू हे किती ध्येयवादी—आदर्शवादी असले तरी त्यांच्या आदर्शवादाचा विचका करण्याची कुवत आमच्या सरकारकडे पुष्कळ आहे. फडणीस बधूनी आता ' वासना कांड 'च पडद्यावर आणावे मग बघा प्रतिभा पाटील कशा खडबडून जाग्या होतील त्या.

■ ■

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर